शांताबाई

(जीवनस्मृति.)



शांताबाई चार महिन्यांची असतांना घेतलेला फोटो. (पान ३.)

लेखिकाः——सारजाबाई बापट.

शांताबाई

जीवन-स्मृति.

लेखिका.

काव्यकल्पलता—श्री. सारजाबाई बापट.
B. P. N. A.

सन १९२५.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—
म्यानेजर, धुंडिराज डेपो.
१६५ शनवार पेठ, पुणें.

किंमत ०१२ आणे; चांगलें बाइंडिंग १ रुपया.

हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं चित्रशाळा
प्रेसमध्यें छापून काव्यकल्पलता सारजाबाई बापट.
यांनीं पुणें शनवार पेठ, घ. नं. १६५
येथें प्रसिद्ध केलें.

(वीर वामनराव यांनीं लिहिलेली प्रस्तावना.)

मृताच्या पुण्यस्मरणार्थ.

सुप्रसिद्ध काव्यकल्पलता– श्री. सरजाबाई बापट यांनीं लिहिलेल्या या " शांताबाई जीवनस्मृतीस " प्रस्तावनेदाखल दोन शब्द मी लिहावेंत असें माझे मित्र श्री. शंकररावजी लवाटे यांनीं मला सांगितलें. चरित्रनायिकेच्या गुणगौरवाच्या कुतुहलानें माझें मन भारलें गेलें असल्यामुळें श्री. भाऊसाहेब लवाटे यांचा शब्द मला मोडतां येईना व मी प्रस्तावना लिहिण्याचें त्यांस अभिवचन दिलें.

शांताबाईचा व माझा परिचय अत्यल्प होता. ता. ५ दिजंबर १९२२ इ. रोजीं श्री. मोरोबा दादा फडणीस यांच्या वाड्यांत अफजुलखानवधाच्या अख्यानावर त्यांचें कीर्तन झालें. त्या प्रसंगीं मी हजर होतों व माझ्याहस्तें त्यांना पदक अर्पण करण्यांत आलें होतें, एवढीच काय ती त्यांची व माझी ओळख. तथापि एवढ्या अल्पपरिचयांतही त्यांच्या अंगचे जे गुण माझ्या दृष्टीस पडले, त्यांनीं माझ्या अंतःकरणांत त्यांच्यासंबंधानें वात्सल्यपूर्ण कौतुक उत्पन्न केलें. " चालू जीवनांतील दिवस-रात्रींच्या गणनेनें हा जीव अल्पवयी दिसत असला, तरी आत्म्याच्या अनंत काल चालणाऱ्या उत्क्रांतिपथावरील बराच दूरचा पल्ला त्यानें गांठलेला आहे " असे उद्गार त्यावेळीं माझ्या तोंडून निघालेले मला स्मरतात. आणि आज 'शांताबाईचें जीवन-चरित्र' समग्र वाचल्यानंतर माझे त्या वेळचे शब्द यथार्थ होते, असें म्हणण्यास मला कोणताही प्रत्यवाय दिसत नाहीं. रसिक विद्वानांना, प्रेमळ भक्तांना व नामांकित हरिदासांना आपल्या प्रतिभासंपन्न वक्तृत्वानें गुंगवून त्यांच्याकडून "वाहवा" म्हणवून घेण्याचें अलौकिक सामर्थ्य एका जन्माच्या अल्पाभ्यासानें येणें शक्य नाहीं. हें अनेक जन्मांच्या तपश्चर्येचें फल आहे. शांताबाई यांचे पूर्व संस्कार फार उज्ज्वल होते व त्यांचा अधिकारही मोठा होता. परंतु त्यांच्या लोकोत्तर गुणांचा विकास होऊं लागण्यास सुरुवात होते न होते तोंच निर्घृण कालानें त्यांच्यावर झडप घातली व जगास

त्यांच्या योग्यतेचा प्रत्यक्ष अनुभव पटण्याची संधि कायमची नष्ट झाली. तथापि आलेल्या अनुभवावरून हें एक अमूल्य रत्न होतें असे कोणीही कबूल करील यांत शंका नाहीं.

शांताबाईंचें जीवन चरित्र म्हणजे एका सरळ स्वभावाच्या बालिकेच्या बाल्य-दशेंतील बालक्रीडांचें वर्णन आणि तेंहि श्री. सारजाबाई बापट यांनीं साध्या सरळ बालबोध वळणावर लिहिलेलें ! तेव्हां त्यांत अंतःकरणास हालवून सोडणारें काय असणार असें साहजिक वाटेल. परंतु शांताबाईंचे अल्पायुषी जीवन म्हणजे एक स्वयंभु काव्यचमत्कारच असल्यामुळें काव्यकल्पलतेचे साधे शब्दही दर क्षणीं अंतःकरणास द्रववून सोडल्यावाचून रहात नाहींत. एका झटक्यांत पुस्तक वाचून काढण्याच्या निश्चयानें मीं बसलों; परंतु पुस्तकाच्या शेवटास जाऊन पोहोंचेपर्यंत मनास दुःखावेगांचे इतके झटके आले कीं, एका झटक्यांतच काय पण एका बैठ-कींतही सबंध पुस्तकाचें वाचन मला संपवितां आलें नाहीं. शब्दचित्र नुसतें पहात असतां माझ्यासारख्या पाषाणहृदयी त्रयस्थाची जर अशी अवस्था झाली, तर तें स्वतःच्या हातानें रेखाटतांना लेखिकेसारख्या कोमल स्वभावी निकट आप्ताच्या अंतःकरणांत दुःखाची केवढी कालवाकालव झाली असेल, हें सांगणेंच नको. शांताबाई या चिरवियोगाच्या तापानें वितळून डोळ्यांवाटें सतत वाहणाऱ्या अंतःकरणांत लेखणी बुचकळून या पुस्तकांतील प्रत्येक ओळ लेखिकेनें लिहिलेली आहे, असेंच म्हणणें भाग आहे.

मुलांच्या उपजत गुणांची लहानपणींच नीट परीक्षा करून त्यांच्या विकासास उपयुक्त होईल असें शिक्षण प्रथमपासूनच त्यास मिळेल, अशी मुलांच्या आई-बापांनीं व्यवस्था केल्यास अल्पवयांत देखील मुलांच्या हातून काय घडून येऊं शकतें, याचें शांताबाई हें मूर्तिमंत उदाहरण आहे. शांताबाईच्या वडिलांनीं व निकट आप्तेष्टांनीं या बाबतींत जें चातुर्य दाखविलें व कष्ट घेतलें त्यांचाच कीर्तना-लंकृति शांताबाई यांचा असामान्य लौकिक हा परिणाम आहे. शांताबाईंच्या पूर्वजन्मार्जित संस्कारांची त्यांस बिनचुक ओळख पटली नसती, अगर त्यांनीं त्या बद्दल अनास्था दाखविली असती, तर वनपुष्पाप्रमाणें शांताबाईंचें जीवन निर-र्थकच झालें असतें. शांताबाईंना मिळालेल्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर केवढा विलक्षण परिणाम झालेला होता, हें पहावयाचें असल्यास त्यांच्या अखेरच्या आजाराची हकीकत अवश्य वाचावी. अंतकालचे त्यांचे उद्गार तत्वज्ञांसही चकित

करून टाकणारे आहेत, असें कोण म्हणणार नाहीं ! मृत्युलोकाच्या सीमे बाहेर पाऊल ठेवतांना चित्त शांत व निर्भय असणें हें जीवाच्या उच्च कोटीचें व उत्तमावस्थेचें निदर्शक आहे.

शांताबाईच्या पुण्यस्मरणार्थ लिहिलेल्या या प्रस्तावनेची समाप्ति त्यांच्याच तोंडून निघालेल्या शब्दांनी करणें उचित आहे. " दादा,...... जिस दिन तुम जन्म लिये जग हांसे तुम रोय । ऐसी करनी कर जायो पिछे न हांसे कोय ॥१॥ असें माझ्या कडून झालें ना ? "

प्रिय **शांताबाई** ! तुमच्या दादांना त्या वेळीं या तुमच्या प्रश्नाचें उत्तर देववलें नाहीं. परंतु मी आज निश्चयानें तें देऊं शकतों व देतों.

" शांताबाई ! तुम्ही इहलोक सोडून गेलांत,-परंतु सत्कीर्ति रूपानें तुमचें जीवन अजरामर झालें आहे. ! "

पुणें.
किर्लोस्कर नाटकगृह
बलवंत सं. मंडळी.
शुक्र. ता. १८ सप्टेंबर १९२५.

वामन गोपाळ जोशी.

ठळक चुकांचें

शुद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध.	शुद्ध.
१८	१६	भावी	साधी
२२	१७	योगा योग असे.	येण्या जोगा आहे
३५	१८	६॥ वाजतां	९॥ वाजतां
८६	३१	आज महिन्यांत,	आज बावीस दिवसांत

श्रीजगद्गुरु शंकराचार्य, मठ करवीर--संकेश्वर.

नागपूर, कार्तिक शु० १ शके १८४७

श्रीजगद्गुरु शंकराचार्य (डॉ० कूर्तकोटी)

यांचा आशिर्वाद.

परलोकवासी कु० **शांताबाईची** ' जीवनस्मृती ' एकत्र ग्रथित करून पुस्तकरूपानें छापलेली पाहिली. अंतःकरणांत आनंद व खेद अशा दोन्ही वृत्ति—अर्थात् परस्पर विरोधि वृत्ति—जागृत झाल्या. आनंदवृत्ति अशा विचारानें उद्भवली कीं आपल्या या हतभाग्य राष्ट्रांत सध्यांच्या हीनावस्थेंतही **शांताबाई** सारखे तारे मधूनमधून चमकावेत इतकी अजून या राष्ट्रावर परमेश्वराची कृपा आहे. आणि आमच्या राष्ट्राचा जिवंतपणा व आमच्या धर्माचें उज्ज्वलत्व अजून तो असे स्त्रीपुरुष उत्पन्न करून सर्वांच्या निदर्शनास आणून देत आहे. पण ही आनंदवृत्ति कांहीं काळ टिकेत न टिकेत तोंच; हा अशा गुणी व तेजस्वी तारा एकाएकीं नाहींशा करणारी कालगती पाहून तितकीच काय पण त्याहून कितीतरी पटीनें अधिक अशी खेदवृत्ति अंतःकरणपटलावर उमटली.

शेवटीं समाधानास जागा हीच कीं, काळोखांत रस्ता दिसत नसल्यामुळें भांबावलेल्या प्रवाशाला वीज जशी क्षणिकच प्रकाश पाडून पुढील मार्ग दाखविते, त्याप्रमाणें **शांताबाईनें** आपल्या अल्प आयुर्मर्यादेंतच गृहशिक्षणाचा आदर्श, धर्मश्रद्धा, आत्मविश्वास, समाधानवृत्ति, प्रेमळपणा, कीर्तनकौशल्य वगैरे गुणांनी योग्य शिक्षणाविषयीं तळमळणाऱ्या आपल्या वयाच्या मुलींना स्त्रीशिक्षणाचा खरा मार्ग दाखविला. तिच्या वयाच्या मुलींकरितांच काय पण ईश्वरश्रद्धेनें मिळणारी मनःशांति तिनें मरणासारख्या कठीण समयींही प्रगट करून ती मरणाला भिणाऱ्या वृद्धांना देखील मार्गदर्शक झाली नाहीं काय !

शांताबाईला १९२० सालीं येवलें मुकामीं श्रीयुत थत्ते वकील यांनीं आमचेकडे मुद्दाम घेऊन येऊन तिचे गुणांविषयीं सांगितलें. त्याच वेळीं तिची

ती अस्खलित, साभिनय आणि धर्मभावनापूर्ण भाषण करण्याची शैली पाहून आम्हांला फार कौतुक वाटलें व त्याच प्रसंगीं तिनें जाहीर रीतीनें कीर्तन करावें अशी आम्ही आपली मनीषा प्रगट केली. त्याप्रमाणें जागोजागीं होत असलेल्या तिच्या कीर्तनाची कीर्ति ऐकून फार संतोष होत असे.

त्यानंतर १९२३ सालीं पुणें मुक्कामीं **बापू गोखले** यांचे श्रीराम मंदिरांत आमच्या समोर तिनें कीर्तन केलें. तें ऐकून तिचा लौकिक जो पसरला होता तो यथार्थ असल्याबद्दल आमची खात्री पटली. कीर्तनाचा पूर्वरंग व आख्यान यांचा सांधा एकजीव सांधण्याची तिची हातोटी आम्हांला फार आवडली. प्रसंगोचित त्या त्या भूमिकेस साजणारी भाषासरणी आणि अभिनय, त्या त्या रसाला अनुरूप अशी वृत्ति, श्रोत्यांच्या मनाला आकर्षण करून सोडणारें रसभरित विषयप्रतिपादन आणि या सर्व गुणांना अत्यंत सुशोभित करणारें आणि खुलवून दाखविणारें तें बालवय हा सर्व गुणसमुच्चय पाहून असलीच तरुण पिढी धार्मिक दृष्ट्या राष्ट्राची उन्नति करील, असें अंतःकरणाला वाटून **शांताबाईला** प्रोत्साहनार्थ श्रीबालकृष्णाची मूर्ति आणि "कीर्तनालंकृति" ही पदवी आम्ही दिली.

पुढें १९२४ सालीं **शांताबाईंचे** वडिलांचे व विशेषतः **शांताबाईंचे** आदरपूर्वक आग्रहावरून पुणें येथें त्यांचे वाड्यांत आमचा मुक्काम झाला. त्यावेळीं **शांताबाईंच्या** धर्मश्रद्धा, ईश्वरभक्ति व सात्विकता या गुणांबद्दल पूर्वीं वाटत असलेलें कौतुक दुणावलें. पुजेचे वेळीं ती बिनचुक हजर राहून अत्यंत भक्तीनें सर्व प्रकार पहात असे. देवासंबंधीं अथवा धर्मासंबंधीं तिला कांहीं समजावून सांगत असतांना ती अत्यंत लक्षपूर्वक ऐकत असे, आणि मधून मधून तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वहात असत. तिची भक्ति, बुद्धिमत्ता आणि विनय पाहून तिच्या मनावर आर्यसंस्कृतीचा ठसा जास्त उमटविल्यास ती आदर्शभूत आर्यस्त्रीरत्न बनेल अशा आशेनें तिला संस्कृतच जास्त शिकवावें व आपलेकडे नाशिक येथें कांहीं दिवस ठेविल्यानें आम्ही स्वतः तिला तयार करूं असें तिच्या वडिलांपाशीं आम्ही बोललों आणि ती गोष्ट त्यांना पटून तसें करण्याचें त्यांनीं कबूलही केलें.

यंदाचे उन्हाळ्यांत तिचे वडिलांनीं तिला घेऊन नाशिकास आमचा मुक्काम असतांना येण्याचें ठरलें होतें. परंतु तिला घेऊन येण्याचे ऐवजीं

तिच्या वडिलांनीं तिच्या मृत्यूबद्दलचें पत्र आमचेकडे पाठविलें ! भवितव्यतेपुढें कोणाचा काय इलाज आहे !

शांताबाईच्या अकाल निधनामुळें झालेली मनाची तळमळ तिची जिवनस्मृति लिहून शांत करण्याचा प्रयत्न अत्यंत उचित आहे यांत शंका नाहीं. ही जीवनस्मृति अत्यंत कळकळीनें लिहिलेली आहे हें कोणाही वाचकास सहज समजेल. या जीवनस्मृतिपासून सर्व मातापितरांस पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. लहानपणींच आपल्या मुलांच्या अंत:करणभूमिकेंत धर्मश्रद्धेचें बीज पेरित गेल्यास भगवद्भक्ति, मन:शांति, सात्त्विकवृत्ति वगैरे गुण त्यांच्या ठिकाणीं कसे विकास पावतात हें या जीवनस्मृतींत जागो जागीं दिसून येईल व या दृष्टीनें **शांताबाईनें**, आपल्या व्यक्त दशेंत जी राष्ट्रसेवा केली तीच ती आपल्या या अल्पशा चारित्राच्या योगानें अव्यक्त दशेंतही करील असा भरंवसा या पुस्तकावरून वाटतो. ईश करो व तसें घडो.

आणखी कांहीं अभिप्राय.

श्री. सौ. काशीबाई हेरलेकर हेड मिस्ट्रेस बडोदा स्कूल्स्—... **शांताबाईच्या** अलौकिक गुणांमुळें व तुमच्या लेखिकेच्या तिच्याविषयींच्या गुणाच्या आदरामुळें लेखनांत एक प्रकारची अपूर्वता आली आहे....मिळालेल्या सुसंधीचें त्या विचारशील मुलीनें योग्य सार्थक करून दाखविलें. ... गुणांची गोडी असल्यामुळें वाचकाला जीवनस्मृति पुढें वाचावयाची उत्कट इच्छा होते. शेवटच्या भागाशीं आले कीं हृदयाला चटका बसल्यावाचून रहात नाहीं. स्फूर्ति, आनंद, अभिमान व करुणा, शोक ह्या सर्वांचा अनुभव आल्यावाचून रहात नाहीं. ....

मनुष्य जन्मास यावयाचें तें कांहीं तरी उत्तम असें साधण्याकरितां, ही गोष्ट केव्हां केव्हां विसरली जाते. **शांताबाईच्या** या जीवनस्मृतीनें ती लहान थोरांच्या मनावर ठसण्यास मदत होईल. तसेंच एका लहान मुलीनें थोड्याशा काळांत कशी अलौलिक कर्तबगारी व सद्गुण संपादन केले, हे पाहून भावी पिढीला अधिक आत्मविश्वास येण्यास मदत होईल. हें पुस्तक लिहिण्याची बुद्धि तुम्हाला झाली हें सुदैवच म्हणावयाचें. सहृदय गुणांची चहा असलेल्या मायेच्या माणसाच्या हातून सहज व साध्या शब्दांनीं व्यक्त

केलेले—लिहिलेले विचार कसे चित्ताकर्षक वाङ्मय उत्पन्न करूं शकतात, त्याचा हें पुस्तक हा पाहण्यासारखा नमुना आहे.

परिक्षकः—पुस्तकांतील साध्या व स्वाभाविक भाषेंत असून अत्यंत हृदयद्रावक आहे **शांताबाई**सारखी भाग्यशाली मुलगी दुसरी क्वचितच झाली असेल.

श्री. विष्णु दिगंबर पलूसकर (गांधर्वमहाविद्यालय मुंबई) —चरित्र फारच चांगलें झालें आहे.

चिकित्सकः— अश्रूंचा पाट फोडणारी अशी ही जीवनस्मृति आहे.

महाराष्ट्र;-चमत्कृति-जनक-चरित्र या पुस्तकांत अत्यंत हृदयद्रावक रीतीनें वर्णन केलें आहे.

बलवंतः—श्री. सारजाबाईंनीं आपल्या काव्यमय व हृदयस्पर्शी भाषेमध्यें अशा गुणी बालेचा जीवनवृत्तांत देऊन महाराष्ट्रवर्गास ऋणी करून ठेविलें आहे.

उदयः—हें पुस्तक वाचणाऱ्या पालकांना व मुलांना बोध घेण्यासारखा आहे.

गोग्रासः—आधिभौतिक दृष्टीनें पाहूं गेल्यास हें चरित्र ' एवढ्या लहान वयांत काय करितां येणार? म्हणून मुलांना लाडांनीं वेडें बनविणाऱ्या मातापितरांना आपल्या मुलांना कीर्तिमान करण्यास प्रवृत्त व प्रोत्साहन देणारें आहे.

गोसेवकः—पुस्तक वाचीत असतांना कठोर अंतःकरणाला पाझर फुटून डोळे भरून येतात.

शुभसूचकः—शांताबाईच्या अंगचे गुण कसकसे विकास पावत गेलें व त्यांस गृहशिक्षण कसें उपयोगीं पडलें, तिचा चरित्रक्रम व व्यासंग कसा होता वगैरे हकीगत (या पुस्तकांत) आलेली आहे व तें लहान मुलामुलींस बोधप्रद व मार्गदर्शक होण्यासारखें आहे.

लोकमतः—कीर्तनालंकृति **शांताबाई ओंकार** यांचें नांव निदान ऐकून तरी माहित नाहीं असा सुशिक्षित महाराष्ट्रीय पाहूं जातां दुर्मिळ आहे. हें चरित्र साध्या, सोप्या व कारुणिक भाषेंत लिहिलें आहे.

चाबूकस्वारः— चरित्र फारच साधें आणि चटका लावणारें झालें आहे. वाचीत असतां अश्रु मुळींच थांबत नाहींत.

———

शांताबाई—जीवनस्मृति या पुस्तकावरील

कांहीं अभिप्राय.

केसरी--प्रसिद्ध बालकीर्तनकार शांताबाई ओंकार हिचा वयाच्या केवळ बाराव्या वर्षी अंत होऊन तिच्या कीर्तनाचें परिणत स्वरूप पहावयास न मिळाल्यामुळें ज्यांनीं ज्यांनीं म्हणून तिचें कीर्तन ऐकलें असेल त्या सर्वांस हळहळ वाटणें स्वाभाविकच होय. इतक्या लहान वयांत शांताबाईस कीर्तनाची आवड उत्पन्न कशी झाली याबद्दल कोणासही कुतुहल वाटेलच, त्याचें समाधान प्रस्तुत चरित्र वाचून होणार आहे.........शांताबाईच्या स्वभावांतील गुणदोष अनेक बारीकसारीक उदाहरणें देऊन चांगले दाखविले आहेत.

श्रीमंत पंतप्रतिनिधी औंध सरकार—......पुस्तक एकंदरींत चांगलें लिहिलें आहे.

स्वधर्म--......स्मरणशक्ति व अध्ययन, उत्कृष्ट वक्तृत्व व समाधीटपणा या मुळें शांताबाईनें अल्पकाळांत साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष आपलेकडे वेधून घेतलें होतें. शांताबाईचा विनयशीलपणा उद्योगप्रियता व धर्मश्रद्धा हे गुण तर सर्वत्रांना अनुकरणास योग्य असें आहेत. त्यांची योग्यता पाहूनच श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्यांनीं त्यांना कीर्तनालंकृति ही पदवी दिली होती.........चांगली चीज आपल्या जामदारखान्यांत जमा करण्यासाठीं देव नेहमीं उतावळा असल्यामुळें अशीं रत्नें लवकर नाहींशीं होतात. अवघ्या १२ वर्षांत आपल्या गुणानें लोकांना वेड लावणाऱ्या या बालकीर्तनालंकृतिचें चरित्र वाचनीय आहे.

श्री. एन्. सी. केळकर. (सिमला)—.........इतक्या लहान वयांत पुस्तकरूपानें चरित्र लिहिलें जाण्याचें जिच्या भाग्यांत होतें अशी ही बहुधा पहिलीच मुलगी असावी.......मुलीच्या गुणाबरोबर तिला मिळालेल्या जवळच्या अस्थेवाईक आप्तांबद्दलही अभिनंदन करणें जरूर आहे.

ज्ञानप्रकाश--कीर्तनकुमारी शांताबाई यांचें चरित्र जसें विस्मयकारक आहे तसेंच हृदयद्रावकही आहे,......शांताबाईची स्मरणशक्तिच नव्हे तर ग्राहकशक्ति व कल्पकशक्तिही तिच्या वयाचे मानानें कशी असाधारण स्वरूपाची होती या संबंधाची या पुस्तकांत जी हकिकत दिली आहे, ती वाचून कोणाचेंही मन प्रेम-युक्त कुतूहलानें भरून जाईल.......या मुलीच्या अंगच्या उज्ज्वल गुणांचें कीर्तन-रूपानें झालेलें आविष्करण ज्यांनीं पाहिलें आहे त्यांची संख्या शेंकड्यांनींच काय पण हजारांनींही मोजतां येण्यासारखी आहे....प्रस्तुत पुस्तक खऱ्या जिव्हाळ्यानें व वात्सल्य बुद्धिनें लिहिलें असल्यामुळें तें खरोखरच वाचनीय झालें आहे. पुस्तकाची छपाई, बांधणी वगैरे सुबक आहे....

चित्रमय-जगत्:- आमचेकडे शांताबाई जीवनस्मृति या नांवाचें एक १०८ पृष्ठांचें छोटेंसें चरित्र अभिप्रायार्थ आलें आहे. हें लहानसें चरित्र काव्यकल्पलता श्री. सारजाबाई बापट यांचे लेखणींतून उतरलें असून चरित्रविषयक व्यक्तीसुद्धां एक १२ वर्षांची बालिका आहे. बारावर्षांची बालिका ती काय आणि तिचें चरित्र तें काय लिहावयाचें? इतक्या लहानवयांत मरण पावून चारित्ररूपानें मागें जीवंत राहिल्याचें हें पहिलेंच उदाहरण असेल. चरित्रनायिका कीर्तनालंकृति कुमारी शांताबाई हिनें आपल्या कीर्तनकौशल्यानें महाराष्ट्रजनतेस आपल्या छोट्याशा जीवनक्रमांतच चटका लावून ठेविला. त्या जीवनक्रमाचें साग्र व चटकदार वर्णन श्री. सारजाबाई बापट यांनीं ८ प्रकरणांत केलें आहे. चारित्राची भाषा सरळ व हृदयस्पर्शी आहे. श्री. सारजाबाई या कुमारी शांताबाई इच्या आप्त असल्यामुळें त्यांनीं आपलेपणामुळें अयथार्थ गुणगौरव होऊं नये म्हणून मुद्दाम काळजी घेतलेली दिसून येते. तरी लेखिकेच्या कोमल हृदयाला ओझरता पाझर फुटलेला स्पष्ट दिसून येतो. अल्पवयांत मोठी कीर्ति करून सर्वांना चटका लावून गेलेल्या बालिकेचें वर्णन करतांना कोणाचें नेत्र भरून येणार नाहींत? एकंदर चरित्र वाचनीय झालें असून चरित्राचें बाह्यांगही सुबक झालें आहे. शिवाय कु. शांताबाईचें तीन चार हाफटोनचे फोटो व हस्ताक्षर यांचा समावेश पुस्तकांत केला आहे, त्यामुळें चरित्रग्रंथाच्या उपयुक्ततेंत बरीच भर पडली आहे.

श्रीयुत भाऊसाहेब लवाटे-शांताबाई-जीवनस्मृति हें पुस्तक वाचून मनांत अनेक विचार उद्भुत झाले. कुमारी **शांताबाई** असामान्य बुद्धिमती व गुणवती मुलगी होती यांत शंका नाहीं; परंतु माझ्या मनाला तिच्या ज्या गुणानें अतिशय व्याप्त करून टाकलें आहे तें तिचें शील होय. जिकडे तिकडे होणाऱ्या वाहवेनें दुसरी एखादी सामान्य मुलगी केव्हांच अतिशय शेफारून गेली असती, परंतु अत्यंत अल्पवयांत तशा लोंढ्यांत सांपडून, **शांता** इतकी शांत, साधी, विवेकी, निगर्वी, विनयशील व परमेश्वरनिष्ठ कशी राहू शकली यांचेच मनाला राहूनराहून अत्यंत आश्चर्य व कौतुक वाटतें.... सात वर्षांची बालिका असतांना कीर्तनरंगीं जिला एका परमेश्वरमूर्तिखेरीज दुसरें कांहीं एक दिसत नव्हतें व अंतसमयींही जिची ईश्वरनिष्ठा व समाधानवृत्ति एकाद्या महान् योग्याप्रमाणें अचल राहिली तिच्या उदाहरणापासून आपण शिकावें तेवढें थोडें आहे....... **शांताबाई** महाराष्ट्राच्या उद्धारार्थ पुन्हां शिवाजी महाराज आवतरतील, तेव्हां त्यांना सहाय्य करण्यास पुन्हां कोणा भाग्यवानाच्या पोटीं येईल असा मला भरंवसा वाटत आहे......असो, एकंदरीनें **शांताबाई-जीवनस्मृति** हें पुस्तक अनेक दृष्टीनें वाचनीय असें झालें आहे.

भाषाचित्रमयूर श्री. आठल्ये—ह्या लोकोत्तर बालिकेबद्दल काय काय म्हणून लिहावें हेंच सुचत नाहीं. ' मूर्ति लहान पण कीर्ति मोठी अशी एक आपल्यामध्यें म्हण आहे, ती जशी **शांताबाईस** लागू पडते तशीच ती ह्या पुस्तकासही लागू आहे.........इतक्या अल्पवयांत **शांताबाईनें** हजारों विद्वत्समूहापुढें कीर्तन करून कीर्ति मिळविली, इतकेंच नव्हे तर श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्यांकडून ' कीर्तनालंकृति' ही दुर्लभ पदवीही संपादन केली, अशा मुलीचें चरित्र ऐकण्याविषयीं प्रत्येकाला जिज्ञासाही उत्पन्न होणाराच. हें ह्या चरित्र पुस्तकांत फार संगतवार व गोड भाषेनें लिहलें असल्यामुळें फार चित्तवेधक उतरलें आहे. हें चरित्र मोठ्या मोठ्या माणसांनीं तर वाचण्यासारखें आहेच पण लहान मुलामुलींना अत्यंत बोधपर आहे...............

सुप्रसिद्ध सेनापति बापू गोखले-ह्यांची—पतीबरोबर सती गेलेली—सून ही ओंकारांचीच कन्या होती. या पुस्तकांत ओघानुसार घराण्याचाही अल्पसा वृत्तांत दिला आहे. तोही फार वाचण्यासारखा आहे. एकंदरींत सदरहू पुस्तक प्रत्येक महाराष्ट्रीयानें निदान एक वेळ तरी वाचण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

शांताबाई.

जीवन–स्मृति.

प्रकरण १ लें.

बाळपण.

प्रतिभाशाली कीर्तनालंकृति कुमारी **शांताबाईचे** चरित्रास आरंभ करण्यापूर्वी ज्या घराण्यांत या कुमारीकेनें जन्म घेऊन त्यास पावन केलें, त्या घराण्याचा पूर्वेतिहास देणें अगत्याचें आहे पण तो येथें न देतां परिशिष्टरूपानें शेवटीं दिला आहे.

शनवार पेठेंत शनवारवाड्याचे पश्चिमेस श्री. ओंकार यांचे वाडे आहेत. **भास्करराव ओंकार** यांचे मालकीचा एक भव्य वाडा आहे. तो वाडा बांधल्यास १७५ वर्षे होऊन गेलीं आहेत. श्रीमंत पेशवे सरकार यांनीं शनवारचा वाडा बांधल्यावर थोडेच दिवसांत पेशव्यांचे व्याही ओंकार यांनीं हा वाडा बांधला. या वाड्याचें सर्व लाकूड आयनाचें असून वाडा चार मजली मजबूत असा आहे.

या वाड्यास सातखणी (तिघई) कलमदानी दिवाणखाना आहे. तो फार प्रशस्त व सुंदर आहे. असे दिवाणखाने शहरांत फक्त ४।५ ठिकाणींच आहेत. त्या दिवाणखान्याचे दक्षिणेचे बाजूस मुद्दाम केलेल्या बाळंतीणीचे खोलींत ता. १४।१०।१३ मंगळवार रोजीं दुपारीं ३ वाजून १२ मिनिटांनीं **भास्करराव ओंकार** यांच्या पत्नी सौ. **सावित्रीबाई** बाळंत होऊन त्यांना कन्यारत्न झालें. नव-

रात्राचे दिवस नुकतेच गेले होते. नवरात्रांत रोज सप्तशतीचा पाठ ओंकारांचे घरीं नेहमीं चालू असतो. तो पाठ ऐकण्यास सौ. सावित्रीबाई या वर्षी नेहमीं बसलेल्या अढळत. नवरात्रांत सहावे माळेला रात्रीं सौ. सावित्रीबाईंना स्वप्न पडलें. तें सरळ अगर सुसंगत असें त्यांना दुसरे दिवशीं सांगतांच आलें नाहीं. परंतु त्यांमधून जो कांहीं अर्थ निघाला किंवा काढला तो एवढाच कीं, आतां होणारें बालक कन्या असेल तर त्याचें नांव "शांतादुर्गा" असें ठेवावयाचें.

कांहीं कांहींच्या नशिबाचा गुण असा असतो कीं, त्याचें सर्व यथास्थित व्हावयाचें. त्याचप्रमाणें शांताबाईचें होतें. शांताबाईच्या बारश्याचा समारंभ फार मोठ्या प्रमाणावर झाला. पुष्कळ (३०-३५) बाळंतविडे आले व पाळण्यांत घालून या नवीन जन्मास आलेल्या बालिकेचें नांव शांतादुर्गा असें ठेवण्यांत आलें व पुढें ही बालिका शांता या नांवानें संबोधली जाऊं लागली.

तिच्या पुढील आयुष्यक्रमावरून शांता हें नांव अनेक दृष्टीनें सार्थ ठरलें असें दिसून आलें.

शांता एक महिन्याची झाली तों एके दिवशीं तिला सकाळीं झटके आले. त्यानें घरांतील सर्व मंडळी घाबरून गेली. शांताचे आधीं कैक वर्षांत घरांत लहान मूल नसल्यानें या आलेल्या आपत्तीनें सर्वत्र फार घाबरून गेले. डॉ. व्ही. सी. गोखले आणिले. त्यांनीं सांगितलें कीं, येथें वारा बराच लागतो, याकरितां बाळंतिणीस येथून दुसरीकडे हलवावी. त्याप्रमाणें दुसरीकडे शांताचे वडिलांनीं ८ दिवसांचे आंत नवीन खोली बांधली त्या खोलींत बाळबाळंतिणीस ठेविलें. ती अजून त्यांचें इमारतींत " शांतारूम " म्हणून प्रसिद्ध आहे.

गांवांत देवीची साथ असल्यानें लष्करमधील व्हॅक्सिनेटर रा. गोविंदराव पावशे यांजकडून शांतास ता. १३ फेब्रुवारी १९१४

रोजीं देवी काढविल्या. शांताची शांतवृत्ति इतक्या लहानपणांतही स्पष्ट दिसून येत असे. चंद्रप्रकाशासारखा तिचा आल्हादजनक चेहरा पाहून या वेळेपासूनच तिच्या नजीकच्या आप्तेष्टांना तिला प्रेमभरानें घ्यावेंसें वाटें. देवी काढण्याचे आधीं त्याच दिवशीं तिचा फोटो रा. गुणे फोटोग्राफर यांजकडून घरींच काढण्यांत आला होता.

यानंतर लवकरच तिच्या आजोबाचे आग्रहावरून तिचे वडील, मातोश्री व इतर सर्व मंडळी कोंकणांत त्यांचेकडे गेली. हा तिचा पहिला प्रवास होय. शांताचें बोटींत कसें होईल, याबद्दल सर्वत्रांना जरा काळजी वाटत होती. परंतु या सर्व प्रवासांत तिनें कसलाही त्रास न देतां आपल्या खेळकरपणाची कडेलोट केली. आपल्या या नातीवर आजोबांचें प्रेम फारच बसलें. ते आपल्या मुलीस (दुपारीं सर्व एके ठिकाणीं बसली असतां) म्हणाले, सोने, (सावित्री-बाईचें माहेरचें नांव) " ही पोर फार भाग्यवान होईल. हा पाहिलास का हिच्या दोन्ही डोळ्यांमध्यें हिरा चमकल्यासारखा निराळाराच प्रकाश दिसतो." असें म्हणून त्यांनीं शांतास हृदयाशीं धरून तिचे पटापट मुके घेतले. ती खदखदां हांसली. त्या सात्विक वृत्तीच्या वृद्ध आजोबास या वेळेपासून तर ती फारच आवडूं लागली.

ता. २ फेब्रुवारीं १९१५ रोजीं वजनकरतां तिचें वजन १४ पौंड भरलें.

सन १९१४–१५ मध्यें शांताचे वडिलास मुंबईस २०० रु. पगारावर नौकरीवर जावें लागलें. त्यावेळीं शांतासह सर्व मंडळी तिथेंच राहत असत. यावेळीं शांता चांगली चालूं व बोलूं लागली होती. त्यावेळीं ती फारच थोडें बोबडें बोलत असे. तिला तिच्या वडिलांच्या परिचयाच्या एका शास्त्रीबोवांनीं "घनंच भूमौ........" हा श्लोक शिकविला.

हा श्लोक यावेळीं ती स्पष्ट म्हणून त्याचा अर्थ सांगत असे. इतक्या लहान वयांत वरील संस्कृत श्लोक व त्याचा अर्थ स्पष्टपणें ती सांगतांना पाहून प्रत्येकास त्याचें कौतुक वाटे. परंतु हाय ! हाय ! हा श्लोक ती अगदीं पहिल्यांदा शिकली व अगदीं हाच श्लोक मरणाचे आधीं कांहीं तास ती म्हणाली.

ता. १५ मे १९१६ रोजीं **शांता** तापानें व खोकल्यानें फार आजारी पडली. ताप १०४° पर्यंत होता. खोकलाही फार होता. त्यावेळीं डॉ. **सातपुते** यांनीं (भास्करराव ओंकार यांचे प्रेमळ स्नेही) फार कष्ट करून २।३ दिवसांत तिला बरी केली.

येथें हें नमूद करणें अगत्याचें आहे कीं, **शांतावर** प्रेम करणारीं जिवाभावाचीं अनेक माणसें होतीं. त्यांमध्यें तिची बहीण **बयाबाई** ऊर्फ सौ. **राधाबाई आपटे** व तिची मावशी अक्का ऊर्फ श्री. **सारजाबाई बापट** (या पुस्तकाची लेखिका) या प्रमुख होत. या दोघींनीं त्याचप्रमाणें तिच्या प्रेमळ मातापित्यांनीं तिच्या आनंदाकरितां, तिच्या सुखाकरितां काय केलें नाहीं ? शक्य तेवढें सर्व केलें. तिला अनेक बाहुल्या, चेंडू, बाहुल्यांकरितां मुद्दाम तयार केलेले लहान पलंग, पत्ते, नानातऱ्हेचीं खेळणीं, बाजे, बाज्याच्या पेट्या, चित्रें, चित्रांचीं पुस्तकें, खेळामध्यें लागणारीं भांडीकुंडीं, पाटा, वरवंटा, उखळ, जातें, किल्ले, मुद्दाम केलेलीं बाहुलीकरितां लांकडी नमुनेदार घरें वगैरें एक ना दोन काय लिहावें आणि काय नाहीं, इतकें सर्व तिला आणून दिलें. या वस्तु तिनें मरेपर्यंत नीट जपून ठेवल्या होत्या. त्या आतां जागोजाग पाहून तिच्या आईबापांच्या त्याचप्रमाणें लेखिकेच्या मनांत कालवाकालव होत आहे. प्रत्येक वस्तु आमच्या अधू झालेल्या मनास इंगळ्याप्रमाणें दंश करीत आहेत.

सन १९१६ सालीं एप्रिलच्या १७ तारखेस **शांता** मनस्वी आजारी पडली. सात दिवस ताप १०२° ते १०४° असे. खोक-



शांताबाईच्या कुटुंबांतील माणसें.

उभे असलेले शांताबाईचे **वडील.** खुर्चीवरील डावीकडील पहिली तिची **मावशी श्री.सारजाबाई** बापट, दुसरी तिची आई **सौ.सावित्रीबाई ऑंकार,** तिसरी वडील बहीण **सौ. राधाबाई आपटे** खालीं डावे बाजूस तिची धाकटी बहीण **मालती** व उजवे बाजूची **शांताबाई.** (पा.–४).

लाही फार असे. शेवटच्या आजाराचें व या आजाराचें बरेंचसें सादृश्य होतें. यावेळीं तिला तिसरें वर्ष होतें. परंतु तिचें बोलणें, तिची समजूत आश्चर्य करण्याजोगी होती. ती अगदीं शांत असे. अन्न घ्यावयाचें नाहीं, असें डॉ. वझे मास्तर यांनीं सांगितलें होतें. तें तिनें पक्कें लक्षांत ठेविलें होतें. उन्हाळ्याचे दिवस, ताप मी म्हणतो आहे, अशा स्थितींत देखील तिनें खाण्यासंबंधीं घरच्या माणसांस त्रास दिला नाहीं. ताप १०२° खालीं केव्हांच जात नाहीं, व तिची शक्ति क्षीण होत आहे, हें पाहून तिच्या घरच्या माणसांच्या तोंडचें पाणीं पळालें होतें. तीं सर्व चिंताकुल असत. त्यांतच तिच्या कडेलोटीच्या समजूतदार व शांत वागणुकीनें त्यांचीं हृदयें वात्सल्यतेच्या प्रेमातिशयानें व्याकुळ होत.

याच आजारांत ताईला आणण्याविषयीं **शांतानें** पराकाष्ठेचा हट्ट घेतला व तिच्या प्रेमळ ताईनें (बयाताईनें) येऊन तिला हृदयाशीं धरून प्रेमाश्रूनें न्हावूं घालून तो पुरवला. ताई आल्याच्या दुसऱ्या दिवसापासून तिला ताप आला नाहीं व ती या आजारांतून मुक्त झाली.

ता. २० सप्टेंबर १९१६ रोजीं डॉ. **दादासाहेब जोगळेकर** यांनीं तिला इनॅक्युलेट केलें. इनॅक्युलेशन करतांना काय होईल, कसें होईल वगैरे त्यांनीं तिला समजावून सांगितलें होतें व तिनें कसलाहि त्रास न देतां इनॅक्युलेट करून घेतलें. १।२ दिवस जरा त्रास होत होता, तरी तिनें तो अगदीं शांत चित्तानें सहन केला.

प्रकरण २ रें.

विद्याभ्यास.

ता. २५ मार्च १९१७ पासून ती पुणें येथील फिमेल हायस्कूलमधील प्रायमरी स्कूलमध्यें जाऊं लागली. येथपासून तिच्या दिनचर्येस जरा व्यापक स्वरूप प्राप्त झालें. पहिल्यापासून तों अखेरपर्यंत ती याच शाळेंत होती. कोणत्याही वर्षी ती एकाही विषयांत नापास झाली नाहीं.

इंग्रजी पहिल्या इयत्तेंत जाईपर्यंत तिच्या अभ्यास करण्याचे पद्धतीस ठरीव असें कांहींच रूप नव्हतें. केव्हांतरी अभ्यास करून तो ती संपवीत असे. इंग्रजी पहिलीपासून तों अखेरपर्यंत तिच्या अभ्यासाचा कार्यक्रम अगदीं आखल्यासारखा असे. सकाळीं ५॥ चे सुमारास ती उठावयाची. शौचमुखमार्जन व स्नान करून ६ वाजतां ती अभ्यासास दिवाणखान्यांत बसावयाची. नऊ वाजेपर्यंत जेवढा अभ्यास होईल, तेवढा करावयाची. त्या दिवसाचा अभ्यास थोड्या वेळांतच झाला तर (असें पुष्कळ वेळां होई) मागील उजळणी करावयाची. अगर दादांना वेळ असल्यास पुढील धडे, इतिहास, गणितें समजून घ्यावयाची. नऊ वाजले म्हणजे मात्र ती पांच मिनिटेंसुद्धां पुस्तक हातीं धरावयाची नाहीं. मग शाळेमधील अभ्यास होण्याचा राहिला तरी त्याची ती फिकीर करीत नसे. तात्पर्य सकाळीं ६ ते ९ ही वेळ तिची अभ्यासाची असे. या तीन तास अभ्यास करण्याचे पद्धतीबद्दल आम्ही तिची पुष्कळ थट्टा करीत असूं. " अभ्यास असो नसो, तूं आपली मांडी ठोकून बसतेस व केवळ मजुरी सारतेस या हटयोगास म्हणावें तरी काय ? " असें आम्ही तिला

म्हटलें आहे. दादा व दादांची मित्र मंडळी या तिच्या विलक्षण नियमितपणाबद्दल विनोदात्मक टीका करीत.

सुट्टीच्या दिवशीं, कीर्तनाचे दिवशीं अगर अन्य कारणानें शाळेंत जावयाचें नसेल, त्या दिवशीं मात्र या कार्यक्रमांत बराच फरक पडे. अशा दिवशीं ती केंव्हां केंव्हां ९ अगर १० वाजतांही उठे.

इंग्रजीचा अभ्यास करण्याची तिची रीत पुढीलप्रमाणें होती. आधीं नेमून दिलेल्या धड्यांमधील सारा भाग एक वेळ सबंध वाचावयाची. वाचीत असतांना जो शब्द अगदीं नवीन असा तिला वाटे, त्याचे खालीं शिसपेन्सिलीनें – अशी लहान रेघ मारून ठेवावयाची. त्याचप्रमाणें जो शब्द पूर्वीं गेला आहे परंतु त्याचें स्पेलिंग अगर अर्थ चुकत आहे असें वाटें, त्या खालीं ० असें पोकळ टिंब देऊन ठेवावयाची. नंतर एका एक्झरसाईजमध्यें शाईनें – अशी खूण केलेले शब्द उतरून त्यांचा उच्चार व त्यांचा अर्थ लिहून ठेवावयाची. दुसरे वहींत ० अशी खूण केलेले शब्द पेन्सिलीनें उतरून ठेवावयाची. ही दुसरी वहीच तिला महत्त्वाची वाटे. ती तिच्या खास उपयोगाकरितां असे. उजळणी करतांना अगर परिक्षेचे वेळीं याच वहीवरून सर्व उजळणी करावयाची. शाईनें लिहिलेल्या एक्झरसाइजचा ती क्वचितच उपयोग करी शब्दांचे उच्चार, स्पेलिंग व अर्थ हे सर्व तयार झाल्यावर नेमून दिलेला भाग, अर्थ ध्यानांत घेऊन ४।५ वेळां वाची. अशा रीतीनें तयार झालेला धडा ती कधींही विसरत नसे.

इतिहास—इतिहास तयार करतांना नेमून दिलेला भाग ती एकदां संथपणानें वाची. मुसलमान, इंग्रज वगैरे लोकांची व गांवें वगैरेंचीं अवघड नांवें असतील त्या नांवाखालीं वर सांगितल्याप्रमाणें ० अशी खूण करून ठेवी. नंतर खुणा केलेलीं नांवें

नीट लक्षांत राहण्याकरितां त्याचें स्वस्थ चित्तानें मनन करी. नांवाचा विवक्षितपणा ध्यानांत ठसावा याकरितां व्यवहारमधील जवळजवळ सादृश्य असणाऱ्या शब्दांशीं त्याचें मिलन करून ठेवी. जसें पांदेचिरी या गांवाचें नांव कांदेचिरी या व्यावहारिक शब्दासारखें आहे, हें ध्यानांत धरून तिला पांदेचिरी हें नांव आठवें. असे अनेक शब्दसादृश्याचे मासले तिनें ध्यानांत राहण्याकरितां तयार केलेले देतां येण्याजोगें आहेत. अवघड नांवें एकदां तयार झालीं कीं, मग नेमून दिलेला ऐतिहासिक भाग २।४ वेळ वाचावयाची, कीं तिचा तो भाग तयार व्हावयाचा. नंतर उगीच गमतीखातर इतिहासाच्या मागचा पुढचा भाग थोडथोडा वाचून टाकावयाची. तिची इतिहास करण्याची ही पद्धति होती.

वर दिलेल्या पद्धतिनें ती इंग्रजी व इतिहास हे विषय तयार करी, व त्या पद्धतीनें अल्प अवधींत ते तयार होत.

भूगोल—या विषयाबद्दल तिला फारशी आवड नसे. यांत तिची चांगलीशी तयारी नसे. हा विषय ती कसातरी करून वर्गाबरोबर राही.

मराठी—मराठी हा विषय तिचा सर्वांत उत्तम होता. कीर्तनाच्या व्यासंगामुळें तिजजवळ शब्दाचा भरणा तिच्या वयाच्या मानानें ओतप्रोत होता. तिची विचारसरणी, समयसूचकता कीर्तनामुळें फारच उच्च दर्जाची बनलेली होती. पठणशक्तीचा इतका विकास झाला होता कीं, २।३ वेळ तिनें वाचलें कीं, वाचलेल्या ओळी तिच्या पाठच झाल्यासारख्या होत. अलीकडे अलीकडे तर ह्या गोष्टी वरचेवर नजरेस येत. लहान मुलांकडून पाठ करून घेऊं नये, असें जें अलीकडे बरेच वरिष्ठ दर्जाचे लोक म्हणतात त्या विरुद्ध दादांचें मत आहे. त्यांचें म्हणणें बाळपणींच

ज्या बालकाची पठणशक्ति वाढली असेल, त्यांचीच स्मरणशक्ति उत्तरोत्तर चांगली राहते. मोठमोठ्यांनीं तोंडांत बोटें घालावीं, अशी शांताबाईची पठणशक्ति व स्मरणशक्ति वाढलेली होती, हें " कीर्तन " या प्रकरणांत वर्तमान पत्रांचे उतारे दिले आहेत त्यांवरून ध्यानांत येण्याजोगें आहे. असो. या वरील कारणामुळें तिचें मराठी जात्याच उत्तम होतें. मराठींत निबंध लिहिण्यास शाळेंत देत, त्यावेळीं **शांताबाईचा** निबंध उत्तमच ठरे. तो निबंध वर्गांत बहुतेक वेळीं वाचून दाखविण्यांत येई. त्यांवर वर्गांवरील अध्यापिकेचे शेरे ' चांगला ' ' उत्तम ' ' सर्वोत्कृष्ट ' असेच असत. त्या निबंधांत कांहीं तरी नवीन कल्पना दृष्टीस पडावयाच्याच. मराठीचा अभ्यास तिला कधींच फार करावा लागला नाहीं.

गणित—हा विषय जरी तिचा चांगल्यापैकीं झालेला होता, तरी त्याचे पुरे मार्क तिच्या पदरांत पडले असें क्वचितच होई. उदाहरणाच्या रीती तिला चांगल्या अवगत होत्या त्या तिला लवकरच समजत. परंतु उदाहरणें सोडवितांना ती गुणाकार, भागाकार, बेरीज अगर वजाबाकी करतांना कुठें तरी चूक करून उत्तर भलतेंच काढून ठेवी, असें शेंकडा ५० वेळां तरी होई. सतरा· साती एकूणतिसासें करावयाची, सत्तावीस आणि आठ तेहेतीस करावयाची, अशा तऱ्हेच्या चुका तिच्या होत. तिची इतर बुद्धिमत्ता लक्षांत घेतां असें कां होई, हें कळत नसे. परंतु असें केव्हां केव्हां होई, हें खरें. ती गणितांत नापास अशी केव्हांच झाली नाहीं. परंतु जिथें तिला ८०—९० व केव्हां केव्हां शंभरांपैकीं १०० मार्क मिळावयाचे तेथें तिला ४०|५० मार्क मिळत.

सन १९२४ सालीं परिक्षेचे आधीं अडीच महिने गणित विषयाची काळजी घेण्याकरितां रा. रा. **पानसे** मास्तर ठेविले होते. त्यांच्याही लक्षांत हा तिचा दोष आला. त्यांनीं वरील मुदतींत

दादांचे जवळ २।३ वेळां उद्गार काढले कीं, " शांताबाईला गणिताच्या रीति चांगल्या माहीत आहेत, अवघड उदाहरणें देखील सहज सोडवूं शकते, परंतु बेरीज व वजाबाकींत घोंटाळा करून चुका करते, याला मास्तरांनीं आतां काय करावें ? " तरी त्यांनीं नानातऱ्हेचे प्रयत्न करून तिजमध्यें बरीच सुधारणा केली.

ता. १६ फेब्रुवारीं १९२५ रोजी शांताची मराठी सातवीं व इंग्रजी ३ रीच्या परीक्षेस सुरवात होऊन ता. २० रोजीं परीक्षा संपली. ती सर्व विषयांत पास होऊन इंग्रजी ४ थी मध्यें गेली. या वर्षीं तिला गणितांत चांगले मार्क मिळाले. तिला या परीक्षेंत पुढील प्रमाणें मार्क मिळाले.

इंग्रजी	१०० मार्कांपैकीं	६१ मार्क मिळाले
मराठी	१०० ,,	६२ ,,
गणित	१०० ,,	६० ,,
इतिहास } भूगोल	१०० ,,	३५॥ ,,
सायन्स	५० ,,	२५ ,,

या वर्षीं भूगोलाचे प्रश्न बाहेरचे न शिकविलेले आले असल्यामुळें सर्वच इयत्तेस हा पेपर अवघड गेला. त्यामुळें या विषयांत मार्क कमी पडले.

सकाळीं ६ ते ९ पर्यंतच अभ्यास करण्याचा तिचा नियम अव्याहत चालू होता, हें वर सांगितलेंच आहे. वेळेवर शाळेंत जाण्यास ती कधींच चुकली नाहीं.

शाळेमधील तिची वागणूक वाखाणण्यासारखी असे. शिस्ती बाहेर ती केव्हांच वागली नाहीं. ती प्रत्येक वर्गांत वयानें व चणीनें सर्वांपेक्षां लहान असल्यानें तिला वर्गांत व परिक्षेचेवेळीं स्वतंत्र व

ठेंगणें असें डेस्क देण्यांत येत असे. तिच्या वर्गावर शिक्षकिणी असत, त्या तिजविषयीं फार सहानुभूति दाखवीत. बिगारीचे वर्गावर मिसेस शेराबाइ स्याम्युअल नांवाच्या बाई होत्या त्या तिच्या प्रेमळ वागणुकीची नेहमीं प्रशंसा करीत. त्या बाईही शांताबाईच्या निधनवार्तेनें हळहळत आहेत.

इंग्रजी पहिल्या इयत्तेवर मिस जुवेकर बी. ए. दुसरीवर मिस् वेणुबाई पानसे बी. ए. तिसरीवर मिसेस हरिडबाई या शिक्षकिणी होत्या. त्या सर्वांचें शांताबाईच्या वागणुकीबद्दल उत्तम मत असे. शांताबाईबद्दल त्या फार फार हळहळत आहेत. शांताबाईला त्यांच्याबद्दल फार फार आदर वाटत असे. तिनें एक दिवसदेखील त्यांच्याबद्दल उणे उद्गार काढले नाहींत. तिला आपल्या शाळेबद्दल व विवक्षित शिक्षक वर्गाबद्दल अभिमान वाटत असे.

शाळेंत अगर दुसरें कोठेंही तिजविषयीं कोणी कुत्सितपणानें टीका केली, तर त्याचा तिला कधींही विषाद वाटत नसे. भांडण अगर तक्रार तिची कधींच घरच्या मंडळींकडे आली नाहीं.

शांताबाईची शरीरयष्टि तिच्या मनोवृत्तीप्रमाणें कोमल असे. तिला ड्रील करणें आवडत नसे. तिला ड्रील करावें लागूं नये म्हणून तिनें आपल्या वडिलांकडून मे. लेडीसुपरींटेन्डन्टना पत्र लिहविलें होतें. त्यावरून तिला ड्रीलची माफी मिळाली होती.

तिची विशेष अशी मैत्री शाळेंत कोणाशींच झाली नाहीं. नाहीं म्हणायला इंग्रजी दुसरींत असतांना प्रयाग ऊर्फ ताई देशपांडे हिच्याशीं तिचा स्नेह जडला. व तो अखेरपर्यंत कायम होता. खरीं प्रेमाचीं म्हणून जीं माणसें होतीं, तीं सर्व घरचीं व आप्त मंडळीच होतीं.


शाळेंतून ती पांच वाजण्याचे सुमारास घरीं येई. घरीं आल्यापासून निजेपर्यंत तिनें कधींही अभ्यासाचें पुस्तक हातीं घेतलें नाहीं. शाळेंतून आल्यानंतर ती हात, पाय, तोंड पाण्यानें धुवून टाकून नंतर कांहीं तरी खाई. मग ती आपल्या वाड्यापुढील अंगाणांत आपल्या लहान बहिणीस व वाड्यांतील लहान मुलांस घेऊन खेळे. केव्हां केव्हां आपल्या लहान बहिणीस शिकविणें व गाणीं म्हणणें, पेटी वाजविणें हे व्यवसाय करी. रात्रीं ८ चे सुमारास जेवण्याचें होई, त्यावेळीं सर्वांबरोबर जेवी. कांहीं कारणानें जेवणास येण्यास दादांना (तिच्या वडिलास) उशीर असला, तर ती दादा येईपर्यंत थांबे. दादांची व तिची पंगत सकाळीं होत नसे. कारण तिला शाळेंमुळें ९॥—१० वाजतां जेवावें लागें. या कारणानें रात्रीं ती दादांचेशिवाय जेवीत नसे. जेवतांना अगदीं ठरल्याप्रमाणें दादा शाळेंतील व इतर हकीकत विचारीत. व त्यासंबंधीं खल चालून जेवण संपे. नंतर ती १० वाजेपर्यंत दिवाणखान्यांत सर्व मंडळीबरोबर गप्पागोष्टी करीत बसे. यावेळीं वाचलेल्या अगर ऐकलेल्या—ऐतिहासिक, पौराणिक गोष्टी अगर चुटके वगैरे एकमेकांना सांगून हास्यविनोद चाले. १० वाजले कीं, **शांताबाई** झोंपावयास जाई. ती हंतरुणावर पडली कीं बहुतेक ५।१० मिनिटांत तिला झोंप लागे.

अगदीं आरंभापासून म्हणजे सन १९१७ पासून तिला शाळेंत नेण्याकरितां व परत आणण्याकरितां कोणीतरी बाई ठेवलेली असे. आरंभापासून शेवटपर्यंत मिळून एकंदर तीन चार बाया झाल्या. त्यांच्याशीं तिचें वर्तन मनमिळावूपणाचें, सौम्यपणाचें असें. तिच्या दुःखदमृत्यूनंतर त्या भेटण्यास आल्या, त्यावेळीं त्यांनीं सद्गदित अंतःकारणानें काढलेल्या दीन उद्गारावरून तें स्पष्ट दिसून

आलें. त्या आलेल्या बायांतील एक म्हणाली कीं, " कसं आमचं रतन गेलं. काय बाईच गुण सांगूं, कितागबाई शहाणपण! कवा कवासुद्धां बाईनें आम्हांला तरास दिला नाहीं. लहानपणीं मी त्यांना कडेवर घेऊन न्यायची, त्यावेळीं एकदां त्या म्हणाल्या, " मी एवढी मोठी पांच वर्षांचीं झालें, तरी खुशाल तुमच्या कडेवर बसतें, हें पाहून तुम्ही मला हंसत असाल नाहीं बरं? परंतु मला कनी गाड्या घोड्यांची व गाई म्हशींची फार भीति वाटते. काय तें बोलणं!" असें म्हणून हात व डोकें आपटून रडूं लागल्या व निमित्तावर टेकलेल्या आमच्या मनाला त्यांनीं बेसुमार रडवलं. रडणं हाच आमचा तूर्त तरी अवश्यक व्यवसाय होऊन बसला आहे.

परंतु हें आम्ही काय करीत आहोंत? राजे रजवाडे, संस्थानिक यांचेकडे अशी " रुदनागारें " अगर " रुदनगृहें " स्वतंत्र बांधलेलीं असतात. त्यांतच जाऊन त्यांनीं दुःखावेग हलका करून घ्यावयाचा असतो. (असें पुराणांतरींच्या गोष्टींवरून दिसतें.) त्याप्रमाणें आम्हीं एक स्वतंत्र, अगदीं स्वतंत्र, प्रकरण या दुःखसरितेकरितां राखून ठेविलें असतां आम्ही हें काय करीत आहोंत? परंतु हा राखीवपणा, हा सुसंगतपणा कोणाकरितां असतो? अगर त्याचा उपयोग आखीव मार्गानें कोण करूं शकतो? ज्यांचीं मनोवृत्ति विकाररहित व विचारयुक्त असेल, तेवढेंच तसें करितात. परंतु आमची स्थिति तशी नाहीं. विचार राहिलाच नाहीं. दुःखविकारानें मनोवृत्ति कांठोकांठ तुडुंब भरली असल्यानें तिचा वरचेवर कितीही अवरोध करण्याचा प्रयत्न केला, तरी ती उचंबळून येतेंच. आतां आम्ही बेदरकार घरींदारीं स्वयंपाकघरांत, देवघरांत, बाजारांत, सडकेवर फार काय

अत्यंत शुभसमारंभांत रडणारच. हल्लीं आमचे तेच मित्र झाले आहे. शांताच्या पवित्र मूर्तीची व तिच्या सार्वभौम आत्म्याची अश्रू ही खंडणी आहे. राजनिष्ठ मांडलिकाप्रमाणें ती आम्हांस आविरल अश्रूरूपी मालेनें शांतास अर्पण केलीच पाहिजे. यावेळी तरी आम्हांस अश्रू आवरणें शक्य नाहीं. तेव्हां आतां लेखनाचें काम बाजूस सारून मनसोक्त अश्रू ढाळण्याचें कार्यास लागतों.



प्रकरण ३ रें.

मधल्या काळांतील गोष्टी व स्वभाववर्णन.

मागील प्रकरणांत शाळेंतील शिक्षणासंबंधीं वयाच्या ४ थ्या वर्षांपासून तों अखेरपर्यंतच्या ठळक गोष्टींचें टांचण दिलें आहे. या प्रकरणांत तिच्या मधल्या काळांतील दुसऱ्या कांहीं गोष्टीं-संबंधीं लिहिणार आहोंत. अगदीं जिव्हाळ्याचा असा तिचा कीर्तन विषय होता. त्यासंबंधीं ऊहापोह या पुढील स्वतंत्र प्रकरणांत करणार आहोंत.

प्रवास––तिच्या आयुष्यामधील पहिला प्रवास म्हणजे मागें उल्लेख केलेला रत्नागिरीचा होय, व शेवटचा प्रवास येवल्याचा होय. मध्यंतरीं कीर्तनाचे निमित्तानें तिचा प्रवास फारच झाला. त्याचप्रमाणें आप्तेष्टांकडे कांहीं कांहीं वेळां ती गेली आहे. अवघ्या १२ वर्षांच्या लहानपणाच्या आयुष्यक्रमांत रत्नागिरी, फुरसुंगी, लोणी, ठाणें, मुंबई, वेळापूर, पंढरपूर, नाशिक, धरण-गांव, अंमळनेर, कुर्डुवाडी, तळेगांव, सिंहगड, अक्कलकोट, येवलें वगैरे ठिकाणीं तिचें जाणें येणें झालें.

पांच वर्षांनंतर जेवढे म्हणून प्रवास झाले, तेवढ्या प्रवासामध्यें ती त्या त्या गांवचीं देवालयें व ऐतिहासिक प्रसिद्ध अप्रसिद्ध स्थळें हटकून पहावयास जात असे, व त्या त्या स्थळांविषयींची माहिती करून घेत असे. अशा माहितीचीं कांहीं कांहीं ठळक टांचणें तिच्या डायरींत लिहिलेलीं आहेत.

शांताबाईचे वेळोवेळचे तत्त्वविचार.

पंढरपूरच्या श्री पंढरीनाथाचें दर्शन घेण्याची तिची इच्छा फार दिवसांची असल्यानें तिच्या घरची मंडळी पंढरपुरास ता.

१४।२।२३ रोजीं गेली. दादा (तिचे वडील) मात्र गेले नव्हते. एक दिवस आम्ही सर्वजण जोडे काढून ठेवून अनवाणी गांव-प्रदक्षणा चालूं लागलों. ही दुपारची वेळ होती. प्रदक्षणेची दीर्घ-वाट चालत असतां वाट सोडून भलतीकडेच गेलों. वाट दाख-विणाऱ्यावर आम्ही बरेंच रागावलों. तोही कांहीं तेथील रहिवासी नव्हता. पाय फारच भाजूं लागले. शांताबाई तर गोरीमोरी झाली होती. परंतु आम्ही रागावलों असें पाहून ती हंसत हंसत म्हणाली, " रागावण्यानें कांहीं आपण योग्य मार्गावर येऊं असें नाहीं. बरें, त्यांनींही कांहीं हेतुपुरःसर वाट चुकविली नाहीं. त्यांतूनच देवा प्रीत्यर्थ आपणांस कष्ट पडत आहेत. चित्रगुप्त पुण्य जमा करतांना या कष्टाचा जमाखर्च जरा सढळ हातानेंच करील. " हें अगदीं हेच तिचे उद्गार त्यावेळीं निघालेले होते. अशा समजूतदारपणाच्या कैक गोष्टी हमेषा घडत असत.

दरवर्षीं उन्हाळ्याचे आधीं ती हटकून आजारी पडे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बहुतेक ताप यावयाचा. एक वेळ १९२३ सालीं याच सुमारास तिचे डोळे आले होते. त्यावेळीं ती जितकी त्रासिक बनली होती, तितकी त्रासिक तिच्या सर्व आयुष्यांत ती कधींही झाली नव्हती. त्यावेळीं अकलेच्या, गूढ अर्थाच्या—तत्त्ववेत्त्यास साजतील अशा—कैक गोष्टी आणि वाक्यें ती बोललेली आहे.

पुढें दिलेलीं वाक्यें, म्हणीवगैरे डोळे आले होते त्या आठ-वड्यांतच प्रसंगा प्रसंगानें बोलली होती.

१ डोळे ही अजब चीज आहे. जें काय होणें तें डोळ्यां-समोर (नजरेसमोर) झालेलें बरें. दृष्टि नाहींशीं झालेल्या जिवंत धडासमोर अत्यंत रूपवान देवाची गोडमूर्ती अगर त्याच आका-राचा ओंगळ दगड सारखाच ? "

२ " स्वामी रामतीर्थांनीं म्हटलें आहे कीं, डोळे मिटण्याचे वेळीं (पश्चात्तापानें) डोळे उघडतात. परंतु त्या उघडण्याची त्या वेळीं किंमत काय राहते. "

३ " बर्फ कोरडा करण्याचा प्रयत्न किती निरुपयोगी व हस्यास्पद आहे ! तो या प्रयत्नांत सर्व नाहींसा होऊन जाईल परंतु कोरडा म्हणून व्हावयाचा नाहीं. " अंगींकृतं सुकृतिनः परिपालयंति. "

४ " बारशाचें सुखसोहाळें बारावा करावयाला लावतात. "

५ डोळ्याचे आजारांत तिची आई तिच्या त्या पराधीनतेच्या स्थितींत तिला फार जपे. त्या प्रसंगास उद्देशून ती म्हणाली:— " स्वार्थ व अप्पलपोटेपणा विसरावयास शिकावयाचें असेल, तर तें आईपाशींच शिकावें, असें मी वाचलें आहे त्याची प्रचीती या आजारांत मला चांगली आली. "

६ " मी आतांशीं त्रासिक बनलें आहे. मला राग मनस्वी येतो. माझ्या रागाचा दुसऱ्यास तर त्रास होतोच होतो, परंतु मला तरी कोठें सुख होतें ? डोकें तापतें, डोळे जास्त ठणकतात. ' दुसऱ्या पदार्थांची राखरांगोळी करतांना आपल्या देहाची होळी करून घेत आहोंत, याची जाणीव आग लावणाऱ्या काडीला नसते. ' असें म्हणतात, तें अगदीं खरें आहे. "

७ गोष्टीवरून गोष्टीनिघाल्या असतां ती आपल्या वडिलास म्हणाली " दादा, आपण कैकवेळां निरर्थक गोष्टींचा ऊहापोह करून एकेमकांचीं मनें दुखवितों. एखाद्या लहान मुलांस ' तूं देवघरांत जाऊन देवास शिवलास कीं काय ! खरें सांग नाहींतर पहा मग. ' असें आईनें म्हणून त्रागा करण्यांत काय अर्थ आहे ? कारण देवास तो शिवला असला तरी देवास आंघोळ घालावयची किंवा मुलास अंघोळ घालावयाची असें थोडेंच आहे ? मग एवढा अट्टाहास

कशाला हवा ? त्यापेक्षां देवाला शिवूं नये, हें सांगणेंच पुरेसें आहे. ''

ह्यासारखे जे उद्गार तिच्या तोंडांतून निघाले, ते बहुतेक सर्व तिनें कुठें तरी वाचले अगर ऐकलेल्यांपैकीं होते. त्यांपैकीं कांहींचा समावेश कीर्तन–सुधा भाग २ यामध्यें सुबोध वचनांत केला आहे.

स्वरूप वर्णन—शांताबाई सुस्वरूप नव्हती, तरी ती कुरूपही नव्हती. नाक जरा बसकें होतें, डोळे पाणीदार व तरतरीत, चेहरा वाटोळा व नेहमीं हंसतमुख असा, वर्ण निमगोरा, उंची मध्यम, बांधा जरा ठेंगू परंतु रेखीव असा होता.

स्वभाव—तिची वृत्ति अत्यंत शांत व समाधानी असे. कामकाजांत ती बरीच चेंगट असे, बुद्धी तीव्र, स्मरणशक्ति असाधारण. ग्रहणशक्ति विलक्षण अशी असे. ती किंचित् भोळी असे. देवावर परिपूर्ण निष्ठा असे. तिचा करारीपणा व दयाळुपणा हे गुण रोजच्या व्यवहारांत देखील निदर्शनास येत. वागणूक सौम्य, सोशिक व सुशील अशी असे. त्यांचप्रमाणें कांहीं प्रसंगीं ती अत्यंत हट्टी असे. तिला स्वाभाविकच भावी रहाणी आवडे. डामडौल बिलकुल आवडत नसे. तिचे कपाळीं कधींच लहान कुंकवाची टिकली नस. नेहमीं ठळक व मोठें कुंकूं ती लावी. तिनें डोक्यांत फुलांची वेणी कधींच घातली नाहीं. नेहमीं गजरा घाली. आई, बाप, ताई व अक्का यांच्यावर तिची विलक्षण भक्ति असे. त्यांना तिनें क्वचित्च दुखविलें असेल. त्यांतले त्यांत **दादांच्यावर** (वडिलांवर) विलक्षण प्रेम असें. बहुतेक तिचा काळ त्यांच्याच सहवासांत जात असे. हें त्यांच्याकडे येणाऱ्या लहान-थोर मंडळीस माहीत असे. आम्ही सर्वत्रांनीं पुष्कळ आठवणी करून पाहिल्या, परंतु ती एकवेळसुद्धां थट्टेत अगर केव्हांही खोटें बोलल्याचें आठवत नाहीं. तिच्या हातून चूक झाल्यास ती बिनहरकत एकदम

कबूल करित असे. अलीकडे ती आपल्या देवाची पूजा स्वतः करीत असे. तिच्या चेंगटपणामुळें पूजा पुरी होण्यास तिला पाऊण तास लागे. परसाकडणें, तोंडधुणें, अंगधुणें यांसही तिला तेवढाच वेळ लागे; व या दीर्घसूत्रीपणाबद्दल हमेश तिला आईचीं बोलणीं खावीं लागत. परंतु ती स्वयंभूच दीर्घसूत्री असल्यानें तिच्या चेंगटपणांत केव्हांच बदल झाला नाहीं. याकारणामुळें वेळोवेळीं तिची प्रेमळ आई तिला बोलत असे पण ते शब्द त्या माऊलीच्या मनाला आतां फार क्लेश देत आहेत. याबद्दल आम्ही जास्त लिहूं लागलों तर भलतीकडेच वाहवूं, या भीतीनें आम्ही आपला हात आखडतां घेतों.

हट्टीपणाः—एके दिवशीं कांहीं क्षुल्लक हट्टावरून **दादांनीं** (तिच्या वडिलांनीं) वर्तमान पत्राच्या घडीनें तिला एकदोन रपाटे लगावले. त्यावेळीं तिचें वय ६ वर्षांचें होतें. परंतु त्यानें ती न नमतां तिनें आपला हट्ट चालूंच ठेविला. त्यांवर त्यांनीं आणखी चार पांच रपाटे दिले. त्यानें तर ती फारच खवळून जाऊन "मारा, मारा, वाटेल तेवढें मारा" असें म्हणून हालचाल न करितां निमुटपणें तढाखे खात राहिली. ह्या तिचा विचित्रपणा पाहून तिच्या वडिलास व आम्हांस फारच भीति वाटली. आम्हांस शंका आली कीं, हिचा मेंदु तर बिघडला नाहीं ! तेव्हां मारण्याचें बंद करून तिच्या मेंदूमध्यें कांहीं बिघाड तर झाला नाहींना, हें पाहण्याच्या हेतूनें आम्हीं तिच्याशीं नमतें घेऊन बोलूं लागलों व तिचा हट्ट पुरवला; तेव्हां ती थांबली. तेव्हांपासून आमचेपैकीं कोणीही तिला पुढें शारिरिक शासन केलें नाहीं, व पुढें पुढें तसें करण्याच्या वेळाही आल्या नाहींत. तिच्या हट्टाचा प्रकार निराळाच असे. "आई मला साडी नेसव" असें तिनें एकदां म्हटलें आणि "मी मग नेसवीन आतां मला वेळ नाहीं" असें तिच्या आईनें सांगितलें तर तें **शांताबाईस** पटायचें

नाहीं. हट्टास सुरवात झाली कीं, "आई मला साडी नेसव" एवढें वाक्य ती ५०।७५ वेळां एकसारखे (साडी नेसवण्याचें कबूल करीपर्यंत) म्हणत राही. असाच प्रकार नेहमींच्या हट्टाचा असे.

तिचें अत्युत्तम कीर्तन येथील **श्रीशिवजीमंदिरांत** झाल्यानंतर एके दिवशीं ती असाच कांहीं हट्ट घेऊन बसली होती. त्या दिवशीं ती नाहली असल्यानें केस पाठीवर अस्ताव्यस्त पडले होते. ती हातपाय पसरून रडक्या आवाजांत (हट्टाच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें) एकच वाक्य सारखें बडबत होती. इतक्यांत येथील प्रसिद्ध नागरिक श्रीयुत **बाबूराव गोखले** तिच्या **दादांकडे** कांहीं कामानिमित्त आले. त्यांनीं " **भास्करराव** आहेत का ? " असें विचारलें, तेव्हां त्यांचे नजरेस **शांताबाईचे** आकांडतांडवचित्र दृष्टीस पडलें. ती **बाबूरावास** पाहतांच फारच ओशाळली. " **शांताबाई** तुमचें चालूं द्या, मी त्यांचा खालीं शोध करतों " असें म्हणून **बाबूराव** खालीं गेले. परंतु याचा परिणाम-या ओशाळण्याचा परिणाम--तिजवर चांगलाच झाला. तिनें या पुढें हट्टच—असला हट्टच—केला नाहीं. ही १९२३ मधील गोष्ट आहे. हीं तिच्या हट्टाचीं उदाहरणें होत.

निगर्वी स्वभाव:—तिला गर्व कसा तो माहीतच नव्हता. इतक्या लहान वयांत सर्व महाराष्ट्रांतील विद्वान मंडळींत बोलबोला झाला असतांही तिला त्याबद्दल गर्व झाला नाहीं ती आपल्या बरोबरीच्या मुलींत मोकळेपणानें मिसळत असे. ती प्रत्येक गोष्टीमध्यें सरळपणा राखीत असे. कोणत्याही गोष्टीबद्दल तिला बरें, वाईट म्हटल्याचा विधिनिषेध नसे.

निर्विकारवृत्ति:—मराठी चौथीच्या गणिताच्या वार्षिक परिक्षेंत तिला सर्व गणिताच्या रीति चांगल्या येत असूनही बेरीज वजा-

बाकींत चुका केल्यानें तिचीं तीन गणितें चुकल्याचें तिच्या वडिलांच्या नजरेस आलें. तेव्हां ते तिला फार बोलले. "तूं महामूर्ख आहेस. पहिल्या इयत्तेंतील मुलींदेखील बेरीज, वजाबाकींत चुका करणार नाहींत, त्या तूं केल्यास; तुला काय येणार? तूं महा ठोंबी निघणार" वगैरें वगैरें. यावेळीं रात्रीचे ९॥ वाजले होते. आम्ही सर्व मंडळी दिवाणखान्यांत बसलों होतों. शांताबाई तेथेंच सतरंजीवर पडून दादांचें बोलणें ऐकत होती. बराच वेळ बोलून झाल्यावर आपण ज्यावर रागावलों तो प्राणी खुशाल पुराणा सारखें नुसतें ऐकून घेत आहे, असें वाटून व तें सहन न होऊन **दादानीं** तिला हाका मारून " मराठीच्या प्रश्नांचीं उत्तरें तरी बरोबर दिलीं आहेस कां ? " असें कांहींसें सौम्य आवाजांत विचारलें परंतु उत्तरच येईना. हें पाहून तिची आई अगदीं तिच्याजवळ बसली होती, तिनें तिला हालवून " अग **शांता**, अग **शांता** " अशा हाका मारल्या. परंतु उत्तर नाहीं. हें पाहून तिच्या आईनें हंबरडा फोडला. " पाहाहो पोरीचें काय झालें " असें ती म्हणतांच **दादांचाही** जीव घाबरून ते तिचेजवळ जाऊन तिला हालवूं लागले, तरी कांहीं नाहीं. आम्ही सर्व रडूं लागलों. **दादांही** घाबरून गेले. " हार्ट फेल्युअर " ची (काळीज बंद पडून मृत्यू आल्याची) एका मुलाची केस नुकतीच आमच्या घराशेजारीं झाली असल्यानें आम्हांस दे माय धरणी ठाय असें झालें. बरीच हालवल्यावर ती एकदांची जागी झाली व आम्ही सर्व तिच्या भोंवताली गराडा घालून सारखें रडतांना पाहून तिला कसेंसेंच वाटलें. 'हेंग काय आई ?' काय झालेंग ? असें तिनें म्हणतांच आम्हांस परमावधीचा आनंद झाला. दादांनीं तिला हृदयाशीं धरून सर्व हकिकत सांगितली. त्यावर ती लडिवाळपणानें म्हणाली, " **दादा**, मी आज

फारच दमलें होतें. त्यांतून तुम्ही रागानें बोलत होतां, तें ऐकतां ऐकतां मला गाढ झोंप लागली. पण या सर्व कृत्यानें तुम्हीं कितीही रागवलात, तरी तुमच्या सर्वांचें मजवर किती गाढ प्रेम आहे, हें मला कळलें. हें तिच्या बालवृत्तीचें-निर्विकारवृत्तीचें-उदाहरण होय.

करारीपणा:—वयाच्या ८व्या वर्षापर्यंत ती सकाळीं चहा घेत असे, परंतु तिची ताई चहा घेत नसल्यामुळें व चहा पासून अपाय होतात. **महात्मागांधी** चहाच्या विरुद्ध आहेत, वगैरे गोष्टी तिच्या ताईनें तिला सांगितल्यामुळें ती ताईच्या गांवांहून परत येतांच तिनें आजिबात चहा सोडून दिला. ती कॉफी घेत असे. सर्वांकरितां घरांत चहा होई व तिच्याकरितां कॉफी रोज करावी लागे. यावरून तिचे वडील तिला एके दिवशीं रोषानें बोललें. यानंतर तिनें आपल्या आईस स्पष्ट सांगितलें कीं, मजकरितां मुद्दाम कॉफी केली, तर मी घेणार नाहीं. तिनें मरेपर्यंत केव्हांच चहा घेतला नाहीं. याची प्रचीती ती जेथें जेथें म्हणून पाहुणी गेली व गांवांत परिचित माणसांकडे गेली त्या सर्वांस आहे. त्याचप्रमाणें तिजकरितां म्हणून मुद्दाम कॉफी केली असतां ती प्यायली नाहीं. यावरून व इतर अनेक कारणांवरून तिचा करारीपणा दिसून योगायोग असे.

समय विशेष जाणून काम करणें:—सन १९२४ सालीं आश्विनांत तिचा वाढ (शेवटचा) दिवस झाला. आम्हां आभाग्यांना तो शेवटचा वाढ दिवस आहे, याची जाणीव जर त्यावेळीं असती, तर—तर काय भगवान जाणें. त्या दिवशीं श्रीखंड पुरी केली होती. **शांताबाई** वगैरें सर्वांचीं जेवणें यथास्थित झालीं. परंतु आम्ही घरांतील ४।५ जणी जेवणास बसलों, त्यावेळीं पुऱ्याचा तुटवडा आला. आम्ही एकमेकींवर लोटीत होतों कीं, "आमकीनेंच रवा कमी भिजवला तरी मी म्हणत होतें कीं, एवढा रवा कसा पुरेल ? " यावर तिची आई म्हणाली कीं, वाढदिवस कांहीं बरोबर

झाला नाहीं. असा कधींच तुटवडा आला नाहीं **शांताबाईला** तरी पुऱ्या भरपूर वाढल्या किंवा नाहीं कोणास ठाऊक !" यावर **शांताबाई** म्हणाली. "आई, मला अगदीं भरपूर झालें. तुम्हाला पुऱ्या कमी पडल्या हें खरें, परंतु त्याला अजून उपाय आहे. हें पहा मी आतां पुऱ्या करून वाढतें." असें म्हणून ती सोवळ्याचा परकर नेसली व जेवणाऱ्या आम्हां बायकांस न उठण्याविषयीं शपथ घालून तिनें कणकीच्या पुऱ्या करून आम्हांस घातल्या. तिच्या दीर्घसूत्रीपणामुळें आम्हांस पुरेशा पुऱ्या मिळेपर्यंत अर्थातच अर्धा पाऊण तास जेवण लांबवावें लागलें. पुऱ्याची तूट आली नसती तर आम्ही जितक्या पुऱ्या खाल्लया असत्या त्याच्या दुप्पट आम्ही त्यावेळीं खास खाल्लया. असो यावरून तिच्या आपलेपणाची कल्पना आम्हांस त्याचवेळीं आली.

समाधान वृत्तिः—मागील एका प्रकरणांत तिची एकच एक मैत्रीण **प्रयाग** हिचा उल्लेख केलाच आहे. तिच्या घरीं कांहीं नैमित्तिक होतें, त्याकरतां तिनें **शांताबाईस** आदरानें जेवावयास बोलाविलें होतें. शाळा असल्यामुळें संध्याकाळीं जेवणास येईन, असें तिनें कबूल केलें होतें. परंतु कांहीं कारणानें शाळा त्या दिवशीं २ वाजतां सुटली. त्यामुळें ती लवकर तिचे घरीं गेली. परंतु त्या वेळीं तिजकरितां संध्याकाळीं करावयाचा ताजा भात तयार नव्हता. तिला घरून १॥ तासाचीच परवानगी मिळालेली होती. तिनें दुपारचाच भात वाढण्यास सांगितलें. जेवतांना **प्रयागची** आई प्रेमानें म्हणाली, "बाळ, **शांता**, तुला गार भात खावा लागत आहे, हें मला बरें वाटत नाहीं. तुझ्या घरचे सोपस्कार कोणीकडे व आमच्या गरीबाचें येथील जाड तांदुळाचा गार भात कोणीकडे ?" यावर **शांताबाईनें** समाधानवृत्तीनें उत्तर दिलें "गार भातास आमच्या मैत्रीणीच्या प्रेमाची चांगली ऊब असल्यानें भात फारच रुचकर लागतो

आहे. गरिबीचें काय सांगता ? प्रेमाची श्रीमंती माझ्या प्रयाग जवळ आहेना ? मग मला काय कमी आहे ? मला दिलेल्या १॥ तासांत घरीं गेलेंच पाहिजे, नाहींतर दादा रागावतील म्हणून ताजा भात करण्याची तुमची इच्छा मला तृप्त करतां आली नाहीं. त्यांतून मला कांहींच कमी पडलें नाहीं." सदरहू संभाषण प्रयागची आई शांताबाई मेल्यावर आमचे समाचारास आली त्यावेळीं तिच्या स्वभावाचें वर्णन करून सांगूं लागली. यावरून तिची समाधानवृत्ति व तिजमध्यें मनमिळावूंपणा किती होता. हें दिसून येतें.

भूतदयाः—ओंकाराचे वाड्यांत एक दिवस दोन, तीन भिक्षेकरी भीक मागण्यास आले होते. त्यांना वाड्यांतील कांहीं बायकांनीं भिक्षा वाढली. कांहींनीं वाढली नाहीं. नंतर त्या कांहीं वेळानें गेल्या. परंतु पुढें लवकरच कळून आलें कीं, त्यानीं बखळींत वाळत घातलेलीं लुगडीं, धोतरें मिळून ७ । ८ कपडे लांबविले. ही गोष्ट १९१२ सालची होय. परंतु यापुढें दुपारचे सामसुमीचे वेळीं कोणाही भिकाऱ्यास शांताबाईचे वडील वाड्याचे आवारांत येऊं देत नसत. एखादा खप्पीच भेटला, तर त्यास ते धक्के मारून घालवीत. दुपारीं केव्हांही त्यास भिक्षा मिळूं नये असा परिपाठ या वाड्यांत पडला होता. परंतु हंबरी तुंबरी करून एखाद्या लुल्या, पांगळ्या, असाह्य भिकाऱ्यावर धक्के खाऊन बाहेर जाण्याचा प्रसंग आल्यास तो शांताबाईस असह्य होई. ती अशा भिकाऱ्यास सडकेवर जाऊन धान्य वाढी अगर पैसा देई. वाड्यांत येण्याचें कारणच राहू देत नसे अशी भूतदयेचीं उदाहरणें शेंकडों घडलीं आहेत.

आवडीः— वयाचे अकरावे वर्षापर्यंत तिला एक खोड होती. गिळतांना तिला जरा त्रास होत असे. त्यामुळें तिला जेवतांना, कांहींही खातांना आणि पाणी पितांना वेळ लागत असे. तिला खाण्याची अशी कसलीच चटक नव्हती. लसलस करून हें खाईन

तें खाईन, असें तिनें कधींच केलें नाहीं. पेरू तिला मनापासून आवडत. अप्तेष्टांकडून तिजकरितां पार्सल अगर नजराणे आले तर त्यांत चांगले पेरू हे असावयाचेच. पेरूइतका तिला दुसरा कोणताच पदार्थ (आंबा अगर इतर मिष्ट पक्वान्नही) आवडला नाहीं. वयाच्या ८ व्या वर्षापर्यंत तिला मुलाचा पोषाख व मुलांचे खेळ अवडत असत. पायांत वहाणा, वर विजार व अंगात कोट असा पोषाख करून विटी-दांडू, चेंडू-दांडू, फूटबॉल वगैरे ती आपल्या वाड्याच्या उघड्या पटांगणांत खेळत असे. परंतु नवव्या वर्षापासून त्यांत पुष्कळच बदल झाला. बैठकीच्या खेळांपैकीं २।३।५ हा पत्त्याचा खेळ, बुद्धिबळें, सागरगोटे हे खेळ आवडत. ती वर्षांत एखादें दुसरें ऐतिहासीक नाटक पहात असे. संगीत नाटकाची तिला गोडी नसे, असें म्हटलें तरी चालेल. सिनेमा फक्त दोनच वेळ शाळेंतून पाहिला होता. तिला त्याची मुळींच आवड नसे. लोकांना सिनेमा कां आवडतो, याचें तिला आश्चर्य वाटें. सर्कसमधील फक्त जनावरांचीं कामें तिला पहाण्यास आवडत. जेथें बुद्धिहीन जनावरें इतकीं उत्तम कामें करितात, तेथें मनुष्याच्या कामाचें तें काय कौतुक करावयाचें, असें तिचें म्हणणें असे.

सडकेवरून गात जाणाऱ्या मथुरेकडील भिकारणीचीं गाणीं तिला मनापासून आवडत. त्यांना दिवाणखान्यापुढील गच्चीवर बसवून घेऊन त्यांचेकडून तिनें कैक वेळां गाणीं म्हणून घेतलीं आहेत. कधीं-चवली, पावली व क्वचित प्रसंगीं एकेक रुपायापर्यंत तिनें त्यांना देणग्या दिल्या आहेत. त्यांतील बऱ्याच बायकांची व **शांताबाईची** चांगली ओळख पडलेली होती. त्यांपैकींच एक **यमन** नांवाची बाई ता. २९ एप्रिल १९२५ रोजीं (म्हणजे तिचे मृत्यूनंतर) आली होती. **शांताबाईच्या** निधनाचें वृत्त ऐकून ती फार हळहळून मनसोक्त रडली. त्या तिच्या कळवळयानें आम्हांसही भडभडून आलें.

त्याचप्रमाणें लो. टिळकांचा पोवाडा तुणतुण्यावर म्हणणारा मराठेशाही पागोटे घालणारा एक मनुष्य आहे. त्याचा तो पोवाडा व त्याची अवसानदार म्हणण्याची तऱ्हा तिला फार आवडे. तो हमेश **शांताबाईस** भेटण्यास येई. त्याला ती आजारी असल्याचें कळलें होतें. ता. २५ मे १९२५ रोजींही तो शोधास आला असतां त्याला तिच्या निधनाचें वृत्त कळलें. स्वाभाविकच त्याला फार वाईट वाटलें.

बहुतेक रोज ती बाजाची हातपेटी वाजवीत असे. या वर्षांत पेटी वांजविण्यांत तिची बरीच प्रगति झाली होती. कोणतेंही गाणें ऐकलें तरी ती स्वतः ४।५ मिनिटांत ऐकलेल्या चालीवर वाजवून दाखवी.

सन १९२३ सालीं ती व तिच्या घरचीं सर्व मंडळी तिच्या ताईकडे राहावयास गेली असतां मि. **परदेशी मास्तरांनीं** (हे येवलें येथें टिळक विद्यालयांत मास्तर होते) **ताईचे** घरीं जादूचे खेळ करून दाखविले. ते खेळ त्यांनीं **शांताबाईस** सर्व समजून दिले. या पुढें **शांताबाईस** उच्च दर्जाचे जादूचे खेळ शिकण्याची इच्छा झाली. त्यांचे वडिलांनीं बऱ्याच जणांना पत्रें टाकलीं. कांहीं सामान तयार करविलें. कांहीं विलायतेहून, झाशींहून, मुंबईहून मागविलें. सोलापूरचे डा० **लेले** यांजकडूनही १।२ प्रसंगीं **शांताबाईनें** माहिती घेतली. **शांताबाईला ३०।४०** प्रकारचे खेळ चांगल्याच प्रकारानें करितां येत असत. या त्यांच्या कौशल्याबद्दल ज्ञानमित्रमालेनें जादूच्या खेळाच्या माहितीचें "म्याजिक इन्स्ट्रक्टर" नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, तें **शांताबाईला** अर्पण केलें आहे. अर्पणपत्रिकें-तील मजकूर पुढीलप्रमाणें आहे.

समर्पण.

श्रीमंत **भास्करराव ओंकार** यांची अल्पवयी सुकन्या कीर्तनालंकृति कुमारी **शांताबाई ओंकार** यांची असाधारण बुद्धिमत्ता,

He that is down need fear no fall,
He that is low, no pride:
He that is humble ever shall
Have God to be his guide.
I am content with what I have.
Little be it or much:
And, Lord, contentment still I crave,
Because Thou savest such.

धर्म कोणता का असेना, ह्या विश्वाचा कर्ता आणि भर्ता असा परमात्मा एकच असून तो सर्वव्यापक, अत्यंत न्यायी व अत्यंत दयाळू असा आहे, असें त्यांत सांगितलेलें असतें; मनुष्य परमात्म्यास आपापल्यें लोक ईश्वर म्हणोत किंवा दुसरें कांहीं म्हणोत. ईश्वराविषयींची ही आपली आस्तिक्यबुद्धि निसर्गसिद्ध असते. ती सर्व कालीं सर्व राष्ट्रांत आढळते.

शांताबाईंचें १९२४ सालचें इंग्रजी व मराठी हस्ताक्षर (पान–२७).

मातृभाषेवरील निस्सीम प्रेम, जादुच्या खेळाविषयीं आवड, गुण-ग्राहकता इत्यादि सद्गुणांवर लुब्ध होऊन माझीही अल्पकृति त्यास बंधुप्रेमानें व निःस्वार्थबुद्धीनें अत्यादरपूर्वक अर्पण करीत आहे.

प्रकाशक.

ना. ब. चव्हाण.

वाचनामध्यें तिला महाभारतामधील गोष्टी वाचायला फार आवडत. चिपळूणकर मंडळीनें भारताचें गद्यांत केलेलें भाषांतर तिनें फार वेळां वाचलें होतें. रामायणांतील कांहीं कांहीं भाग तिला आवडे. ऐतिहासिक वाङ्मय वाचण्याची तिला चांगली गोडी असे. त्यांतले त्यांत **श्रीशिवाजी महाराजासंबंधीं** जेवढें जेवढें वाचावयास मिळे तेवढें तेवढें ती तेव्हांच वाचून टाकी. **शिवाजीमहाराजाबद्दल** तिची फारच निष्ठा असे. रा. **परांजपे** यांनीं लिहीलेली उदयास्त कादंबरी तिला फार आवडे. त्यांत **नानाफडणीसावर** ओढवलेली संकटपरंपरा पाहून व त्यांतही ते हतबुद्ध न होतां शत्रूपक्षावर मात करीत हें पाहून तिला त्यांच्याबद्दल अत्यंत कौतुक वाटें. त्यामधील प्रकरणें ती वरचेवर वाचीं.

तिचें इंग्रजी व मराठी अक्षर वाईटांत जमा होण्याजोगें असे. अक्षराचे नमुने या पुस्तकांत दिले आहेत. तिचे लेखनामधील विचार फारच गंभीर व मोठ्या माणसास साजण्याजोगें होते. त्याचप्रमाणें ज्या शब्दांत ती आपले विचार मांडी ते शब्दही फार प्रगल्भ व मुद्देसूद असत. एखाद्या विषयावर वादविवाद चालू असतां ती ज्या बाजूची असेल ती बाजू साधकबाधक प्रमाणें देऊन उत्तम तऱ्हेनें मांडी. अशावेळीं ती जीं प्रसंगास लागू पडणारीं व्यावहारिक उदाहरणें देई, तीं तिचें प्रसंगावधान निदर्शनास आणून देत असत.

ती आपल्या मनानें लहान लहान लेख लिहीत असे. तिनें लिहिलेले ५।६ लेख तिचें कपाट अवरीत असतां सांपडलें " आमचे दादा " हा लेख तिनें आपल्या वडिलांच्यासंबंधीं १९२३ च्या मे महिन्यांत म्हणजे तिच्या १० व्या वर्षीं लिहिला आहे. त्यांत तिनें आपल्या वडिलांच्या दिनचर्येचें व सवयीचें वर्णन दिलेलें आहे. त्यांतील अल्पसा भाग येथें देत आहों.

आमचे दादा.

दिनक्रम.

(१) चहा.

दादा सकाळीं उठल्याबरोबर चूळ भरून चहा घेतात. चहा घेतल्याशिवाय ते कसल्याही उद्योगास लागत नाहींत, इतकेंच नव्हें तर ते जाग्यावरून हालावयाचेसुद्धां नाहींत आणि जवळ बसलेल्या माणसाशीं नीट बोलावयाचे नाहींत.

चहाच्या आधीं आलेल्या माणसाची कशी संभावना झाली तें मला आतांच आठवलें म्हणून मी इथें लिहितें. पुण्यांतील एक सन्माननीय सुप्रसिद्ध गृहस्थ सकाळीं म्युनिसिपल इलेक्शनसंबंधीं मत विचारण्यास आले होते. त्यांनीं "मला मतें द्याल काय?" असें विचारलें. तोंच आमचे दादा संतापले व म्हणाले "काय बोवा यांचा आतांशीं सुळसुळाट झाला आहे?" आधीं येथून जा कसें. मला मतें बितें कोणास द्यावयाचीं नाहींत " ते सद्गृहस्थ लवकरच परत फिरले. ते जरी सुप्रसिद्ध होते, तरी दादा त्यांना ओळखित नव्हते. फक्त नांवानें ओळखीत होते. चहा घेणें झाल्यावर त येते तर कदाचित् ओळख नव्हती तरी दादा त्यांच्याशीं सरळही वागले असते.

* * * *

(२) विडा

दादांना विड्याची संवय फार आहे. घरांत इतका सुंदर घाटाचा पानसुपारीचा डबा आहे कीं, पुण्यांत फारच क्वचित घरीं अशा घाटाचा डबा सांपडेल. परंतु तो डबा दादांना मुळींच आवडत नाहीं. कारण त्यांत भरपूर सामान रहात नाहीं व दरवेळीं त्या डब्याचें झाकण उघडावें लागतें, म्हणून त्याचा मुळींच दादांना उपयोग नाहीं. दादांनीं आपल्या आंखणीप्रमाणें पानसुपारीसाठीं टीनचा डबा केला आहे. त्यास झाकण नाहीं. तो प्रशस्त आहे. त्यांच्यांत सर्व सामान भरपूर रहातें. त्यामुळें तो त्यांना सोईचा पडतो. तो डबा १ फूट लांब व ६ इंच रुंद आहे. त्याला पांच पुडें आहेत. खालील आकृतीप्रमाणें तो डबा आहे.

(१) कात, वेलदोडे.	(३) पानें, चुनाळे, आडकित्ता.	(४) चिकणी सुपारी, विड्या, पैसे, तपकीर.
(२) सुपारी.		(५) तंबाखु.

दादांना रोज १०० पानें तरी लागतात. तीं पानेंसुद्धां हिरवी आणि रुंद अगर अगदीं लहान असतां कामा नये............... दादांनीं सुपारीच्या चकत्या पाडणारें असें अगदीं नवीन तऱ्हेचें १२ रुपये किंमतीचें यंत्र आणून दिलें आहे. त्यानें सुपारीच्या सुंदर व पातळ चकत्या अगदीं थोड्या वेळांत पडतात. माझी लहान बहीण मालतीदेखील त्या यंत्रावर सुपारीच्या चकत्या पाडून देते. हें यंत्र आम्हांस फारच आवडलें आहे. यंत्र येण्याच्या आधीं सुपारी फोडून घरांत बहुतेक सर्वांचे हातास घट्टे पडले आहेत, कारण रोज २५–३० सुपाऱ्या दादांना व मंडळींना मिळून लागतात. असो,

याप्रमाणें तिनें आपल्या वडिलांचा कार्यक्रम व त्या अनुसंधनानें येणारें त्यांच्या स्वभावाचें वर्णन साध्या व सरळ भाषेंत परंतु पुष्कळ मार्मिकपणानें केलेलें आहे. हें वर्णन तिनें आपल्या १० व्या वर्षी स्वतःचे मतानें लिहिलें आहे त्यामधील वर सांगितल्याप्रमाणें अगदींच अल्प भाग येथें दिला आहे.

म. गांधी येथें सासून हॉस्पिटलमध्यें आजारांतून बरे झाल्यावर कांहीं दिवस होते. त्यांच्या दर्शनास **शांताबाईची** ताई **शांताबाईला** घेऊन गेली. भेटीची वेळ आधींच पत्र पाठवून ठरविण्यांत आली होती. दर्शन घेतल्यावर २।३ कुशल प्रश्न त्यांनीं विचारल्यावर त्या परत आल्या. घरीं आल्यावर **शांताबाई** म्हणाली कीं, " इतक्या अशक्त प्रकृतीचीं माणसें देखील आत्मतेजानें जगाला दिपवून सोडतात, हें खरोखरीं आश्चर्य आहे. शारीरिक सामर्थ्य असावें तसें नसतांना देखील या महात्म्यानें जग हालवून सोडलें आणि तेंहीं सत्य वर्तनानें ! धन्य धन्य ते **महात्माजी** " या वेळीं घरांतील माणसांशिवाय बाहेरचीही ५।६ मंडळी होती. हें तिच्या वयाच्या मानानें फारच उच्च दर्जाचें मार्मिक भाषण ऐकून त्या वेळीं असलेले श्री. **नानासाहेब सुभेदार** म्हणाले, एवढ्या लहान वयांत **शांताबाईचे** हे विचार पाहून आम्हांलाच काय परंतु महात्माजींनाही खास कौतुक वाटेल.

श्रीजगद्गुरु शंकराचार्य.

श्री शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी महाराज यांनीं **शांताबाईच्या** व त्यांच्या वडिलांच्या विनंतीस मान देऊन ता. १६ ते २६ जून १९२४ पर्यंत आपला मुक्काम दादांचे घरीं (पुणें येथें **भास्करराव ओंकार** यांचे वाड्यांत) ठेविला होता. आधींच स्वामी महाराजांचें मत **शांताबाईच्या** सात्विक वागणुकीबद्दल व हुषारीबद्दल चांगलें होतें. आणि तें या मुक्कामांतील दृढपरिचयामुळें फारच उत्तम

बनलें पूजेच्या व आरतीच्या वेळीं ती बहुतेक हजर असावयाचीच. महाराजांनीं तिला अत्यंत मायाळुपणानें सर्व देव दाखविले. तिचा ओढा देवदेवतार्चनाकडे पाहून तें फार संतुष्ट होते. ते तिजबरोबर गोष्टी बोलत बसत. ते जातांना **शांताबाईला** मुद्दाम विचारून गेले. तिचे विवाहप्रसंगीं त्यांचेतर्फे कोणीतरी खास हजर राहील, असें त्यांनीं सांगितलें होतें.

गुणग्राहकता:—त्यांचा मुक्काम ओंकाराचे घरीं असतां **मनोहर बर्वे** आपल्या वडिलांसह **श्रींना** भेटण्यास आले होते. यावेळीं **श्रींनीं शांताबाईस** बोलावून घेऊन विचारलें, " तुम्ही यांना ओळखतां काय? " त्यावर तिनें उत्तर दिलें, "होय. मी यांच्या गाण्यास गेलें होतें. खरोखरी इतक्या लहान वयांत यांनीं अनेक वाद्यांवर प्रभुत्व मिळविलेलें पाहून महदाश्चर्य वाटलें. ही ईश्वरी देणगी यांत शंका नाहीं. मी पेटी वाजविण्यास आज एक वर्ष मन लावून शिकत आहे, परंतु म्हणण्याजोगीं अजून कांहींच प्रगती झाली नाहीं. मग अनेक वाद्यें सशास्त्र वाजवितां येण्यास कितीं तपें माझ्या सारखीस घालवावीं लागतील हें कांहीं सांगण्यास नकोच! " यावरून तिची गुणग्राहकता दिसून येते.

विचारनियमन सन १९२५ च्या मे महिन्यांत **शांताबाई:**—"आमच्या (मुलांच्या) अडचणी" या विषयावर पुणें येथील **शिवाजी मंदिरामध्यें वसंतव्याख्यानमालेंत** भाषण करणार होती, असे जानेवारीमध्यें ठरलें होतें. त्या भाषणाकरितां तिनें सुंदर असे मुद्दे काढले होते. तिचें भाषण फारच विनोदी झालें असतें. ती जानेवारींत संध्याकाळीं (बहुतेक) रोज याच विषयावर घरच्या मंडळीशीं बोलत बसे. रोज रोज याच विषयाचा खल घरीं चालू असल्यानें नव्या नव्या कल्पना तिला सुचत. तिच्या भाष-

णाची थोडी रूपरेषा ध्यानांत यावी म्हणून या पुढें एक उदाहरण देत आहों.

"माता पिता धनी गुरु यांची आज्ञा सदैव मानावी" असें आम्हांस घरीं, दारीं, शाळेंत वडील माणसांकडून शिकविलें जातें. माता, पिता, गुरु वगैरेंचीं मतें एक असतील, तेव्हां आम्हांला त्यांच्या मताप्रमाणें आज्ञापाळणें अगर वागणें कठीण नाहीं. परंतु एक-मेकांच्या आज्ञा एकमेकांच्याविरुद्ध असल्यास कुणाची तरी आज्ञा उल्लंघन करणें भाग आहे. कसें तें पहा:—शाळेंत बाईनीं सांगितलें कीं, "उद्यापासून तुम्ही ड्रीलच्या तासास ड्रीलला गेलेच पाहिजे. न गेल्यास चालणार नाहीं. ही हकिकत मी शाळेंतून घरीं आल्यावर आईला सांगितली. तें ऐकून आई फारच खवळली व म्हणाली "शांता, ड्रील फिल केलेलें मला खपणार नाहीं. काय मेले हे धांगडधिंगे " मुलींना म्हणें परेड करायला शिंकलेंच पाहिजे. जसें कांहीं यांना तलवार मारायला जायचं आहे ! हेंगडी चाळे न दुसरें काय ? जुने मुलींचे खेळ मावळले आणि नव्या घेडगुजरी चाळ्यास ऊत आला. खबरदार तूं ड्रीलला गेलीस तर. याच टार-गेपणानें धिंडवडे होतात." मास्तरीण बाईची वरलिप्रमाणें आज्ञा व अगदीं त्याच्याविरुद्ध आईनें दिलेली ताकीद, कसेंही वागलें तरी एकाची आज्ञा पाळलीं कीं दुसऱ्याच्या आज्ञेचें उल्लंघन आपोआप होणार. या अडचणींचा विचार करून त्या दूर झाल्या पाहिजेत. अशा प्रकारानें रोज निरनिराळ्या मुद्यांवर चर्चा चालू असे. पण आता त्याचें काय ! तें व्याख्यान देण्यास ती स्वर्गलोकीं निघून गेली.

प्रकरण ४ थें.

कीर्तन.

या प्रकरणांत आम्ही **शांताबाईच्या** कीर्तनासंबंधीं होतांहोईतों सविस्तर हकिकत देणार आहों. ज्या योगें तिची खरी योग्यता आम्हांस व इतरांस कळून आली, ज्या योगें तिच्या अंगचे असाधारण असे अनेक सद्गुण महाराष्ट्राच्या नजरेस आले व महाराष्ट्रांतील अनेक वंदनीय पुढाऱ्यांनीं व प्रमुख वृत्तपत्रांनीं ज्या गुणांचे चोज करून तिला—त्या अल्पवयी बालिकेला——प्रोत्साहन दिलें, त्या कीर्तनकलेची बारिक सारिक गोष्टींसह हकिकत देणें गैरवाजवी होणार नाहीं. अप्रतिम कीर्तनकौशल्य तिच्यांत नसतें, तर तिचे अलौकिक गुण जनतेच्या नजरेस इतक्या ठळकपणानें आलेही नसते *व हें चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा योगही आला नसता.

कीर्तन करण्याचा प्रघात कसा पडला.

सन १९१३ सालची गोष्ट. त्या सालीं सालाबादप्रमाणें गणेशचतुर्थीचे दिवशीं कोणातरी **हरिदासाचें** कीर्तन रा. **भास्करराव** यांचे घरीं असावयाचें. कीर्तनाची वेळ रात्रीं ९॥ ते ११॥ असावयाची. **भास्करराव** हे अत्यंत नियमित असे आहेत. सर्व कामें ठरल्यावेळीं व्हावयाचींच. त्यांचे येथील लग्नकार्यांत देखील या नियमांस अपवाद आलेला नाहीं. वर दिलेल्या सालीं त्यांच्या नेहमींच्या ठरलेल्या **हरिदासानें** येण्यास एका तासाचेवर उशीर केला. निमंत्रित मंडळी रा. **भास्कररावांचा** नियमितपणा माहीत असल्यानें नेहमींप्रमाणें ९॥ वाजतां हजर होती. **हरिदास** आल्यावर त्यांना उशीरा

---

* आमच्यामतें आतांपर्यंत इतक्या लहान वयांतील कोणाचेंही चरित्र लिहिलें गेलें नसावें असें वाटते.

आल्यावद्दल भास्करराव कांहीं शब्द रोषानें बोलले. सरासरी १०॥ वाजतां कीर्तनास सुरवात झाली. बोवांनीं (कै. अनंतराव एकबोटे) दुर्वासऋषीचें—त्यांच्या शीघ्र कोपाचें—आख्यान लाविलें होतें. शांताबाईच्या वडिलांनीं आरंभीं शेलक्या शब्दांनीं केलेल्या संभावनेचें उसनें फेडण्याचे हेतूनें बोवांनीं कीर्तनांत त्यांना घालून—पाडून बरेच टोमणे दिले. अर्थातच या गोष्टीचा भास्कररावांना राग आला. परंतु करणार काय? बोवांना उलटून बोलणें कीर्तनांत तरी शक्यच नव्हतें, अशा स्थानावर ते उभे होते. त्यांच्या स्थानमहात्म्यामुळें तें बोवांचें बोलणें मुकाट्यानें ऐकून घेत होते. ११॥ वाजतां कीर्तन आटोपलें. बोवा रिवाजाप्रमाणें श्रोतेमंडळींत येऊन बसले. पानसुपारी, खिरापत देऊन झाल्यावर भास्करराव बोवास म्हणाले, "आतां कीर्तन संपलें. तेव्हां खासगी रीतीनें मी तुम्हांस विचारतों कीं, तुम्हांस नेहमींची वहिवाट माहीत असतां तुम्हीं येण्यास एक तास उशीर केला त्याबद्दल मी बोलणें अगदीं स्वाभाविक असतां त्याचा वचपा हरिकीर्तनासारख्या सात्विक प्रसंगांत मजवर काढलात, हें अगदीं अनुचित केलेंत.

बोवा—यजमानसाहेब, तें सर्व खरें. परंतु आमचें काम किती कठीण आहे, याचा जरा तरी विचार आपण करावयास पाहिजे होता. २।३ तास श्रोत्यांच्यापुढें उभे राहून सुसंगत बोलावयाचें काम सोपें नाहीं. एखाद्या सभेंत—मी या ठरावास अनुमोदन देतों—एवढे शब्द बोलतांना वक्त्याची कोण तारंबळ उडते, तें लक्षांत घेतलें म्हणजे आमचें काम किती अवघड आहे, याची जाणीव आपणास येईल.

यावर भास्कररावांनीं जरा रागावून उत्तर दिलें, "असें काय! जितकें हें काम कठीण आहे असें तुम्हांला वाटतें, तितकें आम्हाला

वाटत नाहीं. मी स्वतः आजपासून आठ दिवसांनीं एकादशीस याच जागीं याच वेळीं कीर्तन करून दाखवीन. एवढेंच नव्हें, तर मी ११ वर्षांच्या बयाकडून (**भास्कररावाची** मुलगी, **शांताची** थोरली बहीण) कीर्तन करून दाखवीन."

बोवा म्हणाले—असं कांहीं करून दाखवा, मग, आम्ही आपले शब्द परत घेऊं. अहो मालकसाहेब, कीर्तन करणें म्हणजे खेळ नव्हे, फार कठीण काम आहे. याप्रमाणें बरेंच बोलणें झालें. ८ दिवसांनीं **भास्कररावांनीं** कीर्तन करण्याचें नक्की ठरलें. तेथें हजर असलेल्या मंडळीस तेव्हांच आमंत्रण दिलें गेलें. नंतर मंडळी घरोघर गेली.

दुसरें दिवसापासून **शांताबाईचे दादा** कीर्तनाचे तयारीस लागले. विवेकसिंधू, रामतीर्थ, कीर्तनतरंगिणी वगैरें पुस्तकें आणून पूर्वरंग व काशी-खंडांमधील धनेश्वर आख्यान त्यांनीं लिहून काढलें. त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या मंडळींत रावसाहेब **हलधरे** डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ व्हॉक्सिनेशन, डॉ. **सातपुते** हेल्थ ऑफिसर, **हरिभाऊ सहस्रबुद्धे** वगैरे अनेक गृहस्थ होते. **दादा** सारा दिवस आख्यान वगैरे पाठ करीत तिसऱ्या मजल्यावर बसत.

एकादशीचे दिवशीं ६॥ वाजतां ते कीर्तनास उभे राहिले. पेटी, तबला वाजविणारे **दादांच्या** स्नेहांपैकींच लोक होते. **दादांनीं** आरंभ करण्याचे आधींच सांगितलें कीं, गाण्याची माहिती मला बरोबर नसल्यानें त्यांत फारच मौज होणार आहे.

कीर्तनाचें नमन वगैरे मोठ्या थाटांत पार पडलें. " विठाबाई माऊली, " हें पद सुरू झालें, परंतु कांहीं केल्या **दादांचें** तें पद संपेना. श्रोतृसमाज मारे चिक्कार जमला होता. **हरिदासबोवा** तर प्रामुख्यानें हजर होते. **दादांना** पूर्वरंगाचा आधारभूत अभंगच आठवेना. त्यांचा चेहरा गांगरल्यासारखा झाला. हे **शांताबाईच्या** मामाच्या

ध्यानांत आलें व त्यांनीं मागून जाऊन हळूंच पूर्वरंगाचा अभंग त्यांना सुचविला. (अभंगच काय, परंतु घरांतील सर्व माणसांना दादांच्या रोजच्या चाललेल्या उजळणीमुळें तें आख्यान जवळ जवळ मुखोद्गत झालें होतें, असें म्हटल्यास चालेल.) अभंगाची सूचना मिळतांच पुढें कुठेंही न आडतां आख्यान सुसंगत रीतीनें पार पडलें. (आतां असेंच दरवेळीं अडतें कीं काय, अशी जी भीति आम्हांस पडली होती, ती व्यर्थ ठरली.) बोवानीं दादांचे पायावर डोकें ठेवलें, व सर्वत्रांस उद्देशून ते म्हणाले "पहिलें कीर्तन या नात्यानें पहातां आजचें हें कीर्तन उत्तमच झालें, असेंच म्हणावें लागतें. मी आपले त्या दिवशींचे शब्द परत घेतों." दादा म्हणाले, "थोडे थांबा, बयाताईकडून लवकरच हें आख्यान करून दाखवितों." असो. याप्रमाणें ओंकार-मंडळींत कीर्तन करण्याचा प्रघात पडला. नंतर बयाताई कीर्तन करूं लागल्या. त्यांचींही पुष्कळ कीर्तनें झालीं व त्या अजूनही कीर्तन करतात. त्यांनींच शांताबाईस कीर्तनांत तयार केलें. हा पूर्वेतिहास झाला. आतां शांताबाईच्या किर्तनाकडे वळूं.

सन १९२० सालची गोष्ट. यावेळीं शांताबाई मराठी ३ रे इयत्तेंत होती. शाळेंतील बाईंनीं तिजकडून मुंगी आणि कोळी या धड्यांतील १०।१५ ओळी पाठ करून घेतल्या होत्या. त्या ती इतर सर्व मुलींपेक्षां अभिनययुक्त व समजूतदारपणानें म्हणे. यामुळें कौतुकानें या सात वर्षांच्या बालिकेकडून त्या वर्ग पाहण्यास येणाऱ्यांना तिजकडून म्हणून दाखवीत. तिनें तें भाषण घरीं म्हणून दाखविलें. तें आम्हां सर्वांस फारच मोहक वाटलें. नंतर आम्ही सर्वांनीं दादांना सांगितलें कीं, एखादें अर्थयुक्त लहानसें असें भाषण तयार करून द्या, म्हणजे ती फार गम्मत करील. दादांनीं त्याप्रमाणें अगदीं लहान असें भाषण तयार करून दिलें—तें पुढीलप्रमाणें होतें.

"हरिपदीं जे मनापासून रत झाले, त्यांना या जगांत दुःखाचा लवलेशही दृष्टीस पडावयाचा नाहीं. सर्व जगांत त्यांना आनंदी-आनंद दिसेल. या आमच्या म्हणण्यावर एखादा अशी शंका काढील कीं, हें तुम्ही सांगतां तरी काय? अहो, परवां **गोविंदरावांचा** एकुलता एक मुलगा एकाएकी मेला, ही काय त्याला आनं-दाचीच गोष्ट वाटेल. यावर आम्हीं असें ठाम उत्तर देतों कीं, **गोविंदरावांचें** चित्त जर भगवच्चरणीं दृढ असेल, तर त्यांना यांत दुःखदायक असें कांहींच वाटणार नाहीं. त्यांना वाटेल आपल्या मुलाची नाटकांतील भूमिका संपली, तो पडद्याआड गेला. आपलीही भूमिका संपली कीं, आपणही पडद्याआड जाऊं. त्यावेळीं आपली त्याची भेट होणारच आहे. मग यांत रडण्याजोगें काय आहे?" ह्या भाषणामधील प्रत्येक शब्दाचा अर्थ तिला चांगला समजून दिला होता. ती तें इतकें उत्तम वढवी कीं, ऐकणारा मनुष्य अगदीं चकीतच होई.

सन १९२० सालीं जहागिरीचें उत्पन्न आणण्यास तिचे वडिलास औरंगाबादेस जावयाचें होतें. त्यावेळीं ते **शांताबाईस** व **बयाताईस** घेऊन पुण्याहून निघाले. त्या दोघींस येवल्यास श्री. **दत्तोपंत थत्ते** वकील यांजकडे ठेवून ते पुढें गेले. **श्री शंकरा-चार्यांचा** मुक्काम येवल्यासच होता. **श्री. थत्ते** हे गांवांतील एक वजनदार व मेहनती गृहस्थ असल्यानें **श्रींचा** व त्यांचा चांगला परिचय होता. ते **शांताबाईस** घेऊन **श्रींचे** दर्शनास गेले. रा. **थत्ते** यांना **शांताबाईचें** भाषण फारच आवडे. त्यामुळें त्यानीं तिला तें भाषण **श्रीपुढें** म्हणून दाखविण्यास सांगितलें. तेथें ५१५० मंडळी बसलेली होती. त्यांत तिनें वरील भाषण न डगमगतां व न अड-खळतां साभिनय म्हणून दाखविलें. **शांताबाईची** लहान मूर्ति, तिचें अस्खलित भाषण, तिची भाषण करण्याची पद्धत हीं पाहून **श्री** संतुष्ट

झाले. ते **शांताबाईस** म्हणाले, "बाळ तूं मनावर घेतलेंस तर कीर्तनासारख्या विषयांत फारच मौज करून देशील यांत शंका नाहीं." जमलेल्या मंडळीकडे पाहून ते म्हणाले "हिची भाषणामधील सुलभता, स्वाभाविक अभिनय व मोहक वाणी कौतुकास्पद आहेत यांत शंका नाहीं. अशीं जेव्हां अनेक बालकें जन्मास येतील, तेव्हांच कांहीं आपल्या देशाचें दैन्य फिटेल." असें म्हणून त्यांनीं **शांताबाईस** द्रव्यरूपानें अल्पसें पारितोषिक देऊन उत्तेजन दिलें. येथेंच कीर्तनाचा श्रीमन्म: झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. **श्रींनीं** कृपाळुपणें दिलेल्या उत्तेजनानें व **बयाताईच्या** सक्रिय उदाहरणानें **शांताबाईचें** मन कीर्तनाकडे ओढ घेऊं लागलें.

शांताबाईच्या मनानें कीर्तनाकडे येवले मुक्कामींच ओढ घेतली व कीर्तनाचा शेवट किंवा शेवटचें कीर्तनही येवल्यासच झालें. असो. या बाबतींत आम्ही जास्त लिहूं गेलों तर हातीं घेतलेल्या कार्यापासून परावृत्त होऊन दुःखसरितेंत वहवत जाण्याचा संभव आहे. म्हणून आतां कांहीं वेळ निवांतपणें या बहुगुणी **शांताचे** गुणरूप आठवून अश्रुविमोचनानें आमच्या मनावरील भार हलका करून नंतर पुन्हां लेखणी हातीं धरूं.

* * * * *

तिच्या घरच्या मंडळींनीं " **रामराज्य** " नांवाचें लहानसें आख्यान पूर्वरंगासह **शांताबाईकरितां** तयार केलें. यांतील भाषा अगदीं सुलभ अशी ठेवली होती. या आख्यानांत एकही अवघड शब्द घातला नव्हता. रागदारींचीं पद्यें यामध्यें घातलीं नसून श्लोक, आर्या, साक्या, दिंड्या अशींच पद्यें या आख्यानांत गोंवलीं होतीं. एका एक्झरसाईज बुकामध्यें हें संपूर्ण आख्यान मोठ्या अक्षरांत लिहून काढलें होतें. हीं एकंदर २३ पानें होतीं. त्यामध्यें निरनिराळे प्यारे घालून त्यावर आकडे घातलें होते. **शांताबाईला** २।३ वेळ



(सन १९२० सालीं नाशिक येथें घेतलेला फोटो)

या बालिकेची ७।८ वर्षांची अगदीं लहान मूर्ति, सतेज चेहरा, अस्खलित वाणी, अमोघ निरूपणपद्धति पाहून सर्वत्रांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आले. (पान–३९).

तें आख्यान बयाताईनीं पहिल्यानें वाचून दाखविलें व नीट समजून दिलें. शांताबाईनें स्वतः २।३ वेळ हें आख्यान वाचलें. रोज रात्रीं या आख्यानाबद्दल घरांतील मंडळींमध्यें खल चाले. दादा मुद्दाम त्यामधील भाग स्वतः शांताबाईस म्हणून दाखवीत. बयाताईही त्यामधील अवघड भाग साभिनयकरून दाखावित. असें सरासरी १५ दिवस चाललें होतें. शेवटचे आठादिवस रोज नियमानें शांताबाई हें आख्यान मंडळींत वाचून दाखवी. या सर्व प्रकारामुळें आपोआपच तिचें तें आख्यान जवळ जवळ पाठ झाल्यासारखें झालें. यानंतर तीन दिवसांत तिनें तें आख्यान मुखोद्गत केलें. गाणीं बयाताईनीं बसवून घेतलीं. एका महिन्याचे आंत तिचें आख्यान व्यवस्थित रीतीनें तयार झालें.

नाशीक येथें ती गेली असतां श्री. सौ. वहिनीसाहेब पुरंधरे यांचे आग्रहावरून तेथील बालाजीच्या भव्य देवळांत ता.२२ नोव्हेंबर १९२० रोजीं या आख्यानावर शांताबाईचें कीर्तन झालें. कीर्तनास उभे रहाण्यापूर्वीं शांताबाईनें आपल्या आईस व ताईस नमस्कार केला व नंतर कीर्तनपीठावर जाऊन उभी राहिली आणि कोठेंही न अडखळतां किंवा न घाबरतां चांगल्या प्रकारें कीर्तन पार पाडलें. तिचें हें सार्वजनिक रीतीनें असें पहिलेंच कीर्तन होय. तें फक्त बायकांतच होतें. ४००।५०० बायका जमल्या होत्या. शांताबाईचें हें पहिलें कीर्तन फारच बहारीचें झालें. या बालिकेची ७।८ वर्षांची अगदीं लहान मूर्ति, सतेज चेहरा, अस्खलित वाणी, अमोघ निरुपणपद्धति पाहून सर्वत्रांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आले. स्त्रियांनीं चोहोंबाजूनीं धन्यवाद दिले. तिच्या आईजवळ व बहिणीजवळ येऊन तिची दृष्ट काढून टाकण्याबद्दलही कैकांनीं बजावून सांगितलें. त्या उभयतांनाहीं शांताबाईचें हे जयजयकार पाहून धन्य धन्य झालें.

या कीर्तनासंबंधीं " कीर्तन " मासिकांत मार्गशीर्ष १८४२ चे अंकांत पुढील मजकूर आहे " ....शांताबाई ओंकार यांचें नाशिक क्षेत्रीं कार्तिक शु॥ ११ चे दिवशीं श्रीबालाजी मंदिरांत सुश्राव्य कीर्तन झालें.........आठवर्षांच्या कुमारिकेची अस्खलित भाषणशैली, सुसंगत व प्रेमळ निरुपणपद्धति असल्यानें स्त्रीसमुदायांनीं देऊळ चिकार भरून गेलें. देवळाबाहेरही अतिशय गर्दी झाली. अशा वेळींही कीर्तनकर्त्रींची शांतवृत्ति यत्किंचित्‌ही ढळली नाहीं, ही प्रशंसनीय गोष्ट होय. "

यावरून आम्ही वर प्रशंसापर उद्गार काढले आहेत, ते अवाचे सवा काढले नसून वाजवी तेच काढले असल्याबद्दल वाचकांची खात्री होईल.

कीर्तनास आरंभ करण्यापूर्वी **शांताबाई** आपल्या वडील, मातोश्री, मावशी व ताई यांपैकीं जे कोणी कीर्तनास हजर असतील, त्यांस आधीं नमस्कार करून मग कीर्तनास उभी रहात असे. हा तिचा परिपाठ या कीर्तनापासून तों अखेरच्या (येवल्याच्या) कीर्तनापर्यंत होता. कीर्तन संपल्यावर आरतीच्या वेळीं कोणास तरी तिला कडेवर घ्यावी लागे, व पुढें तिची आई अगर इतर तिच्या माणसांत नेऊन सोडीपर्यंत कडेवर घेऊनच पोंचवावी लागे. तसें करण्यास जरा उशीर लागल्यास तिच्या भोंवताली जमणाऱ्या गर्दीमुळें ती गुदमरून जाई. ती आपल्या मंडळींत येतांच ती आपल्या आईच्या कुशींत डोकें खुपसून बसे.

या यशस्वी झालेल्या पहिल्या कीर्तनामुळें तिला जबरदस्त आत्मविश्वास उत्पन्न झाला, व याच आत्मविश्वासाचे बळावर तिचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला. तिच्या ताईनें तिला त्या रात्रीं विचारले, " **शांताबाबा** (घरचीं सर्व माणसें लाडीकपणानें तिला याच नांवानें संबोधीत.) इतक्या गर्दीत तूं गांगरून कशीग गेली

नाहींस ! आम्ही आपला जीव, गर्दी पाहून मुठींत धरून होतों कीं, आतां या गर्दीमुळें शांताबाबाची फटफजिती होईल. परंतु तूं कशीती गांगरली नाहींस." यावर बयाताई म्हणाली "आई, माझ्याच्यानें आरंभीं आरंभीचीं कीर्तनें अशा गर्दीत कधींच सुसंगतपणें पार पडलीं नसतीं. शांता तूं आमचेवर मात केलीस. पहिल्या कीर्तनांत दादा देखील गांगरले. तरी तें कीर्तन घरींच होतें."

शांताबाई म्हणाली—ताई, खरोखरीच गर्दी होती कीं, ओसाड होतें हें मी पाहिलेंच नाहीं, असेंच कां म्हणेनास. दादांनीं मला सांगितलें आहे कीं, कीर्तनास उभें राहिलें कीं, फक्त भगवंता-कडे समोर लक्ष द्यावें. आसपास लक्षच देऊं नये. आसपास माणसें आहेत कां दुसरें कांहीं आहे, याचा विचारच मनांत आणूं नये. मी तें पक्कें ध्यानांत धरलें होतें व आरती होईपर्यंत मी आसपा-सच्या माणसांचा विचारच केला नाहीं. आरतीच्यावेळीं बाय-कांची अपरंपार गर्दी पाहून मी चपापलें.

यानंतर तिचीं एकंदर ९३ कीर्तनें झालीं. त्यांपैकीं सार्वज-निक अशीं ४९ झालीं. त्यांतील कांहीं कांहीं कीर्तनांची *हकिकत आम्ही पुढें देणार आहों.

यानंतर शांताबाईनें दुसरें आख्यान "दामाजी" बसविलें. हें आख्यान पूर्वरंगासह १।।।–२ तास पुरेल एवढें झालें. तें तिला

*आम्हाला येथें एक सांगून टाकणें आगत्याचें वाटतें कीं, कीर्तनाच्या चांगुल-पणाबद्दल लिहितांना त्याच त्याच विशेषणांची पुनरुक्ति होणें अपरिहार्य आहे. कारण, आरंभींच्या कीर्तनापासून तें अखेरच्या कीर्तनापर्यंत सर्वच सार्वजनिक कीर्तनें तेजस्वी व परिणामकारक झालेलीं आहेत. आमच्या प्रेमातिशयामुळें यत्किंचितही अतिशयोक्तिचा बोल न यावा म्हणून आम्ही हें पुस्तक लिहितांना शक्य तेवढी खबरदारी घेतली आहे. अतिशयोक्तीच्या दोषांतून अलिप्त राहातां यावें म्हणून कीर्तनाच्यासंबंधीं अनेक वर्तमानपत्रांतून व इतर लोकांकडून जे उल्लेख आले आहेत त्यांतील कांहीं कांहीं प्रत्येक कीर्तनाच्या वर्णनापुढें दिले आहेत.)

समजावून दिल्यानंतर मागील आख्यानाप्रमाणें रोज वाचण्याचा परिपाठ ठेविला. परंतु तसें करणें तिला न पटून तिनें सांगितलें कीं, "लिहिलेलें आख्यान माझ्याजवळ द्या. माझें मीच तयार करतें. असें करणेंच मला सोपें जाईल." तेव्हां ती वही तिला दिली. ती रोज वही घेऊन दोन तीन तास एकटीच वाचीत बसे. १५ दिवसांत संपूर्ण आख्यान तयार झाल्यानंतर तिनें **दादांना** व घरांतील मंडळींना तें करून दाखविलें. कुठेंही सांधा चुकल्यास ती स्वत: पदरचे शब्द घालून सांधा जुळवून घेत असे. या वेळीं आम्हांस तिच्या बुद्धिमत्तेचें अपरिमित कौतुक वाटलें. आनंदाश्रु आले. घरांतील मंडळीस आख्यान लिहून देणें व गाणीं बसवून घेणें या दोन कामांशिवाय दुसरे कसलेच कष्ट पडले नाहींत.

सन १९२१ सालीं जानेवारी महिन्यांत **धरणगांव** येथील इंग्रजी शाळेंत **शांताबाईचें "दामाजी"** आख्यानावर कीर्तन झालें. त्याप्रसंगीं शाळेमधील विद्यार्थी, शिक्षकवर्ग व गांवांतील लोक हजर होते मुलांना उदाहरण घालून देण्याकरितां व त्यांचें आंगीं सभाधीटपणा आणि वाक्चातुर्यादि गुण आणण्याकरितां शाळेच्या हेडमास्तरांनीं हा योग मुद्दाम जमवून आणला होता. या कीर्तनासंबंधीं **शांताबाईचा** गौरव करण्याकरितां जो समारंभ झाला त्यामध्यें भाषणें होऊन पुढील काव्य अभिनंदनादाखल तिला अर्पण करण्यांत आलें.

कु. शांताबाई ओंकार

यांचें

अभिनंदन

होतो ऐकुनियां आम्ही अजवरी बाला करी कीर्तन ।
तीही अष्टवयी म्हणोनि कळतां उत्सुक होई मन ॥

तोही दैववशें आम्हांस कळतें आलीस शांता असें ।
पाहोनि तव कीर्तनादिक कला आनंदलीं मानसें ॥ १ ॥
आहा ! धैर्य तुझें अलौकिक असें ती प्रौढ वाणी किती ।
तीही स्पष्ट खरी परी मधुरशी ऐकावयाला अती ॥
भाषेची सरणी अती सरल ती जैशी नदी वाहते ।
वक्तृत्वांत तसें कुठें न अडसी थोडां न जें साधतें ॥ २ ॥
कोणी सान तसाच थोरहि असो नाहीं वया मान तो ।
आहे जो गुणवान त्यांस जगतीं तो थोरही मानतो ॥
आम्ही थोर तुझें परीस अवघे तूं सान होशी जरी ।
होशी पूज्य आम्हांस तूं तवगुणें हें सत्य आहे परी ॥ ३ ॥

विद्यार्थी, इंग्रजी शाळा,
धरणगांव.

यानंतर **शांताबाईस** गायनाची माहिती व्हावी म्हणून गायन व पेटी शिकविण्यास सन १९२२ सालीं जुलै महिन्यापासून एका तज्ज्ञ-शिक्षकाची योजना केली. त्यांनीं आख्यानामधील गाण्यांस उत्तम उत्तम चाली लावून देऊन तीं गाणीं तालसुरावर बसवून घेतलीं.

शांताबाईस गणेशोत्सवाकरितां १९२२ सालीं मुंबई, वऱ्हाड, खानदेश, कुर्डुवाडी, धारवाड, वगैरे ठिकाणाहून पुष्कळच बोलावणीं आलीं. पुण्यामधील गणेशोत्सवांतील दोन कीर्तनें करून ती आपल्या वडिलासह कुर्डुवाडीचे उत्सवास गेली. यावेळीं रा. साठे-तिचे गायन-शिक्षकही—तिजबरोबर होते. सर्व आमंत्रणांपैकीं कुर्डुवाडीचें आमंत्रण स्वीकारण्यास एक कारण होतें. **शांताबाईची ताई** आपल्या पतीसह कुर्डुवाडीस ती आपल्या दीराकडे येणार होती. या कारणानें हेंच गांव तिनें पसंत केलें.

ता. १।९।२२ रोजीं संध्याकाळचें कीर्तन बी. एल्. रेल्वे गणेश मंडळामार्फतानें श्री मोरयासमोर स्त्रीयांमध्यें झालें. कीर्तन अप्र-

तिम झाल्याबद्दल लगेंच चोहोंकडे बोलबाला झाला. जी. आय्. पी. रेल्वे गणेश मंडळाच्या गणपतीपुढे कीर्तन झालें पाहिजे, असा त्या मंडळींनीं आग्रह धरला. शांताबाईस राहाण्यास सवड नसल्यानें शांताबाईनीं त्याच दिवशीं रात्रीं स्त्रीपुरुषाच्या प्रचंड समुदायांत पुन्हां कीर्तन केलें. एकाच दिवशीं दोन कीर्तनें अशीं हीं पहिलींच झालीं. या कीर्तनास गांवांतील व आजुबाजूच्या गांवांतील प्रचंड जनसमूह लोटला होता. बंदोबस्त उत्तम होता. श्रोतृसमाज भारल्याप्रमाणें तल्लीन झालेला होता. दोन्हीही मंडळांनीं उत्तम संभावना केली. शांताबाई दुसरे दिवशीं सकाळीं निघणार होती, तेव्हां ६ वाजल्यापासून अनेक स्त्रीपुरुष तिचें अभिनंदन करण्यास सारखे येत होते. पोंचविण्यासही बरेच लोक स्टेशनवर हजर होते.

बी. एल्. रेल्वे गणेश मंडळानें रुपये व बहुमोल सुवर्णपदक दिलें. (तें पदक मागाहून मुद्दाम तयार करवून पुण्यास धाडण्यांत आलें.)

रावसाहेब आर. बी. पुराणिक (ट्रॅफिक मॅनेजर) प्रेसिडेंट बी. एल्. रेल्वे, गणेश मंडळ यांनीं सुवर्णपदक पाठवितांना शांताबाईचे वडिलास पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें आहे—

Kurduwadi.

12 September 22.

Dear sir,

As directed by the Ganesh Mandal I am pleased to forward per parcel-post a Gold Medal to be handed over to Miss Shantabai Onkar for the splendid Hari-Kirtan performed by her in Ganpati Pendal on Friday the 1st September 1922 at Kurduwadi.

In Consideration of her very young age, the performance was really encouraging and was witnessed with greatest pleasure by the large audience.

(सारांश—ता. १।९।२२ शुक्रवार रोजीं कुर्डुवाडीस कुमारी शांताबाई ओंकार यांनीं जें उत्तम कीर्तन केलें, त्याबद्दल त्यांना सुवर्णपदक देण्यासाठीं गणेशमंडळाच्या आज्ञेप्रमाणें मी तें पोस्टपार्सलनें पाठवीत आहे. तिच्या अल्प वयाचा विचार करितां शांताबाईचें कीर्तन उत्साहजनक वाटलें, व तें फार मोठ्या समाजानें आनंदानें ऐकलें.)

या कुर्डुवाडीच्या जयजयकारानें **शांताबाईस** अधिक उत्साह आला. **श्री शिवाजी माहाराजावर** एखादें चांगलें आख्यान रचून देण्यास तिनें त्यावेळीं आपले **दादास, ताईस व मावशीस** (लेखिकेस) सांगितलें.

अफजुलखानाच्या वधाचें आख्यान रचावें असें आमच्या सर्वांच्या मतानें ठरलें. तें **इतिहासास** धरूनच असलें पाहिजे, या कारणानें बरींच पुस्तकें व बखरी वाचून त्यावरून तें तयार केलें. त्यांतील गाणीं तिच्या **ताईनें** व मावशीनें रचून दिलीं. तें अगदीं नवीन तऱ्हेचें आख्यान पाहून **शांताबाईस** फार आनंद झाला. मागील आख्यानाप्रमाणें **शांताबाईनें** हें आख्यान ताबडतोब बसविलें.

हें आख्यान लिहितांना आम्ही सोप्या शब्दाची वगैरे आवडनिवड केली नाहीं. उलट यामधील विचारसरणीही अवघड अशींच झाली. त्याचप्रमाणें यांत अनेक मोठ मोठे शब्द आलेले आहेत. आख्यान लिहितांना तें **शांताबाई** करणार आहे, तरी लहान लहान शब्द घालावे वगैरे कसलेंच बंधन आम्ही आपल्या मनांत ठेविलें नव्हतें. ता. ५ डिसेंबर १९२२ रोजीं ह्या

आख्यानावरील कीर्तन श्री. **मोरोबा दादा फडणीस** यांचे वाड्यांत झालें. याप्रसंगीं **वीर वामनराव यांचे हातून शांताबाईस** सुवर्णपदक देण्यांत आलें. या कीर्तनासंबंधीं कांहीं वर्तमानपत्रांतून आलेले अभिप्राय खालीं दिले आहेत. ता. १४।१२।२२ च्या अंकांत '**लोकमान्य**' कर्ते लिहितातः—

"कीर्तन सुश्राव्य झालें. श्रोतृसमाज अगदीं तल्लीन झाला होता. नवीन तऱ्हेनें बसविलेलें हें आख्यान फारच उत्तम बसलें आहे."

ज्ञानप्रकाशकार ता. १२-१२-२२ च्या अंकांत लिहितातः—

"आख्यानाची रचना चांगली साधली असून तें **शांताबाईनें** उत्तम रीतीनें वठविलें."

ता. १८ डिसेंबर १९२२ रोजीं **शांताबाईचें** ह्याच आख्यानावरील कीर्तन पुणें व्यापारी–मंडळामार्फत झालें. तेंही उत्तम झालें. तेव्हां तेथें **शांताबाईचा** चांगला गौरव करण्यांत येऊन त्यांना रावसाहेब **चिमणलाल** शेट ऑ. मॅजिस्ट्रेट यांच्या हस्तें सुवर्णपदक व जरीचें पोलकें देण्यांत आलें. श्री. **मोरोबादादांचे** वाड्यांतील ऐतिहासिक कीर्तनाचा चांगलाच बोलबाला झाला असल्यानें शहरांतील अनेक विद्वान् गृहस्थ या कीर्तनास आले होते. यांत येथील प्रसिद्ध रहिवासी प्रो. **लक्ष्मणशास्त्री लेले** हे आले होते. त्यांनीं हें कीर्तन ऐकल्यावर **भास्करराव ओंकार** यांजकडे स्वरचित काव्य पाठवून **शांताबाईच्या** अलौकिक गुणांबद्दल अभिनंदन केलें.

यानंतर ज्या योगानें **शांताबाईच्या** गुणांचे महाराष्ट्रानें कौतुक केलें, तिच्या असाधारण बुद्धिमत्तेचा गौरव केला, तिच्या अश्रांत श्रमाचें चीज झालें, तो योग स्वाभाविकपणें जमून आला. सन १९२३ सालीं **श्रीशिवाजीमंदिरांत** याच सालीं **श्रीशिवाजीमहाराजांचा** पुतळा बसविण्याचा मोठा समारंभ झाला. त्या

समारंभास महाराष्ट्रांतून दूरदूरचे गृहस्थ आले होते. त्या **शिवजयंती** समारंभांत कीर्तन करण्याकरितां **शांताबाईस** आमंत्रण आलें. एवढ्या मोठ्या उघड्या पटांगणांत प्रचंड जनसमुहापुढें कीर्तन करणें साधी गोष्ट नाहीं. ते **शांताबाईसारख्या** अल्पवयी बालिकेच्या हातून पार पडेलच असें आम्हां कोणासच वाटेना. तेव्हां आलेलें बहुमोल आमंत्रण स्वीकारावें कां साभार नाकारावें या विचारांत असतां **शांताबाई** म्हणाली, " छे, छे, नाकारावयाचें नाहीं. काय होईल तें होवो. **श्रीशिवाजीमंदिरांत** कीर्तन करावयाचेंच. असा शुभ प्रसंग दुसरा तो कोणता असणार ? कीर्तन नाहींच जमलें, तर होईल फजिती. शिवाय **तात्यासाहेब** तेथें हजर असणारच. ते काय माझ्यासारख्या मुलाबाळाची फजिती होऊं देतील ? कल्ला झाला तर स्वयंसेवकांकडून ते खास बंदोबस्त राखतील. कीर्तन करायचेंच. ठरलें."

शांताबाईची इतकी तयारी पाहून कीर्तनाचें नक्की केलें कीर्तनाचे आदले दिवशीं **शिवाजीमंदिरांतील** कीर्तनाच्या जागेचें भव्य व उघडें पटांगण **दादांनीं शांताबाईस** दाखविलें. प्रत्यक्ष जागा पाहून **दादांना** उद्यांच्या कीर्तनाचें यशस्वीपणाबद्दल जरा अंदेशा वाटूं लागला, परंतु **शांताबाईस** अधिकच उत्साह आला.

शांताबाईची ताई मुद्दाम कीर्तनाकरितां येथें आली होती. कीर्तनाचे आदले रात्रीं **ताई शांताबाईस** म्हणाली, " उद्यां तुझी खरी परीक्षा आहे. तुझ्यासारख्या वामनमूर्तीची कर्तबगारी पहाण्याची उद्यांचीच वेळ आहे, मूठभर हाडें, चिमुटभर मांस व पावट्याएवढा जीव, याची करामत उद्यां पाहावयाची आहे **शांताबाबा** तुझा आवाज जवळच्या मंडळींला तरी त्या उघड्या मैदानांत व गलबल्यांत ऐकूं येईल का ? कीर्तन यशस्वी झालें तर परमाश्चर्य ! तसें कदाचित् घडलें नाहीं, तर तुझ्या चिमुकल्या जीवाकडे पाहातां

आम्हांला त्याचें कांहींच वाटणार नाहीं. आम्ही तुला मुळींच दोष देणार नाहीं."

ह्यावर शांताबाईनें उत्तर दिलें, "श्रीशिवाजीमंदिरांत श्री. शिवाजीमहाराजांचें आख्यान एक अल्पवयी मुलगी करीत असतां अपयश येईल, अशी तुला शंका कां येतें ? उद्याचें कीर्तन सर्वो-त्तम होईल अशी माझी मनोदेवता सांगते." अशी खात्री आजप-र्यंत शांताबाईनीं कोणतेंच कीर्तनाचे वेळीं दिली नव्हती. परंतु काय असेल तें असो, या वेळचा तिचा उत्साहच कांहीं निराळा होता, हें खास. ता. २० एप्रिल १९२३ रोजीं संध्याकाळीं श्रीशिवाजी-मंदिरांत सायंकाळीं ६॥ वाजतां शांताबाईचे कीर्तनास आरंभ झाला. शांताबाई सर्वत्रांस दिसावी म्हणून व्यासपीठ बरेंच उंचीचें तयार करण्यांत आलें होतें. हजारों माणसांचा समूह मोठ्या कुतुहलानें त्या लहानग्या बालिकेचें कीर्तन ऐकण्यास उत्सुक झाला होता. ४।५ हजार लोकांचा कल्पनातीत समूह पाहून आम्ही सर्व मंडळी कीर्तनाचे यशस्वीपणाबद्दल साशंक झालों. जिकडे तिकडे गोंगाट सुरू होता. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं; कीर्तन सुरूं होतांच ३।४ मिनिटांतच चोहोंकडे नितांत शांतता झाली. अशा मोठ्या समाजांत इतकी कल्पनातीत शांतता आम्ही पूर्वीं कधींही पाहिली नव्हती. कोणीही यत्किंचित् आवाज केला नाहीं. आमच्या म्हणण्याचे सत्यतेकरितां आम्ही पुढें वर्तमानपत्रांतील लेखांचे उतारे दिले आहेत, त्यावरून अगदीं अशीच स्थिति होती, हें कळून येईल.

शांताबाई अगदीं शांत होती. तिच्या वृत्तींत बिलकुल गडबड झाली नाहीं. उलट ती फारच उत्साही दिसत होती. कीर्तनांतील शब्दन् शब्द प्रत्येकास ऐकूं येत होता. ती ऐखाद्या देवतेप्रमाणें तेजःपुंज दिसत होती, व तसे कैकांनीं जागच्या जागीं उद्गारही काढले.



ता. २०।४।२३ रोजीं श्रीशिवाजीमंदिरांत कीर्तन झालें त्या वेळचा फोटो.

(पान-४८).

प्रसंगानुसार कैकांनीं धन्योद्गार काढले. सद्यःस्थितीस अनुलक्षून जेथें जेथें मार्मिक विवेचन केलें होतें, त्या त्या ठिकाणीं आनंदातिशयानें बेभान होऊन श्रोत्यांनीं टाळ्या वाजविल्या. या कीर्तनाचे उत्कृष्टपणाबद्दल आम्ही पुढें जे वर्तमानपत्रांतील उतारे दिले आहेत, त्यांत सर्व गोष्टींचा उल्लेख येत असल्यानें त्याबद्दल जास्त विवेचन आम्ही करीत नाहीं.

Maratta :—(22 april 1923)............" Kumari Shantabai Onkar who is aged only nine years performed a Hari Kirtan......Her method of explaining the subject and her powers of exposition of some of the points on Hindu Philosophy were very interesting. Her singing was an additional and interesting feature........."

लोकसंग्रह—ता. २३ एप्रिल १९२३ दुय्यम अग्रलेख.

यंदाच्या शिवजयंत्युत्सवाच्या कार्यक्रमांत कु. शांताबाई ओंकार यांच्या कीर्तनाचाही समावेश करण्यांत आला होता. सदर कीर्तन शुक्रवार ता. २०।४।२३ रोजीं श्रीशिवाजीमंदिरांत सायंकाळीं सात–साडेसात वाजतां सुरू होऊन सुमारें दीड दोन तास चालू होतें. कीर्तनास श्रोतृवृंद फारच मोठ्या प्रमाणावर लोटला होता. कु. शांताबाई यांचें वय सुमारें १०।११ वर्षांचें असावें. इतक्या लहान वयांत त्यांनीं केलेलें कीर्तन ऐकून श्रोत्यांस नवल वाटून त्यांचे तोंडून कौतुकपूर्ण प्रशंसेचे उद्गार निघाल्यावांचून रहात नाहींत.

अलोट गर्दी लोटली असतांनासुद्धां शांताबाईनीं कीर्तनास सुरवात करतांच जिकडे तिकडे इतकी शांतता पसरली कीं, शांताबाईचा आवाज फारसा मोठा नसतांही अगदीं दूरच्या मंडळीसही कीर्तन स्पष्टपणें ऐकूं आलें. प्रथमतः कथेच्या पूर्वरंगांत भक्तिसंबंधानें दोन शब्द सांगून हल्लींच्या व्यापारी भक्तीचें सरस वर्णन केलें. नंतर मूळ आख्यानांस सुरवात झाली. श्रीशिव-

छत्रपतींनीं प्रतापगडचे किल्ल्यांत भेट घेऊन पैजेचा विडा उचलून आलेल्या अफझूलखानाला ठार मारून हिंदवी स्वराज्याचा एक शत्रु कसा नाहींसा केला ह्याचें वर्णन, हा कथेचा विषय होता. तो शांताबाईनीं इतका खुलविला कीं, सर्व श्रोते तन्मय होऊन गेले होते. शांताबाईची वर्णनशैली व कीर्तनपद्धति वाखाणण्यासारखी होती. विशेषतः इतक्या मोठ्या समाजांत न भितां, न घाबरतां दीडतासपर्यंत अस्खलित वाणीनें आख्यान रंगविणें व तेंही दहा अकरा वर्षांच्या लहान बालिकेनें खुलविणें ही कौतुकास्पद गोष्ट आहे. शांताबाईचा सभाधीटपणा, मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्यांनासुद्धां, लाजविणारा होता. वक्तृत्वशैली फारच उत्तम असून कीर्तनाचा ओघ अस्खलितपणें प्रशांत असा वहात होता. योग्य शब्दावर जोर देणें, निरनिराळे आवाज (tones) काढून संभाषण खुलविणें, योग्य ठिकाणीं थांबणें वगैरे वक्तृत्व शास्त्रांतले गुण शांताबाईच्या आंगीं इतक्या लहानपणीं इतक्या उत्तम रीतीनें ठसले आहेत कीं, ते पाहून मोठमोठ्या वक्त्यांनींसुद्धां तोंडांत बोटें घालावीं. या उत्कृष्ट वक्तृत्वाला मधून मधून अभिनयकुशलतेची जोड मिळाल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें वाटत होतें. शिवाय कीर्तन करितांना मधून मधून म्हणण्यांत येणारीं प्रसंगोचित पदें व श्लोक त्या इतक्या सहजतेनें व सुंदरतेनें म्हणत कीं, त्यामुळें त्यांच्या स्मरणशक्तीचें कौतुक वाटे. कीर्तनांत साधेपणाची चमकही वरचेवर दृग्गोचर होत होती. त्यामुळें कीर्तन फारच सुंदर वठलें. शेवटीं शेवटीं शिवाजी महाराजांस केलेला जिजाई मातोश्रीचा उपदेश फारच हृदयंगम व चिंतनीय होता. अफझुलखानाच्या वधाचें आख्यान लावून थोर पुरुष असतात त्यास अपयश कधींही येत नाहीं, ते नेहमीं विजयश्रीनें मंडितच असतात; अशा अर्थाचा सुंदर व परिणामकारक समारोप करून दीडतासानें हें काव्यमय रमणीय कीर्तन समाप्त झालें.

एवढ्या लहान वयांत असलें सुंदर कीर्तन करण्यास परमेश्वरी कृपेचा वरदहस्तच असावा लागतो. शांताबाईचा हा गुण यांना मोठा भूषणावह आहे.

ज्ञानप्रकाश (पत्र) ता. २४।४।१९२३

काल ता. २० रोजीं सायंकाळीं शिवाजीमंदिरांत कु. शांताबाई ओंकार

यांचें कीर्तन झालें. कीर्तनश्रवणास श्रोतृसमुदाय पांच हजारापर्यंत होता. कीर्तन दोन तासांवर चाललें होतें. एखाद्या पटाईत हरदासालासुद्धां लाजविण्यासारखें हें कीर्तन होतें. हें तेथें हजर असणाऱ्यांना सांगण्याचें कारण नाहीं. कु. शांताबाई यांचें वय १० वर्षांचें असावें. हें वय लक्षांत घेतां त्यांची शैली, त्यांची धिटाई वगैरे गोष्टी फारच कौतुकास्पद अशाच आहेत. एवढा मोठा श्रोतृसमुदाय परंतु " हुं कीं चुं " देखील कोणी केलें नाहीं. हा परिणाम केवळ कु. शांताबाईच्या अल्पवयामुळें व त्यांच्या बुद्धीच्या कुशाग्रतेमुळेंच उत्पन्न झाला होता यांत शंका नाहीं.

ज्ञानप्रकाश (पत्र) ता. ६।५।२३.

... ... (शांताबाईची) कीर्तन करण्याची शैली पाहिली म्हणजे त्यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच होणार आहे,... ... ... त्या गार्गी, मैत्रेयी, मंडणमिश्रपत्नी सरस्वती याप्रमाणें जगद्विख्यात पंडिता होण्यांतच त्यांच्या आयुष्याचें खरें खरें सार्थक आहे.

केसरी—ता. २४ एप्रिल १९२३.

कीर्तन.

यंदाच्या शिवजयन्त्युत्सवाच्या कार्यक्रमांत कु. शांताबाई ओंकार यांच्या कीर्तनाचा समावेश करण्यांत आला होता. सदर कीर्तन शुक्रवार ता. २०।४।२३ रोजीं श्रीशिवाजीमंदिरांत सायंकाळीं सहा वाजतां सुरूं होऊन सुमारें दीडतासपर्यंत चालूं होतें. कीर्तनास श्रोतृवृंद बऱ्याच मोठ्या प्रमाणावर लोटला होता. कु. शांताबाई यांचें वय सुमारें १०।११ वर्षांचें असावें. इतक्या लहान वयांत त्यांनीं केलेलें कीर्तन ऐकून श्रोत्यांस नवल वाटून त्यांचे तोंडून कौतुकपूर्ण प्रशंसेचे उद्गार निघाल्यावांचून राहिले नाहींत.

शांताबाईचा आवाज फारसा मोठा नसतांही अगदीं दूरच्या मंडळींसहि कीर्तन स्पष्टपणें ऐकूं आलें. शांताबाईची वर्णनशैली व कीर्तनपद्धति वाखाणण्यासारखी होती. विशेषतः इतक्या मोठ्या समाजांत न भितां व न कचरतां दीड तासपर्यंत अस्खलित वाणीनें. आख्यान खुलविणें—व तेंही दहा अकरा वर्षांच्या लहान बालिकेनें खुलविणें—ही कौतुकास्पद गोष्ट आहे.
... ... बाला हरिदासी कुमारी शांताबाई

ओंकार हिच्या कीर्तनप्राविण्याबद्दल तिला कुंकवाचा करंडा व अफझुल-खानाच्या वधाचें पुस्तक बक्षीस देण्यांत आलें अध्यक्षांनीं कुमारी शांता-बाई ओंकार हिच्या सभाधीटपणाची व वक्तृत्वाची प्रशंसा केली.

श्रीशिवजयंत्युत्सवाच्या चौथ्या वर्षाचा अहवाल. (शके १८४५.)

शुक्रवारीं सायंकाळीं, कुमारी शांताबाई ओंकार ह्या नऊ दहा वर्षांच्या मुलीचें सुमारें दीड तासपर्यंत सुश्राव्य असें सुंदर कीर्तन झालें. कीर्तनासहि श्रोतृवृंद बराच मोठा जमला होता. कुमारी शांताबाई इनें इतक्या लहान वयांत केलेलें कीर्तन ऐकून श्रोत्यांस मोठें नवल वाटून त्यांचें तोंडून कौतुक-पूर्ण व प्रशंसनीय उद्गार निघाल्यावांचून राहिले नाहींत. शांताबाईची वर्णनशैली वाखाणण्यासारखी होती. विशेषतः एवढ्या मोठ्या समाजांत न भितां व न कचरतांही दीडतासपर्यंत अस्खलित व कोमलवाणीनें आख्यान खुलविणें व तेंहि लहान बालिकेनें, हें खरोखरच कौतुकास्पद होय! ... ... बालहरिदासी कु. शांताबाई ओंकार इच्या कीर्तनप्राविण्याबद्दल तिला एक कुंकवाचा रौप्यकरंडक व मंडळानें प्रसिद्ध केलेलें अफझुलखानाचा वध हें पुस्तक मोठ्या कौतुकानें बक्षीस देण्यांत आलें. ... ... बालहरिदासी कु. शांताबाई ओंकार इच्या सभाधीटपणाची व वक्तृत्वशैलीची प्रशंसा करून अध्यक्ष म्हणाले कीं, या हरिदासीच्या कीर्तनांत दोषच काढावयाचा झाल्यास, तिची भाषा बोलण्यांत फारच व्याकरणशुद्ध असते, असा काढतां येईल. बोलतांना आपण ' केलें असतें ' असें म्हणत नाहीं. ' केलं असतं ' असें म्हणतों. याप्रमाणें बोलण्याच्या पारि-भाषिक पद्धतीनें या मुलीला तयार केल्यास मोठमोठे हरिदास व ही बाल-हरिदासी यांतहि फरक दिसून न येतां, इच्या कीर्तनांत सहजसुलभतेचा गुण दिसून येईल. ... ... **कु. शांताबाई ओंकार या लहान मुलीचें** कीर्तन कौतुकास्पद झालें. कु. शांताबाईचें वय अगदीं लहान असून तिचा सभाधीटपणा मोठमोठ्या पुरुषांसही लाजविणारा आहे. तिचें पाठांतर, वर्णन करण्याची शैली व मधुर गायन हें ऐकून कोणासहि समा-धान व कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं. इतक्या लहान वयांत अशा प्रकारचें गृहशिक्षण देण्याची पद्धति फारच थोड्या ठिकाणीं आढळते. असल्या शिक्षणांत वाढलेलें मूल केव्हांहि सदाचारसंपन्न व कर्तृत्ववान् झालें पाहिजे, अशी अपेक्षा करणें वावगें होणार नाहीं. ... ...

आभार प्रदर्शनाच्या या यादींत कु. शांताबाई ओंकार इचा प्रामुख्यानें उल्लेख करणें किती अगत्याचें, आवश्यक व कौतुकास्पद आहे, हें आपल्या सर्वांच्या ध्यानांत येईलच.

आनंद–(मासिक) मे सन १९२३. (या अंकांत शांताबाईचें छायाचित्र देऊन पुढील मजकूर लिहिला आहे.)

—पांच हजार लोकसमुदायापुढें उत्कृष्ट कीर्तन (शांताबाईंनीं) करून सर्वांकडून वाहवा व धन्यता मिळविली. कु. शांताबाई ही येथील नागरिक रा. भास्करराव ओंकार यांची कन्या असून येथील फिमेल हायस्कुलांत इंग्रजी दुसऱ्या यत्तेंत आहे. वडिलांच्या काळजीपूर्वक शिक्षणामुळें मराठी भाषेचें ज्ञान, सभाधीटपणा, बहुश्रुतपणा व वक्तृत्व हे गुण या मुलीचेठायीं चांगले उतरले आहेत. कु. शांताबाईची मावशी व वडील बहीण या दोघी चांगल्या कवयित्री असून त्या दोघींनींही विद्वत्समाजाकडून प्रशंसा व अनुक्रमें ' काव्यकल्पलता ' आणि ' काव्यचंद्रिका ' अशा पदव्या मिळविल्या असल्यामुळें त्यांच्या सांनिध्यानें व वडिलांच्या उत्कृष्ट शिकवणीनें या मुलीच्या बुद्धिमत्तेचा चांगला विकास होऊन वयाच्या सातव्या वर्षापासूनच ही कीर्तन करूं लागली. ...कु. शांताबाई यांना आतांपर्यंत अनेक सुवर्णपदकें मिळालीं आहेत. ... ... पुणें शहरांत आपल्या हृदयस्पर्शी व मोहकवाणीनें तिनें हजारों जनांना चकित करून सोडलें. तिचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

मौज—ता. २५ एप्रिल १९२३.

कीर्तनास समाज ४।५ हजारावर होता, तरी कीर्तन चालू होतांच तो अत्यंत शांत व एकाग्र झालेला दिसत होता. कीर्तनामधील प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी असून तो शांताबाईंनीं आपल्या रसाळवाणीनें व अमोघ विचारसरणीनें फार बहारीचा व उत्तमोत्तम वठवून दिला. शांताबाईची निरूपणपद्धति खरोखरी परिणामकारक असून त्यांची अस्खलित वाणी व सभाधीटपणा वाखाणण्याजोगी आहेत. ... ... श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं समारोपाच्या वेळीं यासंबंधीं धन्योद्गार काढून कुमारी शांताबाईस चांदीचा करंडा बक्षीस दिला. अहवालांत कीर्तनासंबंधीं उल्लेख

करतांना चिटणीस यांनीं पुढील प्रशंसापर उद्गार काढले आहेत " असली तेजस्वी विचारसरणीची मुलगी वीरपत्नी, वीरस्नुषा व वीरमाता होण्याच्या योग्यतेची असून ती तशी होवो, असा आमचा तिला पूर्ण आशीर्वाद आहे. " अशा रीतीचें गृहशिक्षण बालकांना मिळत गेल्यास पुढील पिढी कर्तृत्ववान् व ओजस्वी निघाल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

अशाच प्रकारचे **शांताबाईच्या** या कीर्तनासंबंधीं इतर अनेक वर्तमान पत्रांनीं उद्गार काढले आहेत. यावरून त्या बालिकेचें कीर्तन किती तेजस्वी होत असे, तें स्पष्ट कळण्याजोगें आहे. इतक्या लहान वयांत इतक्या यशस्वी रीतीनें कीर्तनें केल्याचीं उदाहरणें सांपडतील कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. तिची बुद्धिमत्ता, तिची ग्रहणशक्ती असाधराण अशीच होती. तिच्यांत अनेक प्रशंसापर गुण होते व ते कीर्तनाच्या योगानें जनतेच्या निदर्शनास आले.

असो. **शांताबाईच्या** आत्मविश्वासाप्रमाणें **श्रीशिवमंदीरांतील** कीर्तन सर्व रीतीनें संपूर्ण यशस्वी ठरलें व आमच्या शंका अकारणिक ठरल्या. या कीर्तनास कितीतरी विद्वान् मंडळी आली होती ! साताऱ्याचे सुप्रसिद्ध वकील **श्री. दादासाहेब करंदीकर** यांनीं कीर्तन संपतांच **दादांचे** जवळ येऊन ते त्यांना म्हणाले—" **शांताबाईची** स्तुति करावी तेवढी थोडीच यांत शंका नाहीं. तिनें फारच बहार केली. मोठमोठ्या हरिदासांवर **शांताबाईनें** ताण केली ". यावेळीं **शांताबाई भास्करावांचे** जवळ तिच्या मामाच्या कडेवर होती. तिचेही त्यांनीं मोहभरानें अभिनंदन केलें. कीर्तन झाल्यावर **शांताबाईस** जाण्यास वाट मिळेना. अनेक लोक समक्ष अभिनंदन करण्यास तिच्या भोंवतालीं जमले. **शांताबाईनें** हळूंच मामाचे कानांत सांगितलें, "**मामा,** मला आईकडे नेऊन सोडा " परंतु वाटच मिळेना. तेव्हां **मामा** आर्जवी भाषेंत लोकांना उद्देशून म्हणाले, "**शांताबाई** दमली

आहे, आपले मंडळींत केव्हां जाऊन पडतें, असें तिला झालें आहे, तरी कृपा करून वाट द्या." यानंतर पुढें जेमतेम वाट मिळाली. त्या दिवशीं आम्हीं सर्वत्रांनीं तिचे अननुभूत जयजयकार केले असल्यास नवल तरी काय! याच कीर्तनामुळें ती आमच्यापैकीं सामान्य नसून अनेक उत्तम गुणयुक्त अशी असाधारण बालिका आहे, असें आम्हांस वाटूं लागलें. पुढें २।३ दिवस तिच्या अभिनंदनार्थ कित्येक स्त्रीपुरुष आमच्याकडे व दादांच्याकडे येत होते. त्याचप्रमाणें कैक अभिनंदनपर पत्रेंही दादांच्याकडे आलीं.

शिवपराक्रम आख्यान शांताबाईनें बसविलें, त्यावेळीं तें पहिल्यांदा दादाचे स्नेही रा. माधवराव कवडे यांना घरीं समग्र करून दाखविलें. तें ऐकून व त्यांतील विचारसरणी, प्रौढ भाषा व तें साभिनय करून दाखविण्याची शांताबाईची चित्ताकर्षक हातोटी ही पाहून ते त्याचवेळीं म्हणाले, "हें आख्यान शांताबाईच्या गुणांचें खास चीज करील. शांताबाई तें करीत असतां तिच्यांत तद्रुपता येऊन ती निराळीच दिसते. शांताबाईमध्यें कांहीं दैविक शक्ती आहे, हें खास. हें आख्यान शिवाजीमंदिरांत करण्याजोगें आहे. आणि तेथें तें एकदां झालें कीं, मी काय म्हणतों याची प्रचिती तुम्हांस येईल". त्याप्रमाणेंच अगदीं तंतोतंत झालें.

या आल्हादकारक प्रसंगाच्या गुणवर्णनांतून आमची लेखणी बाहेर पडूं इच्छित नाहीं. त्याच प्रसंगाचीं नानाविध वर्णनें करण्यास घोंटाळत आहे. कीती लिहावें व किती नाहीं, इतका तो तिच्या व आमच्या सर्व आयुष्यामधील अप्रतिम व नयनमनोहर प्रसंग होता. आतां आम्हांस शांताबाई कायमची अंतरली असल्यानें ह्या गोड प्रसंगाच्यापुढें जाऊंच नये, यांसच चिरकाल चिटकून राहावें असें वाटतें. कारण हे आनंददायक शिवपराक्रम-कीर्तनाचें विवेचन करीत असतां जरा त्यावरून चित्त इकडेतिकडे वळलें

कीं, तिच्या चिर वियोगाचें आकाळविकाळ भेसूर चित्र डोळ्यांपुढें उभें रहातें व दृष्टीस भीषण काळोखी आणतें.

* * * *

या कीर्तनानंतर येथील सुप्रसिद्ध रहिवासी श्री. **वामनराव तळवळकर** वकील ता. २१ । ५ । २३ रोजीं सकाळीं **दादांचेकडे** येऊन म्हणाले कीं, दे. भ. **आण्णासाहेब परांजपे** यांनीं आपणांस सांगितलें आहे कीं, येत्या **शिवराज्यारोहणप्रसंगीं शांताबाईचें** कीर्तन ता. २९ मे १९२३ रोजीं **श्रीशिवाजीमंदिरांत** झालें पाहिजे; हें सांगण्यास व वेळ वगैरे ठरविण्यास मी आलों आहे.

यावर **दादा** म्हणाले—" हें होणार तरी कसें ? अवघी ८ दिवसांची अवधी. आख्यानाची जुळणीसुद्धां केलेली नाहीं. **शिवपराक्रम** एकच आख्यान **शांताबाईचें** तयार. तें **शिवमंदिरांत** गेले महिन्यांत झालें. तेंच पुन्हा लावणें युक्त नाहीं. तेव्हां **शांताबाईसंबंधाचा** बेत रहित करा. " **तळवळकर** म्हणाले; छे, छे, तसें होणेंच नाहीं. त्या शिवाय इतर कीर्तनास रंग येणार नाहीं. पाहिजे तर पौराणिक आख्यान लावा.

दादांनीं शांताबाईस हाका मारून त्यांचे समोरच तिचें मत विचारलें. ती म्हणाली—**शिवमंदिरांत शिवाजीचेंच** आख्यान पाहिजे. तुम्ही सर्व मंडळी ३।४ दिवसांत आख्यान रचून देत असाल, गाणीं जर आक्का (चरित्रलेखिका) रचून देत असेल, तर मी २।३ दिवसांत आख्यान खास बसवीन.

हा आत्मविश्वास पाहून त्यांना **शांताबाईबद्दल** अपरमित कौतुक वाटलें. तरी **दादांना** नवें आख्यान जुळवून लिहिलें जाऊन **शांताबाईकडून** बसविलें जाईल, असें वाटेना. त्यांनीं **तळवळकरांना** सांगितलें, "तिची तयारी आहे तर कोणतें तरी आख्यान

लावून त्या दिवशीं शांताबाई कीर्तन करील." श्री. तळवळकर पुढील तयारीस लागले.

त्याच दिवशीं दुपारपासून राज्यारोहणआख्यानाचे जुळवा-जुळवीस सुरवात झाली. बखरी, इतिहास वगैरें ५।६ पुस्तकांतून माहिती गोळा केली व ता. २३ मे १९२३ पासून आख्यान लिहिण्यास सुरवात झाली. यावेळीं एक विशेष गोष्ट झाली. या आख्यानांतील कांहीं प्यारे शांताबाईनें आपल्या अकलेनें जुळणी करून लिहिलें आहेत. त्यांमधील विचारपरंपरेस अगर भाषासरणीस योग्य भारदस्तपणा तिनें आणला आहे. अशा रितीनें जो भाग तयार होईल त्यामधील पद्यें आम्ही दोघी (मी व शांताची ताई) तयार करीत होतों. पद्यें तयार होतांच शांताबाई तीं बसविण्यास लागे. असा क्रम ता. २५ पासून ता. २८ मेपर्यंत चालला होता. ता. २८ रोजीं सर्व आख्यान लिहून झालें व त्याच दिवशीं रात्रीला शांताबाईचें आख्यान बसवून तयार झालें. तिच्या अद्वितीय ग्रहण शक्तीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. ता. २९ रोजीं सर्व पद्यें चालीवर व पेटीवर योग्यरीतीनें बसलीं गेलीं.

ता. २९ मे १९२३ रोजीं शिवराज्यारोहणानिमित्त रात्रीं १० वाजतां शिवमंदिरांत शांताबाईचें कीर्तन झालें. या कीर्तनास श्रीजगद्गुरुशंकराचार्य हजर रहाणार आहेत, हें पाहून शांताबाई फारच प्रफुल्लित झाली होती, परंतु कांहीं कारणामुळें श्रींना येण्यास जरा उशीर झाला व त्यांच्या आगमनाच्या आधीं १०।५ मिनिटें कीर्तन समाप्त झालें होतें.

कीर्तन नेहमींप्रमाणें सुश्राव्य व चित्ताकर्षक असेंच झालें. त्यावेळीं श्री. तळवळकरांनीं शांताबाईसंबंधीं प्रशंसापर भाषण केलें. "आठ दिवसांचे अवधींत आख्यानाच्या मजकुराची निवड करणें, तें लिहून काढणें, प्रसंगानुसार पद्यें रचणें व तें या अल्पवयी बालि-

केनें तयार करून उत्तम वठविणें हें नुसतें कौतुकास्पद आहे एवढेंच नव्हें, तर आश्चर्य करण्याजोगें आहे एवढं मोठें आख्यान तयार करण्यास **शांताबाईस** २।३ दिवसांवर बिलकूल सवड मिळाली नाहीं, हें मी खात्रीनें सांगत आहे". असें त्यांनीं सांगितलें.

यासंबंधीं सविस्तर हकिकत देणें म्हणजे मागील शिवजन्म-प्रसंगाची पुनरोक्ति होईल, या भयानें आम्ही जास्त न लिहितां त्यासंबंधीं येथील स्वराज्य पत्रांत जो मजकूर आला आहे तेवढाच देतों.

स्वराज्य—ता. ३०।५।२३.

" ... ... कु. शांताबाई ओंकार यांचें उत्कृष्टकीर्तन झालें. पुरी आठदिवसांचीही सवड नसतां नवीन राज्यारोहणाचें आख्यान बसवून तें सुंदर रीतीनें वठवून दिलेलें पाहून या १० वर्षांच्या 'कीर्तन कुमारी–' बद्दल कोणालाही अभिमान, आनंद व कौतुक वाटल्यावाचून राहणार नाहीं. तिचा सभाधीटपणा, समयोचित भाषणप्रवाह, संस्कृत कविता स्पष्ट व समजूतदारपणानें म्हणण्याची शैली, अस्खलित वाणी, मुख्यतः ५।७ हजार स्त्री-पुरुषांचा समाज चित्रासारखा शांत ठेवण्याची हातोटी, हीं सर्वच कौतुक करण्याजोगीं आहेत. ... ...

ता. ३१ मे १९२३ रोजीं गोखले यांच्या काळ्याहौदाजवळील **राममंदिरांत शांताबाईचें शिवपराक्रम**आख्यानाचें कीर्तन **श्रीजगद्गुरु शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी** यांनीं खास आपणापुढें करविलें. त्यावेळीं श्रोतृसमाज चार पांचशेंवर नव्हता तथापि शेलकी शेलकी मंडळी आलेली होती. **श्री.** आरंभापासून **शांताबाईचे** जवळच उजवे हातास व्यासपीठावर अधिष्ठित झालेले होते. **शांताबाईची** धर्मावर पूर्णश्रद्धा असे, यामुळें सर्व श्रेष्ठ **जगद्गुरुबद्दल** तिला आरंभा पासून परमावधीचा आदर वाटे. **श्रींना** नमस्कार करून नंतर तिनें मोदभरानें, शांतपणानें कीर्तनास आरंभ केला. पूर्वरंगाची निवड तिनें फारच मार्मिकपणानें केलेली होती. तिचे सर्वच पूर्वरंग व्यवहारास



ता. ३१ मे १९२३ रोजीं श्री जगद्गुरु शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांनीं " **कीर्तनालंकृति** " पदवी दिली त्यावेळचा फोटो. (पान–५९).

धरून असत. ब्रह्म व मायावगैरे विषयाला धरून अवघड असें कधींच नसत. पूर्वरंगांत कोटच्या, संस्कृत श्लोक, दोहरे वगैरे प्रसंगास अनुरूप असे गुफलेले होते. पूर्वरंगांत तिनें स्त्रीपुरुषांस एकसारखें हसविलें. नंतर तिनें आख्यानास आरंभ करून तें अगदीं खुलवून सोडलें. आख्यानाचा शेवटही तिनें बहारीनें केला. श्री परमसंतुष्ट झाले. त्यांना **शांताबाईच्या** अमोल गुणांबद्दल कळवळून आलेसें दिसलें. ते वत्सलतेनें तिच्याकडे पाहूं लागले. कीर्तन संपल्यावर त्यांचें अर्धा पाऊण तास **शांताबाईच्या** कीर्तन-प्राविण्यावर सुंदर **प्रवचन** झालें. त्यामध्यें त्यांनीं श्रोत्यांच्या मनावर आपल्या अधिकारयुक्त वाणीनें बालकें कशीं असावींत व तीं **धर्मकार्यास** व **राष्ट्रकार्यास** उपयोगीं पडतील, अशीं कशीं बनवावीं, **शांताबाईमध्यें** असाधारण असे किती गुण एकत्र झालेले आहेत, **कीर्तनापासून** केवढालीं **राष्ट्र** व **धर्मकार्यें** होण्याजोगीं आहेत वगैरेबद्दलचीं अमोघ तत्त्वें बिंबवून दिलीं. नंतर ते म्हणाले, "**शांताबाईसारख्या** बहुगुणी बालिकेच्या गुणाला उत्तेजन देणें राष्ट्राच्या व धर्माच्या दृष्टीनें अत्यंत जरुरीचें आहे. **असलीं गुणी बालकें म्हणजे राष्ट्राचे दीप होत.** या सर्व गोष्टींचा विचार करून मी **शांताबाईस** "कीर्तनालंकृति" ही पदवी अत्यंत संतुष्ट होऊन देत आहे. त्याप्रमाणें **बालकृष्णाची चांदीची मूर्ति** त्यांना पूजेकरितां देत आहे. **शांताबाईच्या** गुणाचे मानानें मी कांहींही दिलें, तरी तें कमीच होय यांत शंका नाहीं."

यावेळीं मात्र **शांताबाईस** फार आनंद झाल्याचें दिसून आलें. इतर वेळींही ती आनंदांत असे, परंतु या वेळचा आनंद इतर सर्व आनंदाहून वेगळा होता. ती घरीं आल्यावर **दादांस** म्हणाली, "**दादा**, काय असेल तें असो. आज **श्रीचे** समोर कीर्तन करतांना मला एक तऱ्हेचें बंधन वाटत होतें. आज जसें मला वाटलें, तसें

कोणत्याही कीर्तनाचे वेळीं वाटलें नाहीं. जगद्गुरु आरंभापासून अखेरपर्यंत एकाग्रतेनें कीर्तन ऐकत होतें. प्रत्येक गाण्याचा ताल ते आपल्या हातानें धरीत होते. हें पाहून तर आरंभीं आरंभीं मला फारच अवघड वाटूं लागलें. परंतु पुढें पुढें त्यांच्या तालांचा मला फारच उपयोग वाटूं लागला. चिपळीचा ठोका त्या अनुरोधानें मला सहज देतां येऊं लागला. आजपर्यंत कीर्तन करीत असतां समोर जी देवाची अगर राष्ट्रपुरुषाची मूर्ति असेल तिकडेच सारखी नजर ठेवून तुमच्या सांगीप्रमाणें मी कीर्तन करित असे. आजू बाजूच्या परिस्थितीच्या विचाराचा पगडा मजवर बसला नाहीं. परंतु आज **श्रींच्याचकडे** लक्ष वेधें. " असे तिनें उद्गार काढले. असें होण्याचें कारण तिची **धर्मश्रद्धा** हें होय. आणि याच कारणांनीं तिला आज खऱ्या प्रकारचा आनंद वाटला.

तिची आई तिला म्हणाली " बाळ, खरोखरी तुझे गुण कांहीं विलक्षण आहेत, तूं आमच्या उदरीं जन्म घेऊन धन्य धन्य केलेस. इतक्या अल्प काळांत तूं किती गुण केले आहेस म्हणून सांगूं ? बाळ, तुला दृष्ट लागेल असें भय वाटतें. "—असें म्हणून तिनें **शांताबाबास** साश्रुनेत्रांनीं मांडीवर घेतलें, तीही नेहमींच्या परिपाठाप्रमाणें मांडीवर मनसोक्त लोळली,—**शांताबाईनें** उत्तर दिलें, "तुझ्यासारखीं ममताळू आई, दादांच्यासारखा कर्तव्यदक्ष बाप, आक्कासारखी भाचीकरितां सर्वस्व अर्पण करण्यास तयार असलेली **मावशी** व ताईसारखी बहिणीच्या सुखाकरितां हापापलेली बहीण ज्या लेंकराचे वाट्यास माझ्यासारखीच आली असतील, तीं लेंकरें माझ्यासारखीं न निघतील, तर निघतील तरी कशीं ? मी पुष्कळ मंडळीची आपल्या मुलांबरोबरची वागणूक पाहिली आहे व अगदीं बारकाईनें पहातही आहे. परंतु लेंकरांचे कल्याणाकरितां आपल्या इथल्यासारखी लगबग कोठेंही दिसून

आली नाहीं. तेही आपल्या आपत्यावर प्रेम करितात, अलोट प्रेम करितात, परंतु त्यांचे मार्गच निराळे. त्यांत मुलांच्या उन्नतीचें बीजारोपण नसतें. तुम्हीं आपल्या दुसऱ्या मुलीला, ताईला काय कमी तयार केलें आहे ? तिला इंग्रजी, मराठी शिकविलें, ड्राइंग मधीलपरीक्षा ती पास झाली, नर्स–मिडवाईफची परीक्षाही तिनें दिली. तीही उत्तम कीर्तनें करितें आणि इतकेंही करून तिची राहणी किती साधी, किती सात्विकपणाची कीं जगद्गुरूनींही तिची तारीफ* केली.

केसरी, ज्ञानप्रकाश, लोकसंग्रह, लोकमान्य, नवाकाळ, संदेश, शुभसूचक, खानदेशवैभव वगैरे अनेक पत्रांनीं व चित्रमयजगत-सारख्या मासिकांनीं त्याचप्रमाणें इतर विद्वान् अशा मोठमोठ्या लोकांनीं श्रींकडून पदवी मिळाल्याबद्दल **शांताबाईचें** मन:पूर्वक अभिनंदन केलें. विस्तारभयास्तव आम्हीं तें येथें देत नाहीं.

या वरील तीन आख्यानांशिवाय सुदामा, धनेश्वर, गोपीशांतवन भीष्माशिर्वाद, दामाजी वगैरे आख्यानें **शांताबाईनीं** चांगलीं बसविलीं होतीं. यांपैकीं दामाजी व धनेश्वर हीं आख्यानें राज्यारोहण आख्यानाचे आधींच बसविलीं गेलीं होतीं.

सुदामा आख्यानामधील बहुतेक सर्व गद्य भाग **शांताबाईनें** आपल्या मतानेंच लिहून काढलेला आहे. तो किती सुबक साधला आहे, तें सुदामा-आख्यान वाचलें असतां सहज कळून येण्यासारखें आहे. हें आख्यान कीर्तन-सुधा भाग दुसरा यामध्यें छापलें आहे.

---

* **शांताबाईस** पदवी देतांना श्रींनी जे उद्गार काढले, त्यामधील बराचसा भाग ताईच्या सात्विक रहाणीबद्दलच्या गौरवानें भरलेला होता. नाशकास श्रींचा मुक्काम असतां ताई आपल्या सासरच्या मंडळीसह त्यांच्या मठापासून जवळच रहात असे. या कारणानें आदर्शभूत वागणूकीसंबंधीं ताईचा उल्लेख श्रींनीं विस्तृतपणें केला होता, त्यास उद्देशून हें शांताबाई म्हणाली.

वर जीं ठळकरीतीनें कीर्तनें दिलीं आहेत; त्यांचे दरम्यानही तिचीं बरींच कीर्तनें झालीं व त्यापुढेंही अनेक कीर्तनें झालीं. तिची कीर्तनांत फारच प्रगति झालेली दिसून आली. कीर्तन म्हणजे हातचा मळ अशी तिची तयारी झाली होती.

ता. २८ व २९ जून १९२३ रोजीं लो. **टिळकांच्या** पुण्यतिथी निमित्त **शांताबाईचीं** दोन कीर्तनें निरनिराळ्या आख्यानावर झालीं.

ता. १८ सप्टेंबर १९२३ रोजीं दादरमुक्कामीं सार्वजनिक गणेशोत्सवांत **शांताबाईचें** कीर्तन झालें. झिमझिम पाऊस सारखा पडत असतांनाही आरंभापासून अखेरपर्यंत चिकार मंडळी मंडपांत व मंडपाचे बाहेर सारखी जमत होती. यावेळीं पूर्वरंग होतांच **शांताबाईनें** श्रोत्यांना विचारलें कीं, "आख्यान पौराणिक लावूं कां ऐतिहासिक लावूं?" मंडळींनीं **शिवपराक्रम** आख्यान लावण्यास सांगितलें व तिनें तेंच लाविलें, आणि तें फारच चांगल्या रीतीनें पार पडलें.

दादरचे **श्री. पांडुरंग गणेश सहस्रबुद्धे** यांनींच **दादांना** पत्र लिहून हा कीर्तनाचा कार्यक्रम आखला होता. **शांताबाई** मंडळी-सह त्यांचेंच घरीं उतरली होती. तेथील मंडळींनीं त्यांची व्यवस्था चांगली ठेविली होती. श्री. **सहस्रबुद्धे** यांच्या येथील टापटीप-सोवळें-ओवळें, पूजा—अर्चा वगैरेसंबंधीं व रा. **पांडुरंगराव** यांचे सुस्वभावासंबंधीं **शांताबाईनीं** बरेंच वेळां आमचे घरांत उद्गार काढलेले आहेत. जों जों जास्ती पैसा घरांत येऊं लागेल तों तों सोंवळें-ओंवळें कमी कमी होत जातें, असें समजण्यास हरकत

* तिचीं जीं ७१८ आख्यानें तयार होतीं, त्यांपैकीं कोणतेंही आख्यान आयत्या वेळीं लावण्यास सांगितलें, तरी तें लावून उत्तम रीतीनें पार पाडण्याची तिची तयारी यावेळेपासून पुढें अखेरपर्यंत होती. अडखळणें, घोंटाळणें, गडबडणें हे दोष तिच्या कीर्तनांत कधींच दिसले नाहींत.

नाहीं असें तिचें मतच बनून गेलें असल्यानें, श्री. **सहस्त्रबुद्धे** यांचें घर अपवादात्मक असें ती मानी.

शांताबाई एकाच कीर्तनाकरितां दादरास गेली होती, तरी तिला निरुपायानें दुसरेच दिवशीं म्हणजे ता. १९ सप्टेंबर १९२३ रोजीं दुसरें कीर्तन करावें लागलें. त्यानंतर मुंबईच्या आसपासच्या घाटकुपर, माटूंगावैगर गांवाहून स्वतः मंडळी येऊन तिला कीर्तनाविषयीं आमंत्रणें करूं लागलीं. मोठमोठे विद्वान् व धनाढ्य लोकांनीं तिला आग्रह केला. परंतु पेटी शिकविणारे रा. भोंलेराव* हे सकाळचे गाडीनेंच पुण्यास लावून दिलें असल्यानें मंडळींना आमचा पेटीवाला नाहीं असें सांगून परत लावणें भाग पडलें.

यानंतर फार मोठें असें कीर्तन पुढील होय. ता. ५ मे १९२४ रोजीं **श्री शिवाजीमंदीरांत शिवजन्मोत्सवांत** झालें. यावेळीं **शांताबाईनीं शिवाजीमहाराजांच्या** जन्माचें नवीन बसविलेलें आख्यान लाविलें होतें. त्या आख्यानाची रचना फारच चांगली झाली आहे. **शिवजन्मावर** इतकें मोहक आख्यान अजून कोणीहीं रचलें नाहीं, असें कीर्तनास जमलेल्या कैक स्त्रीपुरुषांनीं सांगितलें, व कांहीं जणांनीं पत्रें पाठवून तसें कळविलेंही आहे. **शिवजन्मानंतर माता जिजाईचा पाळणा** हृदयस्पर्शी असा वठला आहे, असेही लोकांनीं उद्गार काढले. तिच्या हयातींत हेंच आख्यान तिनें शेवटचें बसाविलें. आख्यानामधील जवळ जवळ समग्र गद्य मजकुराची मांडणी तिनें स्वतःच केलेली आहे. ह्यामुळें हें आख्यान आम्हां आप्तेष्टांना तिच्या वियोगामुळें अगदीं जिव्हाळ्याचे होऊन बसलें आहे.

---

* रा. भोलेराव हे ता. १ जुन १९२३ पासून अखेरपर्यंत पेटी शिकविण्यास येत असत. यानींच **शांताबाईला** स्वतःच पदें पेटीवर बसविण्यास शिकविलें व उत्तम सुरज्ञान करून दिलें.

हें कीर्तन झाल्यानंतर गोभक्त **चौंडे महाराज** यांनीं तिची वाहवा करून तिचें अभिनंदन केलें.

ता. १३।६।२४ रोजीं **राज्यारोहणप्रसंगीं शांताबाईचें** कीर्तन झालें. वरील कीर्तनासंबंधीं अनेक प्रशंसापर लेख वर्तमानपत्रें व मासिकें यांमधून आले आहेत, परंतु ते मागें दिलेल्या मजकुराप्रमाणेंच असल्यानें त्याच त्याच मजकुराची पुनरुक्ति न व्हावी म्हणून येथें दिले नाहींत.

मध्यंतरीं अनेक कीर्तनें अनेक ठिकाणीं झाल्यानंतर ता. १४ फेब्रुवारी १९२५ रोजीं येवलें मुक्कामीं सार्वजनिक संस्थेमार्फत कीर्तन झालें. **शांताबाईचें** सार्वजनिक असें हें शेवटचेंच कीर्तन होय. कीर्तनास शिवजन्माचें आख्यान लाविलें होतें. मुंबई येथील गांधर्वमहाविद्यालयाचे चालक **गायनाचार्य पळुस्कर बोवा** कीर्तनास हजर होते. त्यांनींच **शांताबाईच्या** कीर्तनाची साथ करण्यास आपलीं माणसें दिलीं होतीं. कीर्तनानंतर येवल्याहून जे कीर्तनासंबंधीं तेथील एका प्रसिद्ध गृहस्थांचें पत्र आलें आहे, त्यांत लिहिलें आहे कीं, " मी आजपर्यंत **शांताबाईचीं** उत्तमोत्तम अशीं ४।५ कीर्तनें ऐकलीं आहेत, पण येवल्याचे कीर्तनानें त्यावरही मात केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. **शांताबाईचें** गाणें मधूर, निरुपणपद्धति अमोघ, कीर्तनाचा विषय उज्वल, वृत्ति शांत व गंभीर या सर्व संयोगानें पलूसकर बोवा सारख्यानीं कीर्तनांत कैक वेळां डोळ्यांतून अश्रु काढले. श्रोतृसमूह कीर्तनांतील नानाविध रसांनीं अगदीं तल्लीन होऊन गेला होता. या प्रसंगास **शांताबाईस** साथही उत्तम मिळाली. तास दीड तास तरी सर्व एकरूप होऊन गेलें होतें हें खास. "

हें कीर्तन झाल्यानंतर रा. **पांडुरंगराव आपटे** यांजजवळ श्री. **पळुसकर बोवांनीं शांताबाईची** अनेक **शब्दांनीं** प्रशंसा केली.

म्हणाले कीं, " मी आजपर्यंत **शांताबाईचा** बोलबाला ऐकून होतों. परंतु आज तिचें कीर्तन समक्ष ऐकतां त्याची तंतोतंत प्रचिती आली. याला म्हणतात ईश्वरी प्रसाद! **शांताबाईला** मी स्वतः गायन शिकवून १।२ महिन्यांत उत्तम तयार करितों. अशा असामान्य बुद्धीच्या बालिकेस शिकण्यास कांहींच उशीर लागणार नाहीं." असें म्हणून आपल्या अंगावरील शालजोडी काढून **शांताबाईस** दिली व तिचा त्यांनीं गौरव केला.

याप्रमाणें ठळक ठळक कीर्तनाची हकिकत दिली.

शांताबाईची वागणूक व स्थिति—कीर्तनास घरून निघण्यापूर्वीं ती देवास व वडील माणसांस नमस्कार करून नंतर निघत असे. व कीर्तनास आरंभ होण्याच्या आधींही ती घरांतील वडील मंडळीस नमस्कार करून नंतर कीर्तनास उभी राही. तिचे **दादा** बहुतेक कीर्तनास येत नसत. बहुतकरून तिचे चुलतमामा **हरिभाऊ सहस्रबुद्धे, दादांचे** स्नेही **माधवराव कवडे, बाजीराव ढेकणे** यापैकीं कुणीतरी हजर असून तिजबद्दल काळजी घेत असत. कीर्तनास उभे रहाण्याच्या आधीं तिच्या हाताचे पंजे व पायाचे तळवे अगदीं गार होत व डोकें तापत असे. ही स्थिति कीर्तन सुरू होऊन दहा पांच मिनिटेंपर्यंत असे व या स्थितीचा तिला त्रास होई अशी तिची तक्रार असे. **दादा** ज्या वेळीं कीर्तनास येत त्यावेळीं आरंभापासून अखेरपर्यंत भेभिस्त असे दिसत. **श्री. शिवाजी मंदिरांतील शांताबाईच्या** पहिल्या कीर्तनाच्या वेळीं त्यांची ही स्थिति त्यांच्या आसपासच्या सर्व मंडळींच्या व **शांताबाईच्या** लक्षांत आली. हें त्यांच्या **शांताबाईवरील** उज्वल प्रेमाचें लक्षण होय. **दादा** कीर्तनास आले म्हणजे **शांताबाईस** फार आनंद होई. तिचेंही त्यांचेवर अलोट प्रेम असे. तिची आई (पुण्यास कीर्तन असल्यास) प्रत्येक कीर्तनास जात असे. कैक

भाविक बायका **शांताबाईस** दैविक बालिका समजत व त्याचप्रमाणें तिच्या **आईस** परम भाग्याची समजून तिलाही आदरानें नमस्कार करीत. कीर्तनानंतर नेहमींच तिच्या भोंवती अतिशय गर्दी होई. असें झालें कीं **शांताबाई** म्हणे, "मला कीर्तन करण्याचें कांहीं वाटत नाहीं; परंतु आरतीच्यावेळीं जी गर्दी मजजवळ उसळते, त्याचें मला भय वाटतें. जीव गुदमरलासा होतो." (हें आम्ही मागें एक वेळ सांगितलेंच आहे.) यामुळें हें काम **हरिभाऊ**कडे असे व ते तें काम अतिशय कळकळीनें बजावीत. त्यांचे तिच्यावर फारच प्रेम असे. बाहेरगांवीं कीर्तनें झालीं तेथें देखील **बाजीराव** अगर **हरीभाऊ** असत. त्याचप्रमाणें **दादांना** बरोबर घेतल्याशिवाय ती बाहेरगांवीं कधींही कीर्तनास गेली नाहीं. तिचा अटच असे कीं, **दादा** बरोबर असले तरच बाहेरगांवीं जावयाचें नाहीं तर जावयाचें नाहीं. **दादांना** प्रवासाचा अत्यंत कंटाळा, परंतु ते आपल्या **शांताबाबा**करितां तिजबरोबर जात. त्यांनीं नाहीं नाहीं त्या हौसी पुरवून वाटेल तेवढा पैसा खर्च करून **शांताबाईच्या** अलौकिक गुणांचा विकास केला. आरतीचे पैसे बरेच जमत. ते ती धर्मखात्याकडे खर्च करी. येवलें येथील टिळक विद्यालयास मदत म्हणून ४५ रुपये तिनें शेवटीं शेवटीं दिले आहेत. तिला चांदीच्या देवाच्या १४ मूर्ति मिळल्या आहेत. त्यांची ती निष्ठापूर्वक रोज पूजा करी. जसजशा मूर्ति मिळत तसतशा ती देवांत पुजेस ठेवी. याशिवाय अनेक सुवर्ण व रौप्यपदकें, चांदीचे कुंकवाचे करंडे, डबे, खण वगैरे जिन्नस मिळाले आहेत. ते सर्व तिच्या आईनें जपून एके ठिकाणीं ठेविले आहेत. तिची आई नेहमीं म्हणे कीं, " या सर्व वस्तु **शांताबाबाच्या** वरातीच्यावेळीं तिच्या बरोबर आंदण द्यावयाच्या. " परंतु त्याचें आतां काय !

शांताबाईनें कीर्तनांत येणारे अभंग, आर्या, निरनिराळ्या

वृत्तांतील श्लोक यांना कितीतरी नानाविध चाली लाविलेल्या होत्या. त्याचप्रमाणें आख्यानांत संस्कृत श्लोक येत, त्यांची फोड ती कितीतरी चातुर्यानें करी. कीर्तनांत जेथें जेथें कुणबी भाषा, हिंदुस्थानी भाषा बोलण्याचा प्रसंग येई; तेथें तेथें त्या त्या भाषा फारच सफाईनें बोलत असे. ज्यांनीं ज्यांनीं तिचें कीर्तन ऐकलें आहे, त्यांना त्याची सत्यता पटली असेलच व इतरांची खात्री मागें दिलेल्या वर्तमानपत्रांमधील उताऱ्यांवरून खास होईल.

शांताबाईचा कीर्तन हा विषय अत्यंत आवडीचा असे. त्यांत तिची प्रगति परिपूर्ण झालेली होती. आणि हा कीर्तनाचा व्यवसाय तिनें शाळेमधील अभ्यास संभाळून चालविला होता हेंही ध्यानांत धरण्याजोगें आहे.

बारावें वर्ष पुरें झाल्यावर म्हणजे १९२५ मध्यें येणारे आश्विनानंतर **शांताबाईचीं** कीर्तनें फक्त बायकांत व्हावयाचीं, असें नक्की ठरलें होतें. त्यापुढें पुरुषांत व्हावयाचीं नव्हतीं. त्याप्रमाणें पुण्यामधील मंडळीस कळविलेंही होतें. स्त्रियांनीं पुरुषांमध्यें समान हक्कानें वागावें, त्यांच्यांत मिसळावें या मताचे **शांताबाईचे** वडील व मातोश्री नाहींत. ताई कीर्तनें करितें, तीं देखील १२ वर्षांचे वयानंतर फक्त बायकांतच करते.

शांताबाईचीं दोन आख्यानें फारच आवडीचीं असत. एक **शिव–पराक्रम** व दुसरें **दामाजी. लोकमान्यांवर** नवीन आख्यान लिहिण्याचें काम चालू होतें व तें आख्यान सन १९२६ सालीं लोकमान्यांच्या पुण्यतिथीस स्त्रीसमाजांत करावयाचें असें ठरलें होतें.

कीर्तनाच्या व्यासंगामुळें तिची मराठी भाषा व विचारसरणी फारच उत्तमोत्तम बनली होती.

प्रकरण ५ वें.

प्रयाण.

मागील " कीर्तनाचें " प्रकरण लिहितांना आम्हांला एक तऱ्हेचें स्फुरण येत होतें, आनंद होत होता, परंतु ती स्थिति हें प्रकरण लिहितांना राहिली नाहीं. अनेक विकारांनीं आमच्या मनोवृत्ति भांबावून गेलेल्या आहेत. नेत्रांपुढें चित्ताकर्षक असें कांहींच दिसत नसून अनेक भीषण चित्रपट आमच्या दृष्टीसमोर—अंतस्थ दृष्टी-समोर-आपल्या आक्राळविक्राळ रूपांत थैमान घालीत आहेत. असल्या व्यथित मनःस्थितींत आम्हांस हें प्रकरण लिहावयाचें आहे. त्यामुळें त्यांत जागोजाग विसंगतपणा, द्विरुक्ति, अप्रासंगिकपणा वगैरे अनेक दोष येणें संभवनीय आहे. तत्रापि मन घट्ट करून आम्ही हें प्रकरण होतां होई तों सुसंगत लिहिलें जावें, म्हणून काळजी घेऊन आम्ही तें लिहिण्यास आरंभ करीत आहों.

"**शांताबाई** व तिची लहान बहीण **मालती** यांच्या परीक्षा झाल्या-बरोबर येवल्यास पाठवून द्यावें म्हणजे मलाही जरा करमणूक होईल व त्यांनाही परीक्षेच्या दगदगीनंतर थोडा विसावा मिळेल, तरी त्यांना पाठविण्यास अनमान करूं नये." असें **राधाबाईचें--शांता-बाईच्या ताईचें**--पत्र ता. १८ फेब्रुवारी १९२५ बुधवार रोजीं **दादांना** आलें. त्याच पत्रांत पुढें असेंही लिहिलें होतें कीं, " चि. **शंभूचा (ताईच्या मुलाचा)** वाढदिवसही रविवारीं आहे. त्या वाढदिवसास दोघी मावशा असल्यानें जास्तच आनंद होणार आहे. तरी इतर कोणतीही सबब न सांगतां वाढदिवसास त्या आल्याच पाहिजेत." ताईबद्दल आमच्या सर्वांच्या मनांत फारच आदर असल्यानें--**शांताबाईच्या आईच्या** मनांत तिला परीक्षा होतांच पाठविण्याचें नसतांही—दोघी मुलींना पाठविण्याचें ठरलें.

तिच्या आईच्या मनांत परीक्षा झाल्यावर ८।१० दिवसांनीं पाठवावें परंतु शंभूच्या वाढदिवसाचें निमित्त पुढें आल्यानें तिला नाहीं म्हणवेना. शिवाय मुलींनींही ताईकडे जाण्याचा फारच हट्ट धरला, हेंही एक बलवत्तर कारण झालें. मुलींची परीक्षा ता. २० फेब्रुवारीस संपली व ता. २१ फेब्रवारीं शनवार रोजीं सायंकाळच्या गाडीनें दादा त्यांना घेऊन ताईकडे जाण्यास निघाले. या दिवशीं शिवरात्र होती. यामुळें शांताबाईचे आईस त्यांना पाठविणें कसेंसेंच वाटत होतें व तसें तिनें उद्गारही काढले होते. परंतु दुसरेच दिवशीं शंभूचा वाढदिवस असल्यानें शांताबाईनें जाण्याचा अगदीं हट्टच घेतला त्यामुळें मंडळी निघाली.

घरांतून बाहेर पडून गाडीकडे जात असतांना शांताबाई जीं पावलें टाकीत होतीं तीं त्या त्या जागेवरील शेवटचीं—अगदीं अखेरचींच होतीं अशी यत्किंचित जरी कल्पना आम्हां कोणास येती, तरी ती दुर्गम, दुर्लभ पावलें आम्ही आपल्या हृदयाशीं घट्ट धरून बसलों असतों. तिचें प्रत्येक पाऊल त्या त्या जागेवर अखेरचें असें ठरलें. भगवंता 'असें कसें रे केलेस!' परंतु जाऊं द्या, आम्ही वाहवत चाललो! मन दुभंगत चाललें! प्राणज्योतीस हेलकावे बसूं लागले! आम्ही मनाला आवरून धरण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.

"आई, येतें अं?" असें तिनें आईला मोदभरानें विचारलें. आईनेंही तिला जवळ घेऊन चुंबन घेतलें व सांगितलें, "शांताबाबा, ताईच्या इथें तुला यावेळीं धाडतें आहे, त्याचें दुसरेंही कारण आहे. यावेळीं घरकाम करायला ती तुला शिकवील. धुणं, झाडणं, सारवणं, स्वयंपाक, हें सर्व आतां तुला आलं पाहिजे. त्यांत तूं अगदीं कच्ची आहेस. मालिशीं, शंभूशीं भांडूं नकोस, नाहींतर ताई आणि तूं एक होऊन मालनला त्रास द्याल. आगगाडींत इंजिनकडे तोंड करून बाहेर बघूं नकोस. डोळ्यांत कोळशांचे कण जातील

संभाळ बरं. रोज तूं काय काम केलेस, त्याची डायरी ठेव व दर रविवारीं पाठवीत जा. ये बर मालन, शांताबाबाशीं भांडू नको बरं."

अशारीतीनें तिनें राधाकाकू, सरस्वतीकाकू, पाटील व ताईबाई (मराठ जातीची बिऱ्हाड करीण) वगैरे सर्वत्रांचा निरोप घेतला. निरोप घेतांना प्रत्येकाशीं थट्टामस्करीचीं भाषणें केलीं. शेवटीं पुन्हां गाडींत बसतांना आईस नमस्कार केला. नमस्कार करून झाल्यावर तिनें सहजासहजी पुढील अभंग म्हटला.

आतां येतों आम्ही । लोभ असो द्यावा ।
शांत चित्त ठेवा । तुम्ही येथें ।। १ ।।

श्री शिवाजीआख्यानामध्यें दिल्लीस जाण्याच्या वेळीं मातेचें दर्शन घेतांना महाराजांनीं हा अभंग म्हटलेला आहे. मूळ अभंगांत फेरफार करून शांताबाईनीं स्वतः हा अभंग करून त्या आख्यानांत घातलेला आहे. हा अभंग ती अगदीं निराळ्या चालीवर मधूर असा म्हणे. गाडींत सामान ठेवीपर्यंत ती हाच अभंग म्हणत होती. गाडींत बसल्यावर ताईबाई म्हणाल्या, "शांताबाई आतां कधीं भेट ?" यावर शांताबाईनें हंसत हंसत उत्तर दिलें जगलों वाचलों तर महिन्यानें भेट."

हें शांताबाईचें हंसत दिलेलें उत्तर व तो म्हटलेला अभंग आम्हाला भावी स्थितीबद्दल सूचक होता, असें आतां वाटतें.

तिनें "शांत चित्त ठेवा । तुम्ही येथें" असें सांगितलें खरें, परंतु पुढील तिचा होणारा चिरवियोग आम्हांला त्यावेळीं अवगत असतां, तर शांताशिवाय चित्त शांत कसें रहाणार, असें विचारून तिच्या मनाची खात्री पटवून दिली असती ! सन १९२४ सालच्या भाद्रपद महिन्यांत नेहमींप्रमाणें तिजकरितां एक व मालतीकरितां एक अशा दोन गणपतीच्या मूर्ति आणल्या होत्या. शांताबाईनीं यावर्षीं दिवाण खान्यांतील एक

भिंत पोंखरून त्यामध्यें तो गणपती बसवून भोंवताली रंग वगैरे देऊन कायमची आरास करून ठेविली आहे. त्यावेळीं तिच्या मावशीनें (लेखिकेनें) तिला विचारले " बाळ, यंदा गणपतीचा फारच बंदोबस्त दिसतो. दरसालच्या अशाच मूर्ति बसविल्यास तर दिवाणखान्याभर गणपतीच गणपती होतील. " यावर तिनें उत्तर दिलें " छे छे, अक्का तसं भिण्याचे कांहींच कारण नाहीं? हा गणपती म्हणजे माझी आपली एक दीर्घ काल राहणारी आठवण! याकरितां हें सर्व काम मी स्वतः तुमच्या शांताबाबानीं केलं आहे." याचप्रमाणें १९२४ च्या दिपवाळीमध्यें आम्ही सर्व बायका फराळाला बसलों होतों. बगडी नांवाची शांताबाईच्या आधीं झालेली मुलगी मेल्यापासून तिच्या आईनें मोदक खाण्याचें सोडून दिलेलें आहे. त्यास उद्देशून शांताबाई आपल्या आईला म्हणाली " आई, बगडीकरितां मोदक खाण्याचें तूं सोडून दिलेस आणि माझ्याकरितां मला वाटतें तूं पेरू खाण्याचें सोडशील, खरं ना ?" या तिच्या विचारण्यानें आम्हांस त्यावेळीं कसेसेंच वाटलें व तिच्या आईनें, " भलतंच असं बोलूं नये. आतां तूं मोठी झालीस. " वगैरे चार गोष्टी सांगितल्या. या वरील गोष्टी एका पुढें एक दत्त म्हणून आमच्या समोर ओघाओघानें उभ्या राहिल्यामुळें त्या इथेंच नमूद केल्या आहेत. या सर्व पुढील भावी अनर्थाच्या सूचक अशा ठरल्या. असो, मंडळी येवल्यास जाण्यास निघाली. आगगाडींत असतांना ती दादास म्हणाली, " दादा, मुलींना पोंचविण्यास असें तुम्ही कधींच गेलेला नाहींत. हीच पहिली वेळ, नाहीं दादा ? तुमच्याबरोबर प्रवास करण्यास भारी आवडतें तुम्ही किती किती तरी आगगाडीसंबंधीं, तिच्या कारभारासंबंधीं, स्टेशनवरील लबाड्यासंबंधीं माहिती दिलीत. दादा, तुम्हांला कसाहो प्रवास बिलकुल आवडत नाहीं! कोणाला तरी आमच्या बरोबर पोंच-

विण्यास देतां त्याला कांहीं विचारावसं वाटत नाहीं, आणि विचारलें तर त्याला आमच्या इतकीही माहिती नसल्याचें दिसून येतें. अशा गप्पागोष्टी करीत मंडळी येवल्यास ताईच्या घरीं जाऊन ता. २२ फेब्रुवारीच्या पहाटेस पोंचली. ताईला भेटताच तिनें ताईला सांगितलें, " ताई, दोन जबाबदाऱ्या तुजवर यावेळीं आईनें सोंपविल्या आहेत. एक मालतीस जपावयाची, कारण ती आईला सोडून आजवर कधींच कुठें गेलेली नाहीं आणि दुसरी मला घरकामांत निष्णात करावयाची. आईचें पत्र उद्यां तुला येईलच परंतु मी आपलें आधीं सांगून टाकलें. आतां आमचा शंभूबाळ कुठें आहे, तें सांग ? " शंभू निजला होता त्यांस शांताबाईनें व मालतीनें हालवून हालवून—दादा नको नको म्हणत असतां--उठविला. तो रडतच उठला, परंतु मावश्यांना पहातांच त्याचें रडूं कोठच्या कुठें गेलें. एकदम त्याची कळी उमलली. त्याजकरितां पुण्याहून दोघी मावश्यांनीं नानातऱ्हेचे खेळ नेले होते ते त्यास दिले, व ते सर्व खेळ मांडून तो खेळूंही लागला त्यावेळीं पहाटेचे ३ वाजले होते. परंतु पुढें त्या रात्रीं कोणी निजलें नाहीं.

उजाडतांच शंभूबाळाचा वाढदिवस होता. त्यास आतां पांचवें वर्ष लागणार होतें, म्हणून वाढदिवस मोठ्या प्रमाणावर केला होता. शांताबाईनें त्यामध्यें प्रमुख भाग घेतला होता. आईच्या सांगण्याप्रमाणें तिनें आजपासूनच काम करण्यास आरंभ केला होता. ताईनें आग्रह केला तरी ती मुलांचेबरोबर जेवणास बसली नाहीं. सोवळें नेसून चटण्या, कोशिंबरी, भाजीपाला वाढण्याचें काम तिनें आपल्याकडे घेतलें होतें.

दादा तिला पोंचविण्यास गेलें, ते परत येण्यास ता. २३ फेब्रुवारी रोजीं निघाले. निघतांना शांताबाईनें किती तरी मजेनें व आनंदानें

त्यांचेबरोबर भाषण केलें म्हणून सांगावें ! १५। २० दिवसांनीं मुलींना पाठवून देण्याबद्दल **दादांनीं ताईला** सांगितलें; **मालती** लहान असून अजाण आहे. तिची काळजी घेण्यास त्या भगिनीद्वयांस बजावून ते पुण्यास आले.

फेब्रुवारी अखेर **शांताबाईच्या** परिक्षेचा रिझल्ट लागला. ती चांगल्या रीतीनें पास होऊन वरच्या म्हणजे इंग्रजी ४ थींत गेल्याचें पत्र **आक्कानीं** (लेखिकेनें) **शांताबाईस** लिहिलें. त्याचें उत्तर ता. ८ मार्च १९२५ रोजीं **शांताबाईकडून** आलें. तें शब्दशः पुढील प्रमाणें आहे.

" ति. **आक्कास** नमस्कार वि. वि. तुझें पत्र पावलें तूं आम्हां दोघींचा रिझल्ट ताबडतोब कळविलास त्याचें आम्ही ताबडतोब उत्तर टाकावयास हवें होतें. परंतु तसें झालें नाहीं. तत्रापि रागावूं नये. **दादांनीं** आम्हांस १५ तारखेस बोलाविलें आहे. बघूं काय होतें तें. **शंभू** पुष्कळ खेळतो **माली** व **मी** भांडत नाहीं. **माली** लहान-सहान कामें करतें. मी मोठींमोठीं करतें. आमचे दिवस फार मजेंत जात आहेत. आजच ति. **दादांना** व ति. **मामांना** पत्र टाकलें आहे. कळावें.

तुझी भाची,

शांता ओंकार "

हेंच **शांताबाईचें** मावशीस (लेखिकेस) शेवटचें पत्र होय. तें पत्र वरील उतारा देण्याकरितां आतां अभागी मावशीच्या समोर आहे. "**दादांनीं** आम्हांस १५ तारखेस बोलाविलें आहे, बघूं काय होतें तें" हें वाक्य मनाला यातना देत आहे. पंधराच तारखेचें काय, परंतु वर्षांत जितके म्हणून महिने आहेत व महिन्यांत जितक्या म्हणून तारखा आहेत, त्यांतील कोणत्याही महिन्याच्या कोणत्याही तार-

खेस ती प्रिय **शांता** आतां येणार नाहीं ! अगदीं बालंबाल खात्री झाली ! नारायणा काय केलेंस हे ! !

* * * * * *

मुलींनां पाठवून देण्याबद्दल **दादांनीं ताईला** पत्र टाकलें. त्या पत्रांत **दादांनीं** लिहिलें होतें कीं, " घरांत आम्हांस (**शांताबाईचे आईस व वडिलास**) कसें तें करमत नाहीं. एवढें मोठें घर परंतु त्यांच्याशिवाय शिवदेवालयासारखें भयाण वाटतें दोन्हीही मुली एकाच वेळीं इतका काळ आमच्यापासून आजपर्यंत केव्हांही दुर नव्हत्या, त्यामुळें कसेसेंच वाटतें. सौभाग्यवतीस मुलींना पहावें असें वाटत आहे. तरी जमल्यास तूंसुद्धा **शंभूबाळासह** त्यांना घेऊन यावें. मुलींना येथून जाऊन १०।१२ दिवस झाले इतक्यांत आम्हांस करमेनासें झालें, हें वाचून तुला हंसू येईल. परंतु काय असेल तें असो असें झालें आहे खरें." इत्यादि मजकुराचें पत्र **ताईला** पोंचल्यावर **ताईचें** व **शांताबाईचें** पत्र **दादांस** आलें.

शांताबाईचें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

" ति. **दादा** यांस नमस्कार वि. वि.

तुमचें पत्र पावलें ....ता. १३ ला माझें कीर्तन आहे. १५ तारखेस **आबासाहेब, मास्तर, मी, माली, ताई, शंभू** वेरुळची लेणीं पहावयास जाणार आहोंत. येथें **आबासाहेबांचे** शाळेमध्यें शिमग्याचे सुट्टींत ४।५ दिवस खेळ होणार आहेत. आम्ही ते पहावयास जाणार आहोंत. ब्राह्मणगांवाला **ताईची** एक मैत्रीण आहे तेथें आम्हीं गुऱ्हाळ पहावयास जाणार आहोंत. नंतर कोपरगांवास कीर्तन करण्याचें कबूल केलें आहे. (**थत्तेकाकांचे** बहिणीकडे).... ....आजच **शांताराम** बरा होऊन त्याचे वडील त्याला घेऊन गेले. ती. सौ. **ताईची** इच्छा आहे कीं, आम्ही तिचें हळदकुंकूं झाल्यावर जावें. आतांपर्यंत आमचे दिवस फार मजेंत आणि काम शिकण्यांत गेले. आमची इच्छा २४ तारखेला निघावें अशी आहे. मी

व माली भांडत नाहीं. शंभू ठीक आहे. या उपर जर तुमची इच्छा आम्हीं लवकरच यावें अशी असेल, तर कळवावें. कळावें. ती. सौ. आईस नमस्कार. "

तुमची,

शांता.

याच पत्राबरोबर ताईचें जें पत्र दादांना आलें, तें जरा रागाचें होतें. त्यांतील मजकूर पुढीलप्रमाणें आहे.

" आपण मुलींना १५ तारखेला बोलाविलें ! माझी कल्पना नव्हती कीं, मुली इतक्या लवकर तिकडे बोलवाल. तरी आपण कळवाल तसें करूं 'धाडाच' असें पत्र आल्यास ता. १७–१८ ला मुली पुण्यांस येतील. "

शांताबाईचीं व ताईचीं वरील मजकुरांचीं पत्रें आल्यावर त्या आपत्यप्रेमी दादांनीं मुलींना हळदकुंकूं होईपर्यंत म्हणजे आणखी ८ । १० दिवस तेथें राहण्याची परवानगी दिली.

दादा अत्यंत रागीट. एकदां डोक्यांत आलें कीं, तेंच करणारे अशाच स्वभावाचें. नफानुकसानीची कधींही परवा न करणारे असें आहेत. परंतु त्यांचें मन, त्यांचा निश्चय कोणी फिरवूं शकेल तर ताई आणि शांताबाबा, व त्याच नियमास अनुसरून याही वेळीं झालें. यासंबंधीं घडलेली एक ठळक गोष्ट आमच्या सर्वांच्या लक्षांत आहे, ती पुढें देत आहों.

शांताबाईचे मामा (यांना सर्वजण मामा याच नांवानें हाका मारतात.) हे आपल्या नौकरीचे गांवाहून किरकोळ रजा घेऊन आम्हां सर्वांना भेटण्यास आलेले होते. त्यांच्यावर दादा एक दिवस भारी रागावले होते. त्यांचें सर्व शिक्षण दादांचें इथेंच झालें असल्यानें त्यांना ते मुलाप्रमाणेंच आहेत. त्यांना या वेळीं १२५

रु. पगार होता. ही १९२१ सालची गोष्ट. दादा एकदां रागावले कीं, मग त्यांना मागचा पुढचा विचार नसतो. यावेळीं ते मागच्या कांहीं चुकीवरून त्यांना सडकून बोलत होते मामाही अश्रु ढाळीत खालीं मान घालून बसले होते. आम्ही घरांतील सर्व मंडळी दिवाणखान्यांत कांहीं अंतरावर बसलेलों होतों. मामाची केविलवाणी स्थिति पाहून आम्हालाही कसेसेंच झालें. दादा आतां जरा आटोपतें घेतील तर बरें, असें आम्हांस झालें होतें. परंतु दादांचा राग लवकर शमेल असें आम्हांस वाटत नव्हतें. शांताबाई आमच्याजवळच कोचावर निश्चिंत बसली होती. तिला या प्रकारानें गुदमरल्यासारखें होऊन ती हुंदके देऊं लागली. तिच्या नाकांतून अस्पष्ट असा सूं सूं आवाज झालेला दादांचे कानावर गेला. त्यांचें लक्ष तिच्याकडे गेलें व एकदम त्यांचा रागाचा पारा उतरला व ते तिला म्हणाले, "शांताबाबा, काय झाले ग ?" त्यावर तिनें उत्तर दिलें, "कांहीं नाहीं दादा, पडसें आल्यासारखें नाकांत होत आहे व जीव गुदमरल्यासारखें होत आहे." हें उत्तर ऐकून दादांनीं पुन्हां विचारलें, "मी मामाला बोलतों आहे म्हणून कां तुला असें होत आहे ?" यावर तिनें गुदमरलेल्या आवाजानेंच "नाहीं तर काय" एवढेंच उत्तर दिलें, व ती मोठमोठ्यानें स्फुंदूं लागली. लगेच दादांनीं तिला आपल्या जवळ घेतली व मामास म्हणाले "मामा, माझा तुझ्यावर आतां कांहीं एक राग नाहीं. माझ्या मुलांना त्रास होतों असलें कांहींही करणें मला अगदीं उचीत नाहीं." यानंतर लगेच ते मामाशीं नीट वागूं लागले. जणू काय ते त्यांचेवर रागावलेच नव्हते असें सर्वांस वाटूं लागले. तात्पर्य काय कीं, या दोघी मुलींचा दादांचे मनोवृत्तीवर फारच विलक्षण दाब असे. दादा पराकाष्ठेचें कृतनिश्चयी आहेत, परंतु त्या निश्चयापासून फिरवणें हें या मुलींनाच शक्य होतें.

यांच्या नेत्रांतील एक दोन अश्रु ही क्रांति घडवून आणीत. ताई, **शांताबाई, मालती** यांपैकीं कुणीतरी जवळ असलें म्हणजे **दादांचे** रागास फारसें भिण्याचें कारण नसे. असा घरांतील मंडळीस व **दादांच्या** मित्रमंडळीस अनुभव आहे.

ता. १ मार्चचे आंतबाहेर सर्व मुली पुण्यास येणार असें ठरलें. व त्यानंतर घरचें हळदकुंकू करावयाचें असें **शांताबाईच्या** आईनें नक्की केलें होतें.

शांताबाईनें आईच्या सांगण्याप्रमाणें कामकाजाची निराळी डायरी ठेविली होती. ती तिच्या हस्ताक्षरांत लिहिलेली आहे. त्यांपैकीं ता. ६ मार्च ते ता. ९ मार्चपर्यंतचा उतारा नमुन्यादाखल पुढें दिला आहे.

ता. ६।३।२५ शुक्रवार— (रात्रीं) मेथीची पीठ पेरून भाजी, भात, पोळ्या केल्या. भाजी उत्तम, पोळ्या मध्यम व भात कनिष्ट झाला होता. भातास पाणी जास्त झाल्यामुळें मऊ झाला होता. भाजीस तिखट, मीठ सर्व ठीक झालें होतें. **ताईनें** पाठ थोपटली.

ता. ७।३।२५ शनवार (दुपार) वांग्या-बटाटयांची भाजी केली. साधें वरण, भात, पोळ्या केल्या. सर्व उत्तम झालें होतें. भाजी संध्याकाळला पुरेल इतकी केली होती. परंतु ती चांगली झाल्यामुळें दुपारींच संपली. पुन्हां पुन्हां वाढतांना मला आनंद होत होता. ताई द्वारकाताईंना सांगत होती. " आमच्या **शांताबाईला** स्वयंपाक करायला सांगावें म्हणजे महिन्याचं सामान १५ दिवसांतच संपेल. अहो, दोन वेळेला पुरेल एवढी भाजी दुपारीं केली, परंतु संध्याकाळला चिमुटभर राहिली असेल तर शपथ." 'ताई माझें फारच कोडकौतुक करतें. त्यानें मला अधिकच उत्साह येतो. आतांशी मला असं होतं कीं केव्हां एकदां स्वयंपाकाची वेळ येते व तो मी करतें. दुपारीं कांदे—बटाटे, खोबरें घालून पोहे केले होते.

तेही रुचकर झाले होते. संध्याकाळीं मीच स्वयंपाक केला. ताई करून देत नव्हती. तिचें म्हणणें मी फार दमलें आहे. मी फार हट्ट घेतला. तेव्हां तिनें वरण, भात, पोळी व मुळ्याची भाजी करूं दिली. भाजी खारट झाली होती. बाकीं चांगलें झालें होतें.

ता. ८।३।२५ रविवार—संध्याकाळचा स्वयंपाक मी केला. काळचा स्वयंपाक ताईनें करूं दिला नाहीं. मी रडलें, रागावलें तरी तिनें करून दिला नाहीं. तिचें म्हणणें मी फार काम करतें. संध्याकाळीं मी रसभरित कांदेबटाट्यांची भाजी, भात, पोळ्या केल्या. भाजीमधील कांदे शिजले, परंतु बटाटे शिजण्यास हवे होतें. पुरुषांपैकीं कोणीच कांहीं बोललें नाहीं. त्यांनीं मागमागून भाजी खाल्ली. परंतु आम्हीं जेवतांना तें आम्हांस कळलें. बाकीं पदार्थ उत्तम झाले होते. उष्टं, शेण मीच केलें. शंभूला घेऊन तूं पलिकडच्या माडींत बैस, असें विनवून मी ताईला सांगितलें होतें. मी व मालीनें पाणी पिण्याचीं भांडीं, वाट्या वगैरे घासल्या. जाग्यावर ठेवल्यानंतर ताईला पाहा म्हणून सांगितलें. ताईनें आम्हा दोघींस शाबासकी दिली. परंतु शेण लावतांना एके ठिकाणीं दोन चार शितें तशींच राहिलीं होतीं. तीं तिनें मला दाखविलीं. मी पुन्हां शेण लावून घेतलें.

ता. ९।३।२५ सोमवार. ताईशीं लाडीगोडी करून हंतरूणें काढण्यापासून तों रात्रींची झाकापाक करीपर्यंत सर्व काम मी व मालतीनें करण्याची परवानगी घेतली. त्याप्रमाणें आम्ही दोघीं-नीं सर्व काम केलें. आबासाहेबांनींही आम्हांस शाबासकी दिली. मी आज कुठेंही चूक राहूं नये म्हणून काळजी घेत होतें. मालीनें सगळ्या माड्यांचा केर काढला. तो फारच चांगला काढला होता. चटण्या, कोशिंबरीवगैरे सर्व पदार्थ आम्ही करणार असें सांगित-

त्यावरून ताईनें सर्व सामान दिलें होतें. कोशिंबरी मला विचारून मालीनें केल्या. काकडी मात्र मी चोंचवून दिली. दोन भाज्या, आमटी, भात, वरण, पोळ्यावगैरें सर्व मी केलें. फार काळजी घेत होतें. कुठें चुकूं दिलें नाहीं. ताईदेखील पुरुषांचे पंक्तीस जेवणास बसली. आम्ही दोघींनीं वाढलें. ताई व पुरुष इंग्रजीमध्यें मधून मधून बोलत. तें मला थोडें थोडें कळत होतें. ते आमच्या दोघींची तारीफ करीत होते. एका दिवसाचें जेवढें म्हणून काम असतें, तें सर्व आम्ही केलें संध्याकाळीं आमच्याशीं गोष्टी बोलतांना ताईला राहवेना. तिनें आम्हां दोघींना जवळ घेऊन आमच्यावरून बोटें मोडून टाकलीं. आज आई इथें पाहिजे होती. म्हणजे मजा झाली असती. तिला फारच आनंद झाला असता. स्वयंपाकाबद्दल सांगावयाचें म्हणजे सर्व पदार्थ उत्तम झालें होते.

प्रकरण ६ वें.

आरिष्ट व अखेर.

ता. २९ मार्च रोजीं **आबासाहेब** आपटे (**दादांचे** जावई) यांचें पत्र आलें कीं, "**शांताबाईस** आज ४ दिवस ताप येत आहे. सकाळीं ९८॥ व दुपारीं १०२°–३° पर्यंत चढतो, पुन्हां उतरतो. थंडी वाजत नाहीं.....डॉ. **भटांचें** औषध चालू आहे. ....**शांताबाई** हुषारींत आहे............डॉ. **भटांनीं** मुद्दाम कळविलें आहे कीं, काळजीचें मुळींच कारण नाहीं."

शांताबाईच्या आजारासंबंधीं हेंच पहिलें पत्र होय. तिला उन्हाळ्याच्या सुमारास नेहमींच ताप येत असे (हें मागें सांगितलेंच आहे.) ह्यामुळें व ताप जवळ जवळ नार्मल होतो आणि विशेषतः डॉक्टरही खात्री देत आहेत या करणांमुळें या पत्रानें आम्हांस फारसें भय वाटलें नाहीं !

दुसरे दिवशीं दुपारीं पत्र आलें त्यांतही ताप मुदत घेईल, भिण्याजोगें कांहीं नाहीं, असा मजकूर होता. यापत्रानें काळजी वाटूं लागली. "आम्हीं निघूं काय ?" असें **दादांनीं** तारेनें विचारलें. परंतु उत्तर येण्याचे पूर्वींच **शांताबाईच्या आईनें** ५ वाजण्याचे गाडीनें जावें असें नक्की ठरलें. मनुष्य बरोबर घेऊन ती गेलीही. नंतर लगेंच **दादांनीं**, "सौभाग्यवती निघाली" अशी दुसरी तार येवल्यास केली. तिच्याबरोबर फळें पाठविण्याचें भान राहिलें नाहीं. तीं लागलेच पार्सलनें पाठविलीं. सर्वांच्या वृत्त्या भांबावून गेल्या.

शांताबाईची आई सर्व प्रवासांत चिंतामय स्थितींत होती. घरीं जाते तों आपल्या काय दृष्टीस पडेल कोणास ठाऊक ! अशा

बेभिस्त स्थितींत एकदांची रात्रीं दोन वाजतां ती येवल्यास जाऊन पोंचली. शांताबाई वाटच पहात होती. ताईनें आई आल्याचें वृत्त सांगितलें. ती उठून बसली. आई येतांच तिनें आनंदानें बसल्या जागेवरून नमस्कार केला. मायलेकी कडकडून भेटल्या. आई तिचें मस्तक मांडीवर घेऊन थोपटूं लागली. ती बरी आहे, भिण्याचें फारसें कारण नाहीं, असें त्यावेळीं तिला वाटलें. शांताबाईचे अंगांत ताप मात्र बराच असल्याचें तिला दिसून आलें. तथापि तिची हुषारी पाहून त्याबद्दल तिला फारसें वाईट वाटलें नाहीं. शांताबाईनें थोड्या वेळांत आजाराची व इतर सर्व हकिकत सांगितली. नंतर ती आईच्या कुशींत उजाडपर्यंत निजली. सकाळीं उठल्यावर ती बरीच हुषारींत होती. काय काय कामें शिकलीं तें तिनें आईला सांगितलें. ता. २१।३।२५ पर्यंत तिनें काय काय कामें केलीं व तीं कशीं झालीं याबद्दल तिनें लिहिलेली डायरी (आई नको नको म्हणत असतां) स्वतः वाचून दाखविली. ताईनेंही तिचें गुणवर्णन केलें. शांताबाईनें आईस विचारलें. " आई मी वागलेंना तुझ्या आज्ञेप्रमाणें ? आई मी तुला आज स्वयंपाक करून दाखवूं कां ? " आई म्हणाली " नकोरे बाळ, पुढें केव्हां तरी कर. आज नको. माझीबाळ ती सर्व शिकली." शांताबाईच्या प्रेमळ वागणुकीनें, गोड भाषणानें आईला अगदीं कळवळून आलें. शांताबाईच्या उमेदीच्या भाषणानें तिचा आजार भिण्याजोगा नाहीं, अशी तिला खात्री वाटली. शांताबाईच्या या आजारांत हीच नवलाची गोष्ट होती कीं, तिच्या मृत्यूच्या आधीं दोन दिवसपर्यंत ती कालवश होईल, असें कोणासच वाटलें नाहीं. अपशकून झाले नाहींत, कीं दुष्ट स्वप्नेंही पडलीं नाहींत. मन नादान झालें म्हणजे तें आटकळ शास्त्र लढवून आपल्या मनांतील विचारास कौल लावतें. जसें—ही चिमणी झाडावर बसली आहे, ती जर १० अंक मोजीपर्यंत उडाली नाहीं, तर शांताबाई

वरी होईल असें कल्पून अंक मोजावे. (२) २० अंक मोजीपर्यंत जिन्यावरून येणारा मनुष्य वरच्या तवकडींत आला, तर शांताबाई वरी होणार. (३) हा मनुष्य या घरापर्यंत येई तों ती गाय त्या घराजवळ गेली, तर आजार विकोपास जाणार नाहीं वगैरे वगैरे नानाविध आम्ही (आमच्यापैकीं सर्वांनीं मनाशीं) कौल लाविले व त्यांतही कधींसुद्धां अनिष्ट आलें नाहीं. अतएव काय कीं, मधून मधून केव्हां केव्हां आम्ही जरी घाबरत होतों तरी आमच्या मनास केव्हांसुद्धां **शांताबाईच्या** आजाराच्या परिणामासंबंधीं ठाम अशी दुष्ट कल्पना शिवली नाहीं. अखेर अखेर ४।५ दिवस मात्र दादांचे मन परिणामाविषयीं साशंक झालें होतें.

शांताबाई आजारी पडल्यापासून **शांताबाईची** आई तेथें जाईपर्यंत आजारासंबंधीं जी जी हकीकत ताईकडून व शांताबाईकडून कळली ती संक्षपानें क्रमवार पुढें दिल्याप्रमाणें होती.

ता २१।३।२५ शनवार —**शांताबाईनें** एक पायली गहू निवडले. संध्याकाळीं **ताईचें** कीर्तन होतें तें पाहण्यास **शांताबाई** गेली. कीर्तनास जाण्याच्या आधींपासूनच **शांताबाई** मलूल दिसत होती.

ता. २६।३।२५ रोज दुपारीं ताप चढतो असें पाहून डॉ. **भटांना** आणले. नक्की तापाचें निदान सांगतां येत नाहीं असें त्या दिवशीं तें म्हणाले.

ता. २८।३।२५ शनवार —**थत्ते** वकीलांचे घरीं (हें घर अगदीं जवळच आहे) रोज दुपारीं गार जागेंत **शांताबाई** निजण्यास जात होती, या दिवसापासून गेली नाहीं. आतांपर्यंत आजारासंबंधीं पत्रें न टाकण्याविषयीं तिनें सांगितलें होतें. परंतु पुण्यास पत्र टाकण्याविषयीं या दिवशीं सांगितलें.

ता. २९।३।२५ रविवार-सायंकाळीं पुजेची तयारी करून देण्यास ताईस सांगितलें. हात–पाय धुवून **शांताबाईनें** देवास दुरून हळद-

कुंकू, फुलें वाहिलीं; धूप–दीप दाखविला. आरत्या व इतर भक्तिपर गाणीं म्हटलीं. **काकासाहेब थत्ते** वकील यावेळीं तेथें आलें होते. त्यांनीं सांगितल्यावरून तिनें **श्री शिवाजीमहाराजांच्या** जन्माचा पाळणा मधूर असा म्हटला.

ता. ३०।३।२५ सकाळीं ताप कालच्याप्रमाणें ९९° चे जवळ होता. मध्यरात्रीं **शांताबाईची** आई आली. **दादांनीं** येथून जातांना **शांताबाईचे आईस** सांगिलें होतें कीं, 'ती आणण्याजोगी असली तर सेकंड क्लास रिझर्व करून तिला इथें घेऊन येण्यास **आबासाहेबांस** (**ताईचे पतीस**) सांगावें. " तें ठरविण्याकरितां डॉक्टराचीं सल्ला घेतली. त्यांनीं याच वेळीं पहिल्यांदा (ता. ३१।३।२५) रोजीं **शांता-बाईस** टायफाईड फिव्हर असल्याचें सांगून येथून हलविणें अपाय-कारक होईल, असें आपलें मत दिलें. आज दिवसापर्यंत **शांताबाई** इझिचेअरवर बसत असे. परंतु आजपासून डॉक्टरनीं हालचाल न करण्याविषयीं **शांताबाईस** सांगितलें. तापाचे आरंभापासून म्हणजे ता. २१।३।२५ चे संध्याकाळापासून **शांताबाई** अन्न घेत नसे, दूध ताक, फळें, कॉफीवगैरे पदार्थ घेत असे.

ता. २।४।२५ गुरवार. **शांताबाईनीं** सांगितलें कीं, **दादांना** बोलावून घ्या. मला भेटावेसें वाटतें. त्याप्रमाणें **दादांना** येण्यास लिहिलें.

ता. ३।४।२५ शुक्रवार—डॉ. **भट** रोजच सकाळीं येत असत, परंतु आज दुपारपासून **शांताबाईस** ठसका येऊं लागल्यामुळें **डॉक्टरांना** पुन्हां दुपारीं आणले. त्यांनीं नीट तपासून साधा खोकला असल्याचें सांगितलें.

ता. ४।४।२५ शनवार—शांताबाई रोजच सकाळीं हुषार असे. सर्वत्रांशीं थट्टामस्करीचीं भाषणें करी. ताप सकाळीं ११ पासून भरण्यास लागे. त्यावेळीं देवाचीं गाणीं, व्यंकटेशस्तोत्र

कोणास तरी म्हणण्यास सांगें. अगर भक्तीमार्ग-प्रदीपांतला कोणता तरी भाग वाचून दाखविण्यास सांगें व आपण स्वस्थ पडत असे. दादा मध्यरात्रीं आले. दादांना पाहून तिला अपरिमित आनंद झाला. दादांनीं तिला बोलूं दिलें नाहीं. तरी ती बोलण्याचा प्रयत्न करीत होती.

दुसरे दिवशीं सकाळीं टेंपरेचर १०१° होतें व दुपारीं १०३° होतें. थोड्याबहुत फरकानें असेंच टेंपरेचर आठवडाभर होतें. तिची हुषारी चांगली होती. जिभेवर चिरावगैरें कांहीं नव्हतें. जीभ काळीही नव्हती. सर्व सौम्य अशींच लक्षणें होतीं. झोंपही चांगली येत असे. ताप मात्र दोनवेळ भरत असे. कॉफी पिण्यास ती उठूनच बसत असे. कांहीं केल्या ऐकत नसे. मामाला बोलावून घ्या असें तिनें सांगितल्यावरून त्यांस तार केली. ता. ८।४।२५ रोजीं निमोनिया झाला असल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें. त्या दिवशीं खाकेऱ्यांतून व नाकांतून किंचित रक्त गेल्याचें अढळून आलें. परसाकडण्यामध्येंही दोन तांबडीं जळमटें पडलेलीं दिसलीं. हें सर्व एकाच दिवशीं झालें. सर्व घाबरून गेले. आई, दादा, ताई हीं सर्व कोणत्यातरी कोपऱ्यांत जाऊन रडत होतीं. शांताबाईचे मावशीस (लेखिकेस) व राधाकाकूस तारा केल्या. ता. ९।४।२५ रोजीं तिची मावशी आली. तिची मावशी व तिची ताई नार्सिंगचें शिक्षण घेऊन त्यांत पास झालेल्या असल्यानें त्या तिचें नार्सिंग शक्य तितक्या काळजीनें करीत होत्या. डॉ. भटही मोठ्या शिकस्तीनें व आस्तेवाईकपणानें केस ट्रीट करीत होते. शांताबाईच्या प्रकृतीसंबंधीं रोज १०।५ पत्रें व १।२ तारा बाहेरून येत जात असत.

ता. ११।४।२५ शनवार—ह्या दिवशीं सकाळीं ताप १०३° होता. सकाळीं इतका ताप आजपर्यंत केव्हांच नव्हता. आज

आजारास २२ वा दिवस होता. आदले रात्रीं (२१ वा दिवस असल्यानें) ताप निघेल असें वाटलें होतें. तसें तर झालें नाहींच पण उलट या दिवशीं तापाचा सकाळींच जोर दिसला. त्यानें सर्वांचीं धाबीं दणाणून गेलीं. २१ व्या दिवशीं ताप निघेल, अशी शांताबाईस फार आशा होती. ती या दिवसाची वाट पहात होती. परंतु तसें झालें नाहीं, हें पाहून ती फार खिन्न झाली. गरीब बिचारी बालिका! सर्व आजारांत तिनें कसला कसला तो हट्ट केला नाहीं. कसलाही पदार्थ खाण्यास मागितला नाहीं. जरा बरें वाटलें कीं, लगेच सर्वांशीं गोड गोड व समजुतीचीं भाषणें करी. येवल्याचा उन्हाळा, अंगांत टायफाइडचा ताप, घरावर पत्र्याचें रूफ अशा तडफडींत देखील तिनें कोणासही दुखविलें नाहीं. अशा सुगुणी बालिकेचें आज दुपारीं टेंपरेचर आणखी चढल्यावर तिची स्थिति होणार तरी काय? या विचारानें आमचीं सर्वांचीं तोंडें प्रेतवत् निस्तेज झालीं. अशी आमची स्थिति पाहून ती दादांना म्हणाली, "दादा, आज तुम्ही निस्तेज कां दिसतां? तुमच्यासारखा पुरुष आणि त्याचा केविलवाणा चेहरा पाहणें खरोखरीच कष्टप्रद होतें" दादांनीं त्यांना होत असलेले मानसिक क्लेश गिळून व आलेला हुंदका दाबून ते म्हणाले, "मला इथला उन्हाळाच सहन होत नाहीं, त्यानें असा चेहरा झाला आहे. दुसरं कांहीं नाहीं. या उत्तरानें तिचें समाधान झालें नाहीं. दादा कांहीं वेळानें बाहेरच्या खोलींत जाऊन मंडळींत चिंताग्रस्त मनानें बसले. ११॥ वाजतां सकाळीं शांताबाईस कांहींसें बरें वाटूं लागल्याचें तिनें आईस व आक्कास (लेखिकेस) सस्मित चेहरा करून सांगितलें. त्यांनीं तिच्या अंगास हात लावून पाहिला तों तिला घाम येत असल्याचें दिसून आलें. त्यामुळें त्यांना व शांताबाईला विलक्षण आनंद झाला. शांताबाईनीं दादांना आधीं कळवा असें सांगितलें. सर्वत्रांना आनंद झाला. चोहोंकडे प्रफुल्लित-

घणा आला. सर्वत्र तिच्या भोंवतालीं जमा झाले. घाम सारखा सुटूं लागला. शांताबाईनीं रामदासस्वामींच्या तसबिरीला भावना-युक्त नमस्कार केला. त्या तसबिरीस ती रोज ५।२५ वेळां नमस्कार करीत असे. काकासाहेब थत्ते, डॉ. भट, आबासाहेब भाटवडेकर वगैरे लोकांचीं नांवें घेऊन शांताबाईनीं घाम येत असल्याचें वर्तमान त्यांना कळविण्यास सांगितलें. सर्वांना वर्तमान कळविलें. ज्यांना ज्यांना तें वर्तमान कळलें, ते सर्व तिच्या बिछान्याच्या भोंवतालीं जमले. ती सस्मित वदनानें खास दुःखण्यांतून उठले या भावनेनें बोलूं लागली. डॉ. भटांनाही आनंद झाला. घाम येतच होता. पुसण्याचें काम चालूं होतें. थर्मामिटर लाविलें तेव्हां ९७।४° टेंपरेचर असल्याचें दिसून आलें. आज महिन्यांत जी गोष्ट झाली नाहीं, ज्या गोष्टींची चातकाप्रमाणें आम्ही वाट पाहात होतों, ती सुखवेळा आली हें पाहून आनंदातिरेकानें एकच गडबड उडून गेली. आमच्यापैकीं कोणी म्हणालं, "मी म्हणत नव्हतों देवाची अल्पवयी भक्तबालिका खास बरी होणारच." दुसरा म्हणाला, "काय असेल तें असो, वावगें होण्याची कल्पनादेखील कधीं कोणाला या आजारांत शिवली नाहीं. आणि तेंच प्रत्ययास आलें." एकंदरीनें काय कीं, सर्व मंडळी आनंदातिशयानें प्रफुल्लित झालीं. संकट टळलें बालिकेचा पुनर्जन्म झाला, कष्टाचें सार्थक झालें, या विचारांनीं सर्वजण ईश्वराचे आभार मानूं लागले. डॉ. भट घरीं जाण्यास निघाले. जातांना त्यांनीं सांगून ठेविलें कीं, टेंपरेचर ९६°चे खालीं गेल्यास मला कळवा. शांताचे आईनें रा—भाटवडेकर मास्तरांना मारुतीला अभिषेक करण्यास सांगितलें. दादांनीं शांताबाईचे तोंडावरून हात फिरवून स्नानास जाण्याची परवानगी घेतली. "दादा, आई, तुम्ही आतां स्नानास जा. ताई, आक्का मजजवळ आहेत. आतां माझी काळजी नको. जरा ताकद आली कीं, आपण साऱ्यांनीं श्रीसमर्थांच्या

दर्शनास सज्जनगडास जावयाचें." वगैरे बोलून—तेही अत्यंत उल्हासितपणानें बोलून—**दादांना** स्नानास जाण्यास निरोप दिला. **दादा** स्नान करून आले. सर्व पुरुषमंडळी जेवणास बसली. **शांताबाईचें** टेंपरेचर आक्कांनीं घेतलें. तें पाहतां ९५° असल्याचें दिसून आलें. एकच हाहाःकार झाला. पुरुष मंडळी पानावरून उठली. शांताबाईही अगदीं मलूल झाली. कुणी डॉक्टरकडे, कुणी वैद्याकडे, कुणी हेमगर्भाची मात्रा आणण्यास **पळत सुटले**. सर्वांचे चेहरे निस्तेज झाले. आतां काय परिणामावर गोष्ट जाते, याचें सर्वांस चिंतन पडलें. **डॉ. भट** आले. **त्यांनीं** दोन गोळ्या मधांत घालून चाटण तयार केलें. **शांताबाई** अगदीं शक्तिहीन झालेली दिसत होती. ती सारखी गुंगत होती. तें चाटण ती कांहीं केल्या घेईना. पुष्कळ विनवण्या केल्या **परंतु** व्यर्थ! मला निजूं द्या एवढेंच फक्त ती म्हणे. **दादा** साश्रुनेत्रांनीं तिच्याजवळ गेले व अत्यंत केविलवाणीनें तिला म्हणाले, "**शांताबाबा** नकोरे असें करूंस, माझ्याकरितां तरी औषध घेरे." **दादांनीं** असें म्हणतांच **शांताबाईनीं** स्मित केलें व कसें तरी तोंड उघडून **दादांनीं** घातलेलें औषध गिळलें! काय तिची ही **दादावरची** निष्ठा! केवढें प्रेम **दादावर**! हा सर्व प्रेमाचा पसारा पाहून आमच्याही डोळ्यांतून त्यावेळीं आश्रु वाहिले!! **शांताबाईस** घाम सारखा येतच होता. ५।१० मिनिटें वाट पाहून डॉ **भटांनीं** 'पिचिटुरीन' चें इन्जेक्शन केलें व ते गेले. १।२ तासानंतर टेंपरेचर वाढूं लागलें. यामुळें पुन्हां एकदां सर्वत्रांस आनंद झाला. परंतु तिसरे प्रहरीं ४॥ वाजतां टेंपरेचर वाढत जाऊन १०३॥ डिग्री झालें. **शांताबाई** तळमळूं लागली. "आग आग सगळया अंगाचा डोंब झाला" असें ओरडूं लागली. ताप पुन्हां चढलेला पाहून तिनें केविलपणानें निराशेचे उद्गार काढले! "आतां मी डॉक्टरचें औषध कदापि घेणार नाहीं. ब्रह्मलिखित टळेलसें दिसत

नाहीं. या करितां आई, तूं दादांना माझी अखेरची इच्छा म्हणून सांगून डॉक्टरांचें औषध बंद कर."

या तिच्या हताश उद्गारानें आमच्या काळजाचें पाणी पाणी झालें! हातपाय गळून गेले! आशानिराशेच्या अनेक लाटांमध्यें आम्ही सर्व या दिवशीं गटांगळ्या खात सारखे घडपडत होतों. त्या प्रेमळ बहुगुणी बालिकेकरितां प्रत्येकजण आपला जीव खर्ची घालण्यास तयार होता. इतकी तिच्या जीवाची किंमत आम्हां सर्वांस वाटत होती.

यापुढें दर घडी आमच्या काळजाचें पाणी करून सोडणारे प्रसंग येत होते, परंतु ते संगतवार आमच्याकडून लिहिलें जाणें शक्य नाहीं.

वर दिलेली हकिकत शनिवारीं झाली. तिजवर प्रेम करण्याऱ्या लोकांना तारा व पत्रें रवाना झालीं. तिचा मामा, राधाकाकू, सरस्वतीकाकू वैगेरे सर्व मंडळी २।३ दिवसांत येवल्यास येऊन दाखल झालीं. नवीन मनुष्य आलें कीं, शांताबाईला कितीही क्लेश होत असले तरी ती त्यांच्याशीं क्षेमसमाचाराचीं ४।६ वाक्यें बोलावयाचींच असें चालू होतें. त्यांतल्या त्यांत तिला जरा बरें वाटलें कीं, ती विनोदाचीं भाषणें सर्वांबरोबर करावयाची असा क्रम चालू होता.

तिच्या मतानें (इतरांनींही तशी तिची समजूत करून दिली असल्यानें) गुरुवार ता. १६।४।२५ रोजीं ताप निघेल असें घेतलें होतें. परंतु त्या दिवशीं सकाळीं ताप निघाला नाहीं. उलट सकाळींच १०३° असल्याचें तिला समजलें. तेव्हां तिनें ऐहिक सर्व आशा सोडून दिल्या. यानंतर तिनें केव्हांही "मला कधीं बरें वाटेल" असले प्रश्न विचारले नाहींत. कधीं विनोद केला नाहीं किंवा कधीं दुखण्याबद्दल व होत असलेल्या यातनांबद्दल कुरकुर केली नाहीं

कोणीं बोललें तर त्यास समर्पक उत्तर देई व स्वस्थ असे. ती आपल्या प्रकृतीबद्दल बेफिकिर झाली होती. आम्ही सर्व तिजवर प्रेम करणारीं माणसें अत्यंत दु:खीकष्टी आहोंत, याचें मात्र तिला वाईट वाटत असावें, असें केव्हां केव्हां तिच्या बोलण्यावरून दिसे.

रविवार ता. १९।४।२५ रोजीं सकाळपासून रात्रीं ९॥ वाजेपर्यंत तिची प्रकृति रोजच्यापेक्षां बरी वाटत होती. सबंध दिवसांत १०१॥ वर ताप चढलाच नाहीं. यामुळें आम्ही सर्व बरेच आनंदांत होतों. परंतु मागील कटु अनुभव आमच्यासमोर उभे असल्यानें या बऱ्यापुढें कांहीं वाईट तर वाढून ठेवलें नसेलना, अशी भीति आम्हांला होतीच !

याच दिवशीं दुपारीं आम्ही सर्व तिच्याजवळ बसलों असतां ती म्हणाली, "आक्का, मला कीर्तनांतली गाणीं म्हणावीशीं वाटतात. म्हणूं का ग? कां दादा रागावतील?" १।२ दिवसांत तिनें स्वत:ची इच्छा अशी कधींच दर्शविली नसल्यानें व तिला बरेंही वाटत असावें, असें वाटून आक्कांनीं (लेखिकेनें) तिला सांगितलें, "म्हण बाळ. दादा नाहीं बरं रागावणार." यावर सुरावर परंतु हलक्या आवाजांत तिनें पुढील गाणें म्हटलें.

अंत समय परम घोर । तापत्रय करिती जोर ॥
घुरु घुरु घुरु कंठ होय । भरिल भ्रम हरिल स्मृती ।
होसी बावरा । करि अति त्वरा ॥ १ ॥
घडि घडि घडि पल पल जप अच्युत धाम, रामनाम,
घेसि आदरा । करि अति त्वरा ॥ २ ॥

हरहर! काय हें गाणें! आमच्या नेत्रांतून अश्रु आले. तिच्या आईनें आपले डोळे पुसले. सद्गदित अंत:करणानें शांताबाईचें

चुंबन घेतलें व तिला म्हणाली, "माझ्या राजा, दुसरं एखादं गाणं म्हणावयाचं सोडून अशा वेळीं असलं कां गाणं म्हणायचं ? काय बरं केलंस ? तुला आज बरं वाटतं आहे ना ? थोडी कळ काढ. २।४ दिवसांत माझं बाळ अगदीं बरं होईल."

यावर शांताबाई किंचित् स्मित करून म्हणाली—"आई, तुला नाहीं हें गाणें आवडलें ? मला तर वाटतें कोणत्याही स्थितींत कोणत्याही वेळीं हें गाणं माणसांनीं म्हणावं. यांत किती अर्थ आहे ? तुम्हांला नको असेल तर मी पुन्हां म्हणणार नाहीं. आई, तूं आतां व्यंकटेशस्तोत्र म्हण. मी ऐकतें. असें म्हणून ती कुशीवर वळली. यावेळीं ती जरा दमल्यासारखी दिसत होती.

दिवस मावळला. रात्रीचे ९॥ वाजले. सर्व मंडळी कांहींशीं आनंदांत होतीं. (कारण सर्वांच्या मतें तिची तब्बेत रोजच्यापेक्षां आज जरा बरी वाटत होती) तोंच शांताबाईला निवळ रक्ताचा फार मोठा जुलाब झाला. तें रक्त शेर दीड शेर असावें. आज वाटत असलेल्या आनंदाची राखरांगोळी झाली. श्री. काका थत्ते, भाटवाडेकर मास्तर, आबासाहेब आपटे व दादा हे सडकेवरील ओट्यावर (शांताबाईस सर्व दिवसभर आराम असल्यामुळें) आनंदानें बोलत बसले होते. त्या वेळीं बयाताईनीं दादांना घाबऱ्या घाबऱ्या हाक मारली. "आहो दादा लवकर याहो, शांताबाला सारं ब्लड पडलं हो" हेच ताईचे शब्द होते. ते शब्द आमच्या सर्वांच्या कानांत अजून जसेच्यातसे गुणगुणत आहेत. ते शब्द आठवलें कीं अंगावर शहारे उभे रहातात.

सर्व धांवत पळत वर आले. डॉक्टरांना बोलावणें गेलें. दादांना घाबरलेले पाहून शांताबाई म्हणाली, "दादा, तुम्ही असे घाबरलेले कां दिसतां ?" रक्ताचा रेच झाला हें तिला सांगितलें नव्हतें. दादांनीं तिचीं कांहीं तरी बोलून समजूत घातली. इतक्यांत डॉक्ट-

रही आले. तेही जरा गडबडले. एवढेंच नव्हे, तर त्यांचाही धीर सुटला. त्यांनीं स्टार्च एनिमा दिला. परंतु त्याचा उपयोग न होतां पुन्हां तसाच रेच झाला. मग त्यांनीं मार्फियाचें इंजेक्शन केलें. डॉक्टरांचेंहीं या गुणी बालिकेवर चांगलें प्रेम होतें. शांताबाईची ही बिकट स्थिति पाहून त्यांनाही फार वाईट वाटत असल्याचें दिसत होतें. "ब्लड डायरिया (रक्ताचा जुलाब) टायफाईडमध्यें झालेली येवल्यास ही पहिलीच केस आहे. हा डायरिया शांताबाईच्याच नाशिबीं यावा, हें दुर्दैव म्हणावयाचें ! दुसरें काय ?" असें डॉ. म्हणाले.

शांताबाई बरीच थकली. इंजेक्शन झाल्यावर १।२ मिनिटांनीं ती दादांना म्हणाली, " दादा, मला वाटतें ही माझ्या जीवाची ओढाताण पुरे करा. एका मार्गानेंच आतां सर्व होऊं द्या. उपाय म्हणून जे तुम्ही करतां त्यापासून उपयोग न होतां मला अधिक यातना होतात. मला प्रभुचरणावर लोटा व जें होणार तें होऊं द्या. "

असें बोलतां बोलतां तिला गुंगी आली व कांहीं वेळ अस्पष्ट बोलत बोलत ती पुरी गुंगली. ती तशीच सोमवार पहाटपर्यंत होती. पहाटेस तिला मनस्वी घाम (मागील शनवारप्रमाणें) सुटला. डॉक्टर सकाळीं आले व पाहून गेले.

सकाळीं ८–९ वाजतां ती चांगली शुद्धीवर आली. दूध घेतलें. ती अत्यंत क्षीण झालेली दिसली. आमच्याकडे पाही. आमचे निस्तेज चेहरे पाहून तिला क्लेश होत. होणारे परिणामाबद्दल तिची जवळ जवळ खात्री असावी, असें तिच्या बोलण्यावरून वाटें.

ताईस तिनें देवाचीं गाणीं म्हणण्यास सांगितलें. श्री. पळूसकरबुवा ज्या चालीवर "रघुपति राघव राजाराम । पतित पावन सिताराम " हें भजन म्हणतात, त्या चालीवर तें म्हणण्यास सांगितलें. हें भजन एक तासभर ताईनीं सुरावर म्हटलें. ताई दमली

असें वाटून तिनें तें पुरें करण्यास सांगितलें व ती स्वस्थ पडली. दुपारीं १२ वाजल्यापासून तिचा आवाज खोल गेल्यासारखा वाटूं लागला. नजरही जरा चमत्कारिक झाली. उजवा हातही डाव्या हाताच्या मदतीशिवाय उचलेनासा झाला. ती सारखी तळमळूं लागली. या कुशीवरून त्या कुशीवर होऊं लागली. तहानही फार लागूं लागली. सारखे बर्फाचे लहान लहान खडे मागून घेऊं लागली. बर्फ ती अखेरपर्यंत एकसारखी कडाकड फोडून खात होती. सोमवार दुपारीं १२ वाजल्यापासून मंगळवार पहाटे ५॥ वाजेपर्यंत तिनें ११ पौंड बर्फ खाल्ला. डावे हातानें ती आपलें सर्व अंग खाजवीत होती. कैक ठिकाणीं ओरखडेही काढले होते.

दुपारीं ५-५। वाजतां तिनें **दादांना** बोलावण्यास सांगितलें. **दादा** दुःखातिशयानें आज सकाळपासून कुठें तरी बसलेले होते. **दादांना** बोलावून आणलें. कंपित हृदयानें ते तिच्याजवळ येऊन बसले. तिनें आपला डावा हात त्यांचे मांडीवर ठेवून हास्य केलें. ती त्यांना म्हणाली, "**दादा**.....................

(दोहरा)

जिसदिन तुम जन्म लिये जग हासे तुम रोय ।
ऐसी करनी कर जायो पिछे न हासे कोय ॥ १ ॥

असं माझ्याकडून झालं नाहीं ?"

यावर **दादा** काय उत्तर देणार? कीर्तनांत ज्या ज्या गोष्टी तिला शिकवल्या त्या त्या तिच्या कोमल मनोभूमीवर चांगल्याच वठल्या, हें पाहून त्यांना एकदम रडण्याचा हुंदका आला. त्यांना हुंदका आलेला पाहून तिच्या आसपास बसलेल्या आम्हां सर्वांस एकदम रडूं कोसळलें. एकच हळकल्लोळ झाला. शेजारच्या खोलींतून पुरुषमंडळी एकदम धावून आली. सगळे रडावयास लागले असें पाहून **शांताबाईही** फार घाबरली. तिचें सर्व अंग कांपूं लागलें. पुरुषमंडळींनीं

"हें तुम्ही काय आरंभलं आहे, या तुमच्या वेडेपणानें शांताबाईची काय स्थिति होत आहे तें पहा" असें म्हणतांच व शांताबाईची गांगरलेली मूर्ति पहातांच आम्ही शुद्धीवर आलों. रडूं दाबलें. अश्रु पुसले. लटकाच गंभीरपणाचा आव आणून शांताबाईच्या अंगावरून हात फिरवून दादा तिचें अंग चेपूं लागले. ती अर्धा तास कांहीच बोलली नाहीं. नंतर ती म्हणाली. "दादा, तुम्ही सर्वत्रांनीं मजवर किती हो प्रेम केलंत ? परंतु माझ्या हातून तुम्हांला सुख मिळणार नाहीं. मी तरी काय करूं............दादा, झालें. मला तुम्हांला सांगावयाचें होतें तें झालें."

यानंतर ती डोळे मिटून पडली. दादा उठून गेले. रात्र झाली. आठ वाजतां ती बोलूं लागली. परंतु आतां हें सर्व बोलणें निराळ्या प्रकारचें होतें. कोणी म्हणत हा ज्ञानवायु आहे. वायु म्हणावा, तर ती शुद्धींत आहे असें दिसे. कारण विचारलेल्या प्रश्नांचे जबाब ती सुसंगत देत होती.

तिची आई व तिची मावशी (लेखिका) रविवार रात्रींपासून मंगळवार पहाटपर्यंत फारच थोडा वेळ तिजपासून दूर गेल्या असतील. सोमवारीं रात्रीं ती जें जें बोलली त्यापैकीं आम्हांस जें समजलें तें पुढें एकत्र करून दिलें आहे. तिचा भाचा शंभू यास कमरेचा पट्टा आणून देण्याचें तिनें १।। महिन्यापूर्वीं कबूल केलें होतें. त्यास उद्देशून ती म्हणाली, "शंभू बाळाला पट्टा आणून देण्याला विसरूं नका."

"संसार मिथ्या आहे. अगदीं निस्सार आहे."

"नेमानेम येवल्यास होता. कुठलें घर आणि कुठलें दार".

"देव नवसास पावते तर ब्रह्मलिखिताचा बोज तो काय राहिला असता?"

"धन्य शिवाजी । धन्य जिजाई । रामदास गुरु माझे आई ॥"
(हें भजन शिवाजीआख्यानांत तिनें स्वतः रचून घातलें होतें.)

"माझी मी तयार झालें परंतु दादांची तयारी कुठें आहे ?"

"अंतसमय परम घोर । तापत्रय करिती जोर ॥"

"धनंच भूमौ पशवश्च गोष्ठे । कांता गृहद्वारिजनः स्मशानें ॥
देहश्चितायां परलोकमार्गें । कर्मानुगो गच्छति जीव एकः"॥१॥

मंगळवारीं पहाटे ४ वाजल्यापासून तिच्या डोळ्यापुढें कांहीं निराळे प्रकार दिसूं लागले असावे, असें वाटतें. कारण ती म्हणाली—

"आक्का, मी कशी जाऊ ? किती किती उंच शिडी ही ?" यावर आम्ही तिचे डोळे झांकले व म्हटलें, "बाळ, तूं स्वस्थ पड." तूं कांहींचे कांहीं बोलतेस म्हणून तूं जरा बडबड न करितां निवांत पड." यावर शांताबाई म्हणाली, "तसं नाहीं ग. मी सावध आहे. तुमचें नांव सांगूं कां ? तुझें नांव सारजाबाई बापट, आईचें नांव सावित्रीबाई ओंकार, ताईचें नांव राधाबाई आपटे. आज मंगळवारची पहाट आहे. आणखी काय काय हवं, बोला. परंतु ती शिडी पहा किती उंच आहे!" इतकें बोलून तिनें खाण्यास बर्फ मागितला. बर्फ संपत आला असल्यानें तिची आई तिला म्हणाली, "बर्फ थोडा आहे. जरा दमादमानें खा म्हणजे सकाळीं दुकानें उघडेपर्यंत पुरेल." यास तिनें उत्तर दिलें. "दाने दाने पर लिखा है । खानेवाला का नाम । तूं काळजी करूं नकोस. माझा वाटा आहे तो मला मिळणारच. पांच वाजून गेले असतील. त्यावेळीं ती म्हणाली, "आई, मला रात्रभर झोंपच नाहीं काग लागली? किती वाजले पहा बरं. थोडा बर्फ दे." यावेळीं तिची चर्या पार बदलून गेली होती. कंबरेखालील भागाची हालचाल बंद झालेली होती. बर्फाचा अर्ध्या सुपारी एवढाच तुकडा फक्त शिल्लक राहिला होता तो तिला दिला. आतां इनें बर्फ मागितला तर काय करावें याची

काळजी पडली. परंतु पुढें बर्फ मागण्यास ती राहिलीच नाहीं. याला म्हणतात योगायोग !

बर्फ खाल्ल्यानंतर तिनें आम्हांस भजन करायास सांगितलें. आम्हीं भजन करूं लागलों. परंतु यावेळीं तिच्या कर्णेंद्रियाची शक्ति नष्ट झाल्याचें आम्हांस आढळून आलें. कारण आम्ही मोठमोठ्यानें भजन करीत असतांही ती थोड्या वेळानें म्हणाली—

"तुम्ही भजन करतां तें मला ऐकूं येत नाहीं. जरा मोठ्यानें करा. नाहीं तर, मीच कीर्तन करतें." असें म्हणून तिनें आपला निर्जीव झालेला उजवा हात डावे हातानें उचलला व मस्तकापाशीं नेऊन नमस्कार केला व ती रामराम म्हणूं लागली. यावेळीं तिचा शब्द बोबडा येऊं लागला होता. ८।१० वेळ "**राम**" हा शब्द सावकाश, ती म्हणाली तों तिला एक अचका आला व सारें आटपलें. शके १८४७ चैत्र वद्य **१३** मंगळवार ता. २१ एप्रिल सन १९२५ प्रभातीं ५॥ वाजतां **शांताबाईचा** पुण्यात्मा इहलोक सोडून परलोकीं चालता झाला ! रत्न हरपलें ! नंदादीप विझाला ! सर्वत्र भीषण काळोख दिसूं लागला ! तिच्या मृत शरिरास आम्हीं कवटाळून बसलों. गडबडां लोळलों. डोकें फोडून घेतलें. काय केलें आणि काय नाहीं ! !

दुःखवेदना असह्य झाल्यामुळें पुढील हकीकत लिहिण्यास अवसान राहिलें नाहीं म्हणून तूर्त तरी येथेंच थांबणें जरूर झालें आहे.

प्रकरण ७ वें.

मृत्युनंतर.

अनेक स्त्रीपुरुष तिच्या निर्जीव देहाचें दर्शन घेण्यास जमा झाले. कैक स्त्रियांनीं तिला हळदकुंकूं वाहून नस्मकार केले. गेल्या २।३ वर्षांत शांताबाईची या येवलें गांवांत १०।१२ कीर्तनें झालीं होतीं. तीं तेथील लोकांना फारच आवडलीं होतीं. कैक स्त्रियांचा व तिचा उत्तम परिचय झाला असल्यानें त्यांनीं या वेळीं दुःखाश्रु गाळणें अगदीं स्वाभाविकच होतें.

पुढील सर्व विधी यथोचित रीतीनें झाला. दादा यावेळीं दुःखातिशयानें जडवस्तुप्रमाणें अचेतन बनले होते. त्यांना कांहीं समजेनासेंच झालें होतें. शव उचलतांना सर्वत्र हाहाःकार उडाला. ज्या कुडींत शांताबाईचा पुण्यात्मा आज एक तपपर्यंत वास्तव्य करून होता, त्या कुडीस आप्तेष्टांनीं नमस्कार केले.

अशक्य अगदीं अशक्य ! या वेळच्या स्थितीचें, या वेळच्या दुःखाचें, यावेळीं घडलेल्या अनेक करुणाजनक प्रसंगाचे बरोबर वर्णन करणें अगदीं अशक्य आहे. म्हणून तो नाद आम्ही सोडून देतो.

* * * * *

ता. २३ एप्रिल १९२५ रोजीं शांताबाईच्या अस्ती कोपरगांवास पोंचवून आम्ही सर्व मंडळी पुण्यास आलों. परंतु पुण्यास आल्यावर आमचे मनःक्लेश अधिकच वाढले. परिचित व अपरिचित अनेक स्त्री-पुरुष समाचारास आले. अनेकांनीं शांताबाईसंबंधीं प्रशंसोद्गार काढून नव्या नव्या गोष्टी आमच्यापुढें उभ्या केल्या. शांतवनपर पत्रें प्रत्यहीं दादांना येत होतीं. त्यांतील कांहींचा सारांश थोडक्यांत खालीं देत आहों.

शांताबाईची मैत्रीण प्रयाग (सौ. सरस्वतीबाई रुइकर) लिहिते:—

" कुमारी शांताबाईला देवाज्ञा झाल्याचा अत्यंत दु:खदायक मजकूर ऐकून मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति झाली. दु:खाची परभावधि झाली.

शांताची आनंददायक व प्रेमळ मूर्ति नजरेसमोरून हालतच नाहीं. अल्पवयांत तिनें केवढा लौकिक व केवढी योग्यता संपादन केली! ....तिची व माझी भेटदेखील होऊं नये हें केवढें दुर्दैव!"

श्री. बेंद्रे (महाबळेश्वराहून) लिहितात:—

"तें देवाघरचें लेणें। नशिबानें देणें घेणें। कुणितरी कुणास्तव रडणें। तीं रडणारीं रडतील धाई धाई। करि आतां जो जो गाई॥

Alas! At last God has removed from us His sweetest flower leaving us as to mourn the loss of his trust forever!! She had exemplary modesty in her behaviour, upto date education, rarest simplicity of mind, heart and action..........................

श्री. दा. वि. गोखले लिहितात:—

(शांताबाईच्या मृत्यूचें) "वर्तमान ऐकून चित्तास मोठाच धक्का बसला. आपल्यावर तर डोंगरच कोसळला..........."

श्री. तळवळकर लिहितात—"शांताबाई कालवश झाल्याचें ऐकून फार दु:ख झालें. आज २।३ वर्षें श्रीशिवरायाची सेवा कीर्तन-द्वारां ती करीत असल्यानें यंदा आम्हांस चुकल्या चुकल्यासारखें वाटल्यावांचून राहणार नाहीं........आम्ही उत्तरोत्तर तिजपासून जास्त अपेक्षा करीत होतों. श्रींनीं (श्रीजगद्गुरूंनीं) तशीच अपेक्षा केल्याचें आपल्या स्मरणांत असेलच........"

श्री. विष्णु दिगंबर पलुस्कर (गांधर्वमहाविद्यालय) लिहितात:—

"कुमारी शांताबाई ओंकार ह्या हा लोक सोडून गेल्याचें ऐकून ...त-वाईट वाटलें. प्रत्येक मनुष्य--जन्माला आल्यानंतर--जाणार

आहे, हा सिद्धांत जरी अबाधित असला तरी अल्प वयांत विशेष गुणी माणसावर अशा प्रसंग आल्यास वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं.............

श्री. **उपासनी** लिहितात:—

"**शांताबाईच्या** निधनाची वार्ता ऐकतांच हृदयास धक्का बसला. बालपणच्या मधुर आवाजानें तिनें खरोखरच परमेश्वराला आळविलें व तो त्याच्या प्रियभक्तास स्वगृहीं घेऊन गेला ! !............

श्री. **आठवले** (माळशिरस) लिहितात:—

"**शांताबाई** पूर्वजन्मीची देवता होती. तिनें ऐन मृत्युसमयीं देखील शांत वृत्ति कायम ठेवून अगदीं अखेरच्या क्षणाला रामनाम घेऊन सार्थक केलें. तिजवर भक्तिमार्गाचें चांगलेंच प्रतिबिंब उठलें होतें. हें सर्व कीर्तनामुळेंच होय........ ... .तिनें मरावें कसें हें आपणा सर्वांस शिकविलें. तिच्या अलोट बुद्धीचें, दांडग्या स्मरणशक्तीचें, असामान्य सभाधीटपणाचें व समाधानवृत्तीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे...................."

श्री. **परचुरे शास्त्री** लिहितात:—

"............सद्गुणी, सुचरिता **शांताबाई** शांत झाली हें ऐकून परमावधीचें दु:ख झालें. बा मृत्यो ! मूर्त स्वरूपांत भूतलावर तुझा संचार असतां, तर तुला हडसूनखडसून या कृत्याचा जाब विचारला असता...........हाय ! हाय ! मजसारख्या तिऱ्हाइतास २० दिवसांच्या सहवासानें इतका चटका लागला, तर **दादासाहेब** ! आपल्यासारख्या प्रेमळ व कोमल हृदय पित्यास काय दु:ख होत असेल !! आमच्या या पतित राष्ट्रांत **शांताबाई**-सारखी सद्गुणी कन्या अल्पायु व्हावी, हें राष्ट्राचें दुर्भाग्य ! ! ! ....ज्यांनीं म्हणून **शांताबाईचें** कीर्तन ऐकलें असेल असे हजारों महाराष्ट्रीय आपल्या दु:खाचे वांटेकरी खास आहेत.

‘मनी निष्ठा अचल असतां’ हें तिचें अर्थपूर्ण मधुर पद माझ्या कानांत अजून घुमत आहे. तिनें मला व आबासाहेब यांना सद्यः-स्थितीसंबंधीं अनेक चतुर प्रश्न करावे व रात्रीं बारा वाजले तरी संभाषण आटपूं नये ! तिची स्मरणशक्ति इतक्या बालवयांत एवढी वाढलेली पाहून कौतुक व आनंद वाटे.”

अशीं अगर अशाच मजकुराचीं ठिकठिकाणाहून अनेक पत्रें आलीं. त्यामध्यें स्त्रियांचीं ३०।४० पत्रें होतीं. मे. लेडी सुपरिंटें-डेंट फिमेल हायस्कूल पुणें यांजकडून तर शांताबाई आजारी पडल्यापासूनच कळकळीचीं पत्रें येत होतीं.

या पत्रांपासून किंवा समाचारास येणाऱ्या मंडळींच्या कळकळी-पासून आमचा दुःखवेग कमी न होतां तो तीव्रच होत गेला ! इतक्या अमोल किंमतीचें आमचें सजीव रत्न गेलें, असें वाटून क्षणो-क्षणीं भडभडून येऊं लागलें. आमची समजूत घालून आमचें दुःख कमी करण्यास लोक येत, परंतु शांताबाईच्या गोष्टी काढून आमच्या-सारखेच तेही दुःखाचे भाराखालीं दडपून जात !

श्री जगद्गुरु शंकराचार्य पुणें मुक्कामीं ३१ मे १९२५ रोजीं दादांच्याकडे आले. त्यांनींही आपल्याकडून दादांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या अत्यंत वंदनीय अशा थोर विभूतीस त्या प्रयत्नांत यावें तसें यश आलें नाहीं. तेही आमच्या सारखेंच शांताबाईचे गुण आठवून अस्वस्थ झाले. त्यांचें त्या बालिकेवर परम प्रेम होतें. त्यांच्या उत्कट प्रेमाचें द्योतक म्हणून त्यांनीं “शांताबाईस थोडे दिवस नाशकास पाठवून द्या. मी स्वतः संस्कृत शिकवीन” असें गेले वर्षींच सांगितलें होतें. शांताबाईचीही त्यांचे चरणीं अढळ निष्ठा होती. ती आजारी असतांना तिच्या समोरच दोहींकडे दोन अशा तसबीरा होत्या. त्यांतील एक श्रीजगद्गुरूंची दुसरी श्रीसमर्थ रामदासांची. ती त्या तसबिरांस प्रत्यहीं [illegible]ं नमस्कार करी.

डॉ. दादासाहेब जोगळेकर भेटीस आले. त्या वेळीं शांताबाईच्या आजाराची सर्व हकिकत सांगून दादा त्यांना म्हणाले, "दादासाहेब यावेळीं एक गोष्ट फार वाईट झाली. देवावर आमचा परिपूर्ण विश्वास आजपर्यंत होता तो उडाला. देव आम्हांस नवसास पावला नाहीं. श्रीसमर्थांना आम्ही शांताबाईसह अनन्यभावानें शरण गेलों. त्याचाही उपयोग झाला नाहीं."

यावर डॉ. दादासाहेब म्हणाले, "तुम्ही चुकतां. ईश्वरी नेमानेमाप्रमाणें सर्व गोष्टी झाल्याच पाहिजेत. शांताबाई या शिवाजीमहाराजांपेक्षां श्रीसमर्थांना अधिक प्रिय असण्याचें कारण नाहीं. श्री. शिवाजीमहाराजांचा धर्मस्थापनेकडे अत्यंत उपयोग होत असतांही व ते रामदासस्वामींचे प्रियभक्त असतांही स्वामींना त्यांचें मरण टाळतां आलें नाहीं. भवितव्यतेपुढें प्रत्यक्ष भगवान्‌ही आपले हात टेकतो."

शिवाजीमहाराजांच्या उदाहरणानें दादांचें थोडेसें समाधान झालें. कारण परमप्रिय शिवबा परलोकवासी झाल्यावर समर्थांना अत्यंत वाईट वाटून त्यांनीं अन्न सोडलें व पुढें ते अवतारसमाप्तीपर्यंत फार क्वचितच मठाबाहेर पडत, असें दादांनीं व शांताबाईनीं वाचलें होतें. त्या गोष्टीचें या वेळीं त्यांना स्मरण झालें.

नित्य सर्व मंडळी रडत असतात हें पाहून दादांचे मित्र रा. रा. भाऊसाहेब लवाटे हे दादांना एक दिवस म्हणाले, रडण्यानें मृताला फार त्रास होतो असें पुराणांतरीं स्पष्ट प्रतिपादिलें आहे. याकरितां तुमचे सर्वत्रांचें शांताबाईवर खरें प्रेम असेल, तर तिला त्रास न व्हावा म्हणून अश्रु गाळण्याचें तुम्ही बंद केलें पाहिजे. रघुवंशांत असें म्हटलें आहे कीं,

स्वजनाश्रु किलाति संततं दहति प्रेतमिति प्रचक्षते ।

या त्यांच्या सांगण्यानें व शांताला क्लेश होतील या

आमच्या रडण्यास थोडा आळा पडला. परंतु दुःखवेग अति झाला म्हणजे कशाचेंही भान न राहून आम्हांस केव्हां केव्हां मनसोक्त अश्रु गाळावे लागतात. विशेषतः **शांताबाईच्या** मातापितरांच्या स्थितींत म्हणण्या जोगा फरक पडला नाहीं. कीर्तनामधील एका आख्यानांत **श्रीकृष्णवियोगामुळें यशोदेची** जशी स्थिति झाली तशी स्थिति **शांताबाईच्या** आईची झालेली आहे. नानातऱ्हेचीं **कृष्णाचीं** बाळपणचीं खेळणीं **यशोदेनें उद्धवास** दाखवून म्हटलेः—

आर्या.

काष्टमय वृषभ, हय, गज, रावे, पावे, शिखी, विटया, गोटया।
मागेल कृष्ण म्हणुनी जपल्या प्राणापरीस मी मोठ्या ॥ १ ॥

याचप्रमाणें शांताबाईच्या अनेक वस्तु लोकांना दाखवून तिच्या आईनें हंबरडा फोडावा, असें चालूं आहे.

तिच्या वडिलांचीही अवस्था **नंदराजासारखीच** झाली आहे.

अभंग

कोणावरी आतां घालूं अलंकार। कोणा वारंवार बोलवावें॥१॥
ऊठ नंदा जेवूं कोण म्हणे आतां । दुःख वाटे चित्ता फार माझ्या ॥ २ ॥

शांताबाईच्या लहानसहान गोष्टी आठवून दादा एकटे असले तरी रडतांना व मनाशीं पुटपुटतांना कैक वेळां दृष्टीस पडतात. असो.

शांताबाईच्या मृत्युसंबंधीं अनेक वृत्तपत्रांतून लेख आले आहेत. त्यांपैकीं ४।५ वृत्तपत्रांतील लेख पुढें दिले आहेत.

Maratta 26-4-25 :—

The Late Miss Shantabai Onkar.

We extremely regret to record the death of Miss Shantabai Onkar, at Yeola on 21st at 5-30 A. M. ...was a young child of only thirteen years but

she had endeared herself so much to the people in Poona by her sweet and impressive Hari Kirtans that her sad death would be mourned all over. Under the loving eye of her father, Mr. Bhaskarrao Onkar, She cultivated the art and even her first appearance at a Hari-Kirtan, at the age of seven was full of great promise for her future. During the last two years her Hari-Kirtan; in which she sang the life of Shri Shivaji Maharaj figured prominently in the programme of Shivaji festival and the Kirtan was attended by thousands of people.... ....We assure the parents that a great number of people in Maharashtra share their grief. May her soul rest in peace!

केसरी २८।४।२५—:

पुण्यांतील कीर्तनप्रेमी श्रोतृवर्गास आपल्या चटकदार कीर्तनानें डोलावयास लावणारी कु. **कीर्तनालंकृति शांताबाई ओंकार** हिजवर येवलें मुक्कामीं दोषिक तापाच्या स्वरूपानें मृत्यूनें झडप घातली हें कळविण्यास आम्हांस फार खेद वाटतो. **कुमारी शांताबाईनें** आपल्या वयाच्या सातव्या वर्षापासून कीर्तन करण्यास सुरवात केली! इतक्या अल्पवयांतला तिचा धीटपणा, तिची पाठशक्ति, निरूपणाची पद्धति, समयसूचकता आणि रसाळ वाणी या गुणांनीं तिच्या कीर्तनांची छाप श्रोतृवर्गावर बरीच चांगली पडत असे. **शिवाजी**–उत्सवासारख्या सार्वजानिक-प्रसंगीं, **शिवाजीमंदिरांतील** विस्तीर्ण पटांगणांत तिचीं कीर्तनें बहारदार वठत असत. अशा बहुगुणी व होतकरू बालिकेवर काळानें एकाएकीं वक्र दृष्टि फिरवून तिच्या आप्तवर्गास महद्दुःखांत लोटलें.

ज्ञानप्रकाश २८।४।२५:—

कु. शांताबाई ओंकार यांचा मृत्यु.

रा. **भास्करराव** ओंकार यांची कन्या **कु. शांताबाई** हिला ता. २१ रोजीं येवलें येथें देवाज्ञा झाली, हें कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें.

सात वर्षांच्या वयांत कु. **शांताबाईनें** कीर्तन करण्यांत प्राविण्य संपादन केलें होतें. तिच्या मृत्युमुळें माहाराष्ट्राचें बरेंच नुकसान झालें आहे.

भाला ता. ४।५।२५:—

कीर्तनालंकृति कुमारी शांताबाई ईस तिच्या वयाच्या आकराव्या वर्षीं दोषी तापानें देवाज्ञा झाली, हें लिहिण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. गेल्या दोन वर्षीं येथील **श्रीशिवाजीमंदिरांत कै. शांताबाईचीं** जीं दोन कीर्तनें झालीं, तीं दोन्हीहीं कीर्तनें आम्ही ऐकलेलीं आहेत. सभाधीटपणा, पाठांतर-शक्ति व सांगण्याची हातोटी हे तीन गुण त्या लहान बालिकेच्या आंगीं प्रामुख्यानें वसत होतें. कठोर कालानें तिला इतक्या अल्पवयांत नेलें नसतें, तर **कै. शांताबाई** ही प्रौढवयांत उत्तम कीर्तनकार निःसंशय निपजली असती. तिच्या मरणानें तिच्या वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

चित्रमय जगत्—मे १९२५:—

कुमारी शांताबाई ओंकार यांना ता. २१ एप्रिल १९२५ रोजीं येवलें मुक्कामीं दोषिक ज्वरानें देवाज्ञा झाली, हें ऐकून आमच्याप्रमाणेंच इतरांना अत्यंत दुःख होईल यांत शंका नाहीं. त्यांचा जन्म येथील प्रसिद्ध **ओंकारघराण्यांत** झाला असून, त्यांची बुद्धिमत्ता फारच विलक्षण होती. येथील **शिवाजीमंदिरांत** त्यांचीं **शिवजन्म व शिव-राज्यारोहण**प्रसंगीं अप्रतिम कीर्तनें झालीं. त्यांचें शेवटचें कीर्तन येवलें येथें **शिवजन्म**प्रसंगीं ता. १३ मार्च १९२५ रोजीं झालें. त्यांची निरुपणपद्धति खरोखरी अमोघ असून समयसूचकता, सभाधीटपणा, शालीनता ही वाखाणण्याजोगीं होतीं. त्यांच्या या अमोल गुणांबद्दल **श्रीशंकराचार्य** यांनीं त्यांना **कीर्तनालंकृति** ही पदवी दिली होती. त्याचें वय अवघें १२ वर्षांचें असतांना मृत्यु यावा हा दैवदुर्विलास होय ! त्यांची मराठी ७ वी, व इंग्रजी ३ री या इयत्ता पुऱ्या होऊन त्या नुकत्याच ४ थे इयत्तेंत गेल्या होत्या.

प्रकरण ८ वें.

उपसंहार.

जितकें म्हणून शांताबाईसंबंधानें मला लिहावेंसें वाटलें व जेवढें म्हणून लिहिण्याजोगें होतें तेवढें सर्व मी मागील प्रकरणांत लिहिलें आहे. त्या लिहिण्यांत अनेक गोष्टी पुनःपुनः येण्याचा संभव आहे. परंतु आमच्या मनोवृत्तीचा विचार करितां तसें होणें अपरिहार्य आहे. याबद्दल आम्हांस वाचकवर्ग क्षमा करील अशी आशा आहे.

अवघ्या १२ वर्षें वयाच्या बालिकेसंबंधीं इतकें लिहिण्याजोगें तरी काय असणार ? असा स्वाभाविकच प्रश्न कोणाही पुढें उभा राहणारच. परंतु कुमारी शांताबाईच्या चरित्राचें अवलोकन केलें असतां तिच्या चरित्रांत सामान्यपणें या वयाच्या बालिकेंत न सांपडणारे गुण पुष्कळच होते, हें कबूल करावें लागतें.

कीर्तनकर्त्री या नात्यानें तिचे गुण वयाचे मानानें अगम्यच होते. आजन्म कीर्तनाचा धंदा करणाऱ्यांनींदेखील तिची पाठ थोपटली आहे. कीर्तन करूं लागली कीं तिची एकरूपता पाहण्याजोगी असे. तिची अस्खलीत, जोरदार, विनोदी वाणी किती परिणामकारक होती; तिची विवेचनपद्धति किती अमोघ, सरळ, मनोरम व सर्वत्रांस पटणारी असे; आख्यानांतील कथाप्रसंगाशीं ती कशी एकजीव होऊन जाई तें आठवलें कीं, भडभडून येतें ! ! ती अस्खलित, विनोदप्रचुर व भावनायुक्त वाणी, तो स्मितयुक्त चेहरा, ती शालीनता आतां ऐकण्यास अगर पहाण्यास मिळणार नाहीं, हें पाहून मन उदास होतें ! !

श्रीशिवपराक्रम–आख्यानांतील करुणाजनक प्रसंगांत श्रोत्यांचे डोळ्यांतून अश्रु काढणें, वीररसप्रसंगीं श्रोत्यांचे बाहू स्फुरण पावावयास लावणें, दामाजी आख्यानांतील विनोदी कुळंबाऊ भाषा व कठोर मुसलमानी भाषा सफाईदारपणानें बोलून श्रोत्यांचीं मनें तल्लीन करून सोडणें, संस्कृत श्लोक अस्खलित, अगदी शुद्ध म्हणून त्यांची फोड करून अर्थ सांगणें, एखाद्या कसलेल्या कीर्तनकारास साजणारा तिचा सभाधीटपणा, बहुश्रुतपणास साजे अशी तिची विवरणपद्धति व असाधारण समयसूचकता, वाखाणण्याजोगी होती.

एकंदरीनें इतका असाधारण गुणसमुच्चय तिच्या ठिकाणीं इतक्या अल्पवयांत एकवटलेला पाहून कोणाही माणसास तिजबद्दल अचंबाच वाटेल. अनेक गुणामुळें हें शांताबाईचें चरित्र लहान बालबालिकांना मार्गदर्शक वाटल्यास नवल नाहीं.

ज्या अनेक सद्‌गुणांनीं व बाललीलांनीं शांताबाई आदर्शभूत होऊन राहिली त्या सर्व गुणांचें एकेजागीं टाचण करून ठेवावें याच एका भावनेनें मी हें चरित्र लिहिलें आहे. यामध्यें अतिशयोक्तीचा यत्किंचितही भाग येऊं नये म्हणून मी खबरदारी घेतली आहे. शांताबाईच्या डायऱ्या व तिचीं इतर टांचणें, त्याचप्रमाणें इतरांचे कागदपत्र व वर्तमानपत्रांचे उतारे यांचा आधार घेऊनच हें चरित्र लिहिलें आहे.

शांताबाई येवल्यासारख्या आडवळणाचे गांवीं आजारी न पडती तर आम्हांस अनेक उपाय करतां आले असत. जितके उपाय करणें जरूर होते तितके झाले नाहींत व आमची प्रिय शांताबाई आड-रानांत मेली हें आठवलें कीं, मन कावरेंबावरें होतें. टायफाइड-फिवर तर खराच परंतु तो अगदीं सौम्य प्रकारचा होता, असें आम-चेंच नव्हें, तर डॉक्टरांचेंही मत होतें. त्यामानानें सर्व सुसं-[illegible] चाललें असतां ती कालवश कां व्हावी? हा मोठा प्रश्न होता. तो

आम्ही पुण्यास आल्यावर येथील डॉक्टरलोकांच्या सल्ल्यानें उलगडला. डॉ. वुइल्यम ए. एम. एम. डी. यांनीं लिहिलेल्या " Treatment of Sick " पुस्तकांत टॉयफाइड फिवर या प्रकरणामध्यें पुढीलप्रमाणें लिहिलेलें आहे.

" The value of free Ventilation and attention to the hygiene of the premises cannot well be over estimated. I am firmly convinced, despite my belief in the antiseptic medication, that the **Vast majority of the deaths are due to bad ventilation and bad hygiene of the house and its surroundings.** "

शांताबाई ज्या माडीवर होती त्याच्या आसपास अत्यंत घाण सांचलेली होती. त्याचा त्रास आम्हां सर्वांसच होत होता. तेथून हलवावी तर डॉक्टर म्हणत अशा स्थितींत हलविणें अपायकारक होईल !

शांताबाईला जे डॉक्टर औषधोपचार करीत होते, ते फार सज्जन असून त्यांचें तिच्यावर फार प्रेमही होतें. परंतु ते एम. बी. बी. एस. पास होऊन थोडींच वर्षें झालीं आहेत. दुसऱ्या कोणाची सल्लामसलत घ्यावी असें त्यांना वाटल्यास त्यांच्यापेक्षां जास्त शिकलेले (अगर त्यांच्याइतके शिकलेले) असे दुसरे कोणीच तेथें नव्हतें ! **शांताबाईस** आराम पडावा म्हणून **डॉक्टर भटांनीं** मात्र कसून प्रयत्न केले यांत शंका नाहीं.

आम्ही **शांताबाईस** वाटेस लावून रक्तांनीं माखलेल्या मुखांनीं पुण्यांत परत आलों. घरांत पाऊल टाकतांच सर्वांना भडभडून आलें. नंतर ती कोणाचे तरी स्वप्नांत दिसेल व कांहीं तरी बोलेल म्हणून आशा करून होतों. परंतु तिच्या निधनास जवळजवळ ४ महिने झाले तरी ती कोणाच्याच स्वप्नांत आली नाहीं ! आमचें कठोर दुर्दैव ! दुसरें काय म्हणावें !!

प्लँचेट नांवाच्या यंत्राच्या साह्यानें मृतात्म्याशीं संभाषण करतां येतें असें ऐकलें होतें, म्हणून आम्ही तें यंत्र तयार करून आणलें. परंतु तासाचे तास त्यावर घालवूनही त्याचा आम्हां कोणासही उपयोग झाला नाहीं. तरी आमचा तो नाद सुटला नाहीं.

ता. २६ मे १९२५ मंगळवार रोजीं रा. **अनंत धोंडो सहस्रबुद्धे** यांजकडून **शांताबाईचा** फोटो एन्लार्ज करून आला. तो **दादांनीं** आपल्या दिवाणखान्यांत प्रमुख ठिकाणीं लावून ठेविला आहे. त्याजकडे पाहून सुखदुःखाच्या गोष्टी आठवून आम्ही नित्यकाळ घालवीत आहोंत.

शांताबाईच्या आईचीं मुलें जगत नसत म्हणून तिला माझ्या ओटींत घातलें होतें. तिला माझा व मला तिचा स्वाभाविकच लळा लागला होता. **शांताबाईसारख्या** असामान्य कन्येकरितां मला जें जें करितां आलें, तें मी सर्व केलें असल्यास त्यांत विशेष असें कांहींच नाहीं. ती पास होऊन इंग्रजी चौथींत गेली, त्यावेळीं ती येवल्यास होती. ती पास झाल्याचें तिला कळवून लगेच मी चौथ्या इयत्तेचीं सर्व पुस्तकें व जरूर तीं एक्झरसाइज बुकें घेतलीं. त्यांस चांगले पुठ्ठे घालून व त्यावर तिचीं नांवें घालून तयार ठेवलीं. परंतु हाय ! हाय ! तीं पुस्तकें पूर्ण अभागीं ! त्यांवर एकवारदेखील त्या सद्गुणी बालिकेची नजर फिरली नाहीं ! !

दुःखातिशयानें भडकलेल्या मनास सुचलें तसें हें **शांताबाईचें** चरित्र रेखाटलें आहे. आपल्या प्रेमळ जीवाच्या वियोगाचें दुःख सोसण्याचे ज्या दुर्दैवी प्राण्यांवर प्रसंग आले असतील, त्यांना आमच्या केविलवाण्या स्थितीची यथार्थ जाणीव पटेल. "अशांतस्य कुतःसुखम्" आमच्या **शांताबाईच्या** मरणानें आमची अशी स्थिति [illegible] आहे. सुख असें कशांतच राहिलें नाहीं. हे **भगवंता**, तुझ्या

पाशीं एवढीच प्रार्थना आहे कीं, असले आघोर प्रसंग कोणावर कदापि आणूं नकोस. आम्ही सर्व तुझीं लेंकरें आहोंत. तुझें अंकित आहोंत. तरी अशा हतबल स्थितींत तुझ्या चरणीं लीन होऊन केविलवाणेंपणानें तुझ्यापाशीं मागणें मागण्याशिवाय आमचे हातीं काय आहे !

श्लोक (मंदाक्रांता).

गेली शांता निघुन सकला लावुनी हाय हाय ।
शांता शांता तुजविण इथें राहिलें सांग काय ।
झालों आम्ही हतबल अतां रुक्ष आयुष्य झालें ।
नेलें नेलें हरुनि अमुचें सार सर्वस्व नेलें ॥ १ ॥
गेलें गेलें विभवगृहिचें भाग्य गेलें लयाला ।
गेली सद्दी सुखही सरलें हेतुचा अंत झाला ।
संसारीचें सकल सरलें सार शांता वियोगें ।
गेलें शांता सहच सगळें राहिलें काय मागें ? ॥ २ ॥
शांता शांता म्हणुन रडते माउली धाय धाय ।
शांतासंगें जिवन सरलें राहिला शुष्क काय ।
दादांची तो स्थिति न वदवे घेतली हाय त्यांनीं ।
ताई दुःखें झुरत बसली जाहली घोर हानी ॥ ३ ॥
घेऊं आतां हृदय पिटुनी काय फोडूं कपाळ ।
सांगा कोणी तरि मज कसा झोंपला लोकपाळ ।
केलें सांगा सदय हृदयें काय हें कार्य त्यांनीं ।
हेतू त्याचे खचित अमुच्या आज येती न ध्यानीं ॥ ४ ॥

समाप्त.

परिशिष्ट. (वंशवेल.)

- कृष्णाजीपंत.
  - गणेश नाईक.
    - बाबूजी नाईक.
      - चिंतामण नाईक
        - गणपतराव
          - o
        - मोरोपंत
          - सदाशिव
            - चिंतामण
              - मोरेश्वर (ऊर्फ दादासाहेब)
          - आबाजी
            - o
        - विनायकराव
          - गंगाधरबापु
          - बलवंत
            - धुंडिराज × लक्ष्मीबाई
              - गजाननबापु × सरस्वतीबाई
                - o
              - गणपतराव
              - सदाशिराव (*दत्तक दिले)
              - यशवंतराव
                - o
              - भास्करराव ऊर्फ काका. × सावित्रीबाई.
                - बया
                - शांता
                - मालती.
            - विनायक अनंत
              - o
          - भालचंद्र
            - सदाशिव ऊर्फ बाबूराव (*दत्तक)
              - कृष्णाजी ऊर्फ बाळासाहेब
          - गणेश.
            - o
        - भिकाजी.
          - o
      - गंगाधर नाईक
        - o

जन्म–मृत्यूच्या दिवसांचें टिपण व इतर माहिती.

गंगाधर बापूजी—मृत्यु सन १७६१ पानिपतचे लढाईत.

चिंतामण बापूजी—मृत्यु आश्विन शु॥ ७ शके १७१० यांचा विवाह रास्ते (मेहुणपुऱ्यांतील) यांचे कन्येशीं झाला. त्या सती गेल्या.

मोरो चिंतामण– (दादासाहेब) } जन्म शके १६९६; मृत्यु आषाढ व॥ ३०.

सदाशिव मोरो—जन्म शके १७४०; मृत्यु श्रावण शु॥१२ शके १७८३.

चिंतामण सदाशिव—जन्म शके १७७९; मृत्यु भाद्रपद शु॥ १२ शके १८०४.

मोरेश्वर चिंतामण—जन्म जेष्ट व॥ ३ शके १८०४; रविवार सकाळीं ७ वाजतां.

विनायक चिंतामण (नानासाहेब)—जन्म शके १६६८; मृत्यु आश्विन शु॥ १२ शके १७५१.

गंगाधर विनायक (बापुसाहेब)—जन्म शके १७३९; मृत्यु जेष्ठ शु॥ ४.

धुंडिराज गंगाधर (आबासाहेब)—जन्म शके १७५५; मृत्यु– अश्विन शु॥ २ शके १८००.

लक्ष्मीबाई भ्रतार धुंडिराज } —जन्म-भाद्रपद शु॥ ८ शके १७५७; मृत्यु माघ व॥ ९ शके १८१६.

भास्करराव — (काकासाहेब) } जन्म–चैत्र व॥ १३ शके १७९७, ता. ३ मे १८७५ (शांताबाईचे वडिल).

शांताबाई—जन्म-- ता. १४।१०।१३; मृत्यु--ता. २१।४।२५ चैत्र व॥ १३ शके १८४७ मंगळवार सकाळीं ५॥ वाजतां.

शांताबाईचा जन्म ओंकार यांचे कुळांत झाला.

(कै. कु. शांताबाई ओंकार ह्या पुस्तकांतील
कीर्तनें करीत असें तीं पुस्तकें.)

सचित्र कीर्तन--सुधा.

भाग १ ला.

(सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. किं. १। रु. ट. ह. शिवाय)

लेखिका--**काव्यचंद्रिका सौ. राधाबाई आपटे, B. P. N. A.**

मनोरंजक गोष्टीनें युक्त असें हें पुस्तक सर्वांगसुंदर असून यांत सुबक सहा चित्रें घातलीं आहेत. विवाहित स्त्रिया, कुमारिका, तरुण मुली, मुलें, वृद्ध स्त्री–पुरुष यांना हें सारखेंच उपयुक्त आहे. या पुस्तकांत शिवराज्यारोहण हें अत्यंत सुरस आख्यान घातलें आहे. सर्व आख्यानें गद्यपद्यांसह सरळ गोष्टींच्या रूपानें मनोरंजक अशीं लिहिलेलीं आहेत. खालील अभिप्रायावरून पुस्तक कसें आहे तें समजेल.

लोकमान्य टिळकः—बाईचें वय फक्त १९ वर्षांचें असतांही त्यांनीं केलेलीं पद्यें सुरस व सुबोध झालेलीं आहेत. स्त्रियांस हें पुस्तक फार उपयुक्त आहे.

मा. काळकर्ते प्रो. परांजपे:—भाषा सरळ, सुबोध पद्यें, सोपीं, सरस आहेत.

ज्ञानप्रकाश—उपमा व कोट्यावगैरे सुबोध व मनोरंजक भाषेंत दिल्या आहेत.

" भाग २ रा व कीर्तन–साहित्य–संग्रह. "

लेखिका– { **काव्यचंद्रिका सौ. राधाबाई आपटे, B. P. N. A.**
काव्यकल्पलता श्री सारजाबाई बापट; B. P. N. A. }

(किंमत रु. २ ट. ह. शिवाय.)

श्री शिवाजी मंदिरांत कीर्तनालंकृति कुमारी शांताबाई ओंकार या बालिकेनें आपल्या गोडवाणीनें श्री शिवपराक्रम आख्यान लावून पांच हजार श्रोत्यांकडून वाहवा करून घेतलें. तें ऐतिहासिक अत्यंत हृदयस्पर्शी आख्यान व इतर रसाळ अशीं पौराणिक आख्यानें पूर्वरंगासह या पुस्तकांत सरळ गोष्टीच्या रूपानें सुलभ अशीं पद्यांसह दिलेलीं आहेत. साहित्य–संग्रहांत मनास पटणारीं व व्यवहारास लागू पडणारीं बोधतत्त्वें सुभाषितें, मनोरंजक गोष्टी व हास्यरसोत्पादक चुटकें यांचा भरपूर स्वतंत्र संग्रह दिला आहे.

केसरीकर्ते म्हणतात—कीर्तन–सुधेच्या पहिल्या भागाच्या हजार प्रति...चार महिन्यांत खपल्या. या भागांतील.....सुरस आख्यानें पाहिल्यास हा भाग तितकाच लोकप्रिय होईल अशी खात्री वाटते. शिवपराक्रम आख्यान बहारीचें आहे. पुस्तक उपयुक्त.

चित्रमयजगत्:—सर्व दृष्टीनें उपयुक्त असलेल्या या पुस्तकाचा सर्वत्र प्रसार होईल.

पत्ताः—**म्यानेजर–धुंडिराज डेपो; १६५ शनवार पेठ पुणें शहर**